


# महाभारत

## खंड २१ : द्रोणपर्व ४

मराठी अनुवाद

## श्री. अशोक कोठारे

# महाभारत

## महाभारत खंड एकोणतिसावा

## द्रोण पर्व भाग चौथा

## अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.

http://www.esahity.com/2309234323812351236623402381235O.html

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० जून २०२०**

## अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां

जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा एकोणतिसावा खंड, द्रोण पर्व भाग चौथा, आपण आता वाचणार अहात, घटोत्कच वध पर्व, द्रोण वध पर्व, नारायण अस्त्र प्रयोग पर्व.
महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील  गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.
महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका

करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –

ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in
ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories
I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy
Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/23092343238123512366234023812350.html

## - द्रोणपर्व भाग चौथा –

## घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे पन्नासावा

संजय पुढे सांगतो, तुमचे हत्तीदल मोठ्या ताकदीने पांडवांच्या सैन्याला तोंड देत होते. जीवाची पर्वा न करता दोघे, पांचाल व कौरव यशासाठी लढत होते. तोडीस तोड असलेले योद्धे एकमेकांना द्वंद्वात हरवण्याचा प्रयत्न करत होते. बाणाने, भाल्याने, शराने अशाप्रकारे विविध आयुधांने ते लढत होते. ती लढाई भीषण होती. अंगावर कांटा येत होता ते मरणारे योद्धे पाहून. रक्तांच्या चिरकांड्या उडत होत्या. चिडलेले हत्ती विरुद्ध बाजूच्या हत्तीला जोरांनी धडाका मारत होते. ते एकमेकांना त्याच्या सुळ्यानी भोसकत होते. घोडेस्वार प्रतिस्पर्ध्याला कापत होते तलवारीने. शराने आणि कुर्हाडीने ते एकमेकाला मारत होते. अशाप्रकारे विविध शस्त्रांनी ते लढत होते. घोडेस्वार घोडेस्वारांना मारत होते. त्यासाठी भाले, बरच्या, सुरे, तलवारी जे असेल त्याने ते लढत होते. त्यांच्या लढण्यात जोश होता. त्यावेळी एकच गोंधळ उडाला होता. त्यात पांचाल व कुरु सैनिक त्याच्या विशिष्ट पेहेरावामुळे ओळखता येत होते. त्याशिवाय त्यांच्या बोलीभाषेतून सुद्धा फरक जाणवत होता. ठार मारणे हा एकच उद्देश त्यांचा होता. किती मारले त्यावर त्यांची किर्ती होत होती. हजारो बाण फेकले जात होते. त्या सुमारास सूर्य मावळत होता त्यामुळें कोण कोठे काय करतो ते समजत नव्हते. अशारितीने पांडव लढत होते तेव्हां दुर्योधन त्यांच्यात घुसला होता, त्याचा राग जयद्रथाच्या वधामुळे फार वाढला होता. तो जीवाची बाजी करत मरण्यासाठी लढणार असे दिसत होते. असा तो पांडवांच्या मध्ये शिरतो व तेथे एक मोठे युद्ध होते. मोठा नरसंहार होतो. जसे सूर्य मध्यान्हीचा सगळे जाळून टाकतो तसे होत होते. पांडवांचे सैन्य त्याचा तो संहारक अवतार पाहून घाबरले. दुर्योधनाच्या बाणांमुळे जखमी झालेले पांडवांचे सैनिक सैरावैरा धावू लागले होते, कित्येक मेले. त्याशिवाय तुमचे हत्ती पांडवांच्या सैनिकांना पायाखाली चिरडत होते. तुझ्या मुलाने भिमावर दहा बाण मारले, नकूलावर तीन मारले, विराट व द्रुपदावर प्रत्येकी सहा मारतो, शिखंडीवर शंभर मारतो, धृष्टद्युम्नावर सत्तर बाण मारते, युधिष्ठीरावर सात मारतो. त्या नंतर तो मोठी

जिंकल्याची गर्जना करतो. त्यानंतर कैकेया व छेड्डी वर अनेक बाण मारत असतो. त्यानंतर सतवतावर सात बाण मारतो. द्रौपदीच्या मुलांवर प्रत्येकी तीन मारतो. पुन्हा मोठी गर्जना करतो. त्याशिवाय कित्येक सैनिकांचे जीव घेतो ते वेगळे. तो साक्षात यमाचा अवतार झाला होता. त्यावेळी युधिष्ठीर त्याच्यावर दहा बाण मारतो असें कीं, ते त्याच्या दोन पायात वर्मी बसतात. त्यामुळे तुझा मुलगा रथात खाली बसतो. ते पाहिल्यावर पांडवांना हुरूप येतो व ते चढाई करतात. तुझ्या लोकांना वाटते दुर्योधन मेला. ते त्या प्रमाणे ओरडू लागतात, "राजा मेला, राजा मेला". ते ऐकून द्रोण तेथे येतात. त्या सुमारास तुझा मुलगा शुद्धीवर येत असतो. त्यानंतर तो युधिष्ठीरावर चाल करून जातो. ते पाहून पांडवांचे सुद्धा त्याला अडवण्यासाठी त्याच्यावर चाल करतात. त्यांच्यावर द्रोण बाणांचा मारा करतात. त्यांच्या बाणामुळे कित्येक मरतात, किती घायाळ होतात. त्यानंतर तेथे एक भीषण युद्ध होते. मोठा नरसंहार होतो. केवळ तुला जिंकवण्यासाठी द्रोण त्या शूरवीर योद्ध्यांचे बळी घेत असतात.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे पन्नासावा संपला.

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे एकावन्नावा

धृतराष्ट्र विचारतात, माझ्या सुदोधनाबद्दलचे समजले. आता सांग द्रोण पांडवांच्या फौजांमध्ये शिरतात ते त्यांचे कसे नियंत्रण करतात. द्रोणांना माझ्या लोकांनी कसे संरक्षण दिले ते सांग. कोण त्यांच्या उजव्या भागाला होते? कोण डाव्या बाजूला होते, कोण त्यांच्या मागून जात होते, कोण त्यांच्या पुढून जात होते? कधी द्रोण त्यांच्या रथात धनुष्य हातात घेऊन नाचत तिरंदाजी करत पांडवांच्या गोटात घुसले? ते त्यांच्यामध्ये शिरल्यामुळे पांडवांची भिती वाढली असेल असे मला वाटते. मला सांग, तो महारथी पांचालांचे नाश करणारा कसा मेला.

संजय बोलतो, जयद्रथाचे वध केल्यानंतर त्या संध्याकाळी पार्थ युधिष्ठीराला भेटून व सत्यकी सुद्धा भेटून ते द्रोणांकडे लढण्यासाठी जातात. युधिष्ठीर, भिमसेन, नकूल व सहदेव त्यांच्या पलटणी घेऊन द्रोणांवर चाल करतात. ती रात्रीची लढाई असते. अंधारात ते त्यांच्या शत्रूवर वार करणार असतात केवळ अंदाजाने. त्यांच प्रमाणे राजा विराट, धृष्टद्युम्न, सल्व, द्रुपद असे राजे सुद्धा द्रोणांवर चालून जातात. त्यांच्या बरोबर पांचालांचे योद्धे होते. द्रौपदीची मुलं, राक्षस पुत्र घटोत्कच, पांचालांचे प्रभद्रक, त्याची सहा हजार फौज घेऊन द्रोणांवर हल्ला करण्यासाठी निघतात. त्यांचा प्रमुख असतो शिखंडी. त्यांत पांडवांचे महारथी सामील झाले होते. ती अंधारी रात्र होती व ते केवळ अंदाजाने आपल्या शत्रूचा वेध घेणारे होते. एकाप्रकारे ती त्यांची कसोटी होती कीं, ते त्यांच्या बाजूच्या माणसास मारणार नाहीत. अंदाज चुकला तर ते त्यांच्याच माणसांना सुद्धा मारण्याची शक्यता होती. तसे ते त्या रात्रीचे युद्ध होते. चुकीचा मारल्या जाण्याच्या भयांने ते सगळे दोनही बाजूचे भयग्रस्त झाले होते. त्यात पायदल व हत्तीदल सुद्धा सामील झालेले होते. त्याच वेळी रात्रीचे निशाचर प्राणी जसे लांडगे, कोल्हे, पिशाच्च हे सुद्धा त्यात होते. माणसं ओरडत होती त्यांच्या आवाजा वरून त्यांच्या बोलीवरून त्यांना समजत होते कीं, तो त्यांचा आहे कां दुसर्याचा. एकच गदारोळ उठला होता. त्यामध्ये रणवाद्ये वाजू लागली होती. त्याच्यातून घुबडं अधून मधून उडत होती. त्यांचा घुघत्कार सर्वदूर ऐकू जात होता.

घोड्यांच्या टापांचा आवाज, हत्तींचे चित्कार, घोड्यांचे खिंकाळणे, असे विविध आवाज त्यात होते व त्यातून नेम घेऊन बाण मारावयाचे होते. फक्त खरे जामबाज अशा युद्धात जिंकतात असा अनुभव आहे. द्रोणांवर पहिला हल्ला श्रीजयांच्या योद्ध्यांनी केला. हवेत धूळ उडाल्यामुळे योद्ध्याना जास्त त्रास होत होता. संहाराला सुरूवात झाली. शस्त्रांचे खणखणाट ऐकू येऊ लागले होते. माणसें मरत होती पण कोण कोणाला मात आहे ते समजत नव्हते. अशा प्रकारच्या समरात साधारणपणे सामान्य सैनिकांचेच जास्त शिरखाण होत असते हे सगळे जाणत होते. वेड्या सारखे ते लढत होते. आपण कोणाला मारत आहोत ते त्यांना समजत नव्हते. त्या अंधारात सैनिकांच्या अंगातील सुवर्णाच्या अलंकारामुळें व जरीच्या कपड्यामुळें जो थोडा प्रकाश होता तो विस्फारत होता व थोडे कांही त्यात ते योद्धे पाहू शकत होते. आकाशातील तारे थोडा प्रकाश देत होते. योद्ध्यांच्या ओरडण्यात कोल्हांचे व लांडग्यांचे ओरडणे मिसळत होते. त्या अंधारात तलवारी, ढाली कांहीं प्रमाणात प्रकाश प्रतिबिंबासारखा पुरवत होते. दुर्योधनाला अशा युद्धात फार जोर येतो तसा त्या रात्रीसुद्धा आला होता. त्यारात्री मधून थंड वारे वहात होते तर मधून गरम वहात होते. कोठून कोणते शस्त्र येऊन लागेल त्याचा कांहीं अंदाज करता येत नव्हता. तरी दोनही बाजूचे योद्धे जोरात लढत होते. माणसं मरत होती. शौर्याची ती एक वेगळी परीक्षा होत होती. प्रकाशात कोठून काय आपल्या दिशेने येत आहे ते समजत होते त्यांमुळे त्यापासून बचावणे शक्य होते पण ह्या लढाईत तो बचाव शक्य नव्हता. तशा परिस्थितीत कित्येक तसेंच मारले जात होते. खर्या अर्थाने, कोणीही कोणाचे संरक्षण करू शकत नव्हते. ती एक पूर्णतया असुरक्षित स्वरुपाची लढाई होती. पांडवांचे व श्रींजयांचे योद्धे मोठ्या उत्साहाने द्रोणांच्या सैनिकांवर तुटून पडत होते. अशा समरातून कोणी पळून गेला तर तेसुद्धा समजत नव्हते व त्याचा फायदा कांहीं सैनिक घेत होते. कांही प्रमुख योद्धे द्रोणांवर चाल करतात त्यातील कांही यमाकडे जातात. कारण अशा लढाईत द्रोण तरबेज होते. ते आवाजाच्या रोखाने अचूक निशाणा साधत होते. अनेक हत्ती, घोडे व पायदलाचे मारले जात होते.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे एकावन्नावा संपला.

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे बावन्नावा

धृतराष्ट्र बोलतात, "जेव्हां जयद्रथाच्या वधाने व्यथीत झालेले द्रोण श्रींजयांच्या गोटात शिरतीत तेव्हां तुमची सगळ्यांची काय कल्पना झाली कीं आता काय होणार? माझ्या उर्मट मुलाला ते बोलल्यावर ते पांडवांच्या सैन्यात शिरतात तेव्हां पार्थाची कोणती प्रतिक्रीया झाली? जयद्रथ, भुरीश्रव ह्यांच्या हत्येनंतर पांचालांवर चालून गेले तेव्हां पार्थाची काय प्रतिक्रीया होती? दुर्योधनाने त्या परिस्थितीत कोणते पाऊल उचलले? द्रोणांना मदत करण्यासाठी कोण पुढे झाले? द्रोणांचा मृत्यू कशा झाला ते सांग. मला सांग त्या रात्री द्रोणांनी त्यांचे कसे पारिपत्य केले? ते पहाण्यासाठी तुझ्यासारखे आणखीन कोण तेथे साक्षीदार होते"? तू सांगतोस कीं, माझे सैन्य पराभूत झाले त्या रात्रीच्या लढाईत पांडवांकडून, त्यांची काय अवस्था झाली त्यामुळे ते मला समजून घ्यावयाचे आहे. तू सांगतोस कीं, पांडवांचे खूषीत होते व माझे हवालदील झाले होते, तसे तू कशाच्या आधारावर म्हणतोस, कुरुपेक्षा पार्थ जास्त आनंदी होते कां ते सांग.

संजय बोलतो, त्या रात्रीच्या लढाईच्या दरम्यान पांडव आणि सोमक, द्रोणांवर चालून गेले. द्रोणांनी त्याच्यातील कैकेयांचे व धृष्टद्युम्नाचे मुलगे अशा सगळ्यांना यमाकडे धाडले होते. ते पाहिल्यावर राजा सिवी चिडला व त्या ब्राह्मणांवर चालून गेला. द्रोण त्याला दहाबाण मारतात. सिवी द्रोणांना तीस बाण मारतात. त्याशिवाय तो राजा द्रोणाच्या सारथ्याला खाली पाडतो. त्यानंतर द्रोण सिवीचे घोडे मारतो. त्याचा सारथी मारला जातो. त्यानंतर द्रोण सिवीते मुंडके उडवतो. दुर्योधन त्वरित द्रोणांसाठी एका नव्या सारथ्याची व्यवस्था करतो. त्यामुळें द्रोण पुन्हा पांडवांवर चाल करून जातात. कलिंगचे सैनिक त्यांच्या राजाच्या बरोबर भिमावर जातात. ते भिमावर पांच बाण मारतात. त्यानंतर ते भिमाचा सारथी अशोक (विसोक) तीन बाणांने जखमी करतात. त्यामुळे चिडलेला भिम त्याच्या रथातून शत्रूच्या रथात उडी मारून जातो. कलिंगच्या राजाला गुद्दे मारू लागतो. कर्णाला व त्या राजाच्या भावाला भिमाचे ते वर्तन आवडत नाही. त्यांचे सगळे योद्धे भिमाला विषारी बाण मारून बेजार करण्याचा प्रयत्न करतात. तो रथ भिम सोडतो व ध्रूवाच्या गाडीकडे

जातो. त्याला असा एक ठोसा लगावतो कारण तो त्याच्यावर सारखे विषारी बाण मारत होता, की तो मरून कोसळतो. ध्रुव मेल्यानंतर भिम त्याच्या राक्षसी ताकदीने पुढे जयरथा कडे जातो. भिम सिंहगर्जना करू लागतो. जयरथाला तो खेचून रथातून काढतो व एकच चापड मारतो कीं, त्यांमुळे तो मरून पडतो. ते कर्ण पहात असतो. कर्ण भिमावर एक शलाक फेकतो जो सोन्याचा होता. भिम तो शलाक त्याच्या हाताने पकडतो, तो शलाक भिम कर्णावर फेकतो. तो कर्णापर्यंत जाण्या आधीच शकूनी त्याच्या बाणाने तो शलाक तोडून टाकतो. तेवढे केल्यावर भिम त्याच्या रथात परत जातो. तो पुन्हा तुमच्या फौजांवर हल्ला करतो. भिम यमासारखा तुमच्या सैन्याचा नाश करत होता. त्यावेळी तुमचा मुलगा दुर्मद भिमाला आव्हान देतो. बाणांचा वर्षाव करू लागतो. भिमाला त्याचे हसू येते. तो त्याची सारथी ठार मारतो. त्यानंतर दुर्मद त्याचा भाऊ दुष्कर्म त्याच्या रथात जातो. त्यानंतर ते दोघे भाऊ भिमावर चाल करतात. जसे सुर्य व वरुणाने तारकासुरावर चाल केली होती तसे ते दिसले. ते भिमावर बाणांचे मारे चालू ठेवतात. त्यावेळी कर्ण, अश्वत्थामा, कृप, सोमदत्त, वल्हीक ह्यांचा समक्ष भिम त्याची एक लाथ मारून तो रथ मातीत दाबून टाकतो. ते दोघे यमाकडे जातात. ते पाहून सैनिकांत आक्रोश सुरू होतो. राजे बोलू लागतात, अरे हा तर रुद्र साक्षात पांडव बनून आला आहे. ते बोलून सगळे राजे रणांगण सोडून पळून जातात. त्या रात्री मोठा नरसंहार केल्यानंतर भिम ज्याच्या ताकदीचे सगळे राजे कौतुक करत होते, युधिष्ठीराकडे जातो. त्यानंतर नकूल व सहदेव, द्रुपद व विराट, कैकेया व युधिष्ठीर भिमाचे कौतुक करत आपला आनंद व्यक्त करतात. ते सगळे भिमाची प्रशंसा करतात जशी महादेवाची केली होती जेव्हां त्यानी अंधकाचा वध केला होता. ते पाहून चिडलेला तुमचा मुलगा, द्रोणांना घेऊन व आणखीन सैन्य जमवून ते सगळे मिळून भिमाला घेरा घालतात. अशाप्रकारे त्या अंधार्या रात्री ते युद्ध होते ज्यामुळे मांसाहारी प्राण्यांची चंगळ चालली होती.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे बावन्नावा संपला.

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे त्रेपन्नावा

संजय पुढे सांगतो, भुरिश्रवाचा वध सत्यकी करतो जेव्हां भुरिश्रव ध्यानात होता ते समजल्यावर त्याचा पिता सोमदत्त सत्यकीला आव्हान देतो असे बोलून, "अरे सतवता, तू क्षत्रिय धर्माचा त्याग केला आहेस कां? त्याऐवजी तू एक दरोडेखोर झाला आहेस असे मी पहातो आहे. खरा क्षत्रिय त्यांच्यावर वार करत नाही जो शस्त्र खाली ठेवतो, जो असहाय झाला आहे, ज्याने लढाई सोडली आहे, जो क्षमा मागतो. तुम्हा वृश्नींमध्ये एक तू व दुसरा प्रद्युम्न श्रेष्ठ योद्धे म्हणून समजले जाता. असे असतांना तू माझ्या मुलावर जेव्हां तो ध्यानाला बसला होता कां वार केलास ज्याचा एक हात आधीच पार्थाने कापला होता. तो मरण्यासाठीच बसला होता, त्याला समाधी घ्यावयाची होती मग त्या अवस्थेत असलेल्यावर वार करणे तुला शोभले कां? त्या तुझ्या कर्माचे फळ तुला आता माझ्याकडून भोगावे लागणार आहे. आज मी तुझा शिरच्छेद करणार आहे तुझ्याशी द्वंद्व करून.  माझ्या दोनही मुलांची शपथ घेऊन हे मी बोलत आहे. ते मी ह्या रात्रीच साध्य करणार आहे. जर ते मी केले नाही तर मी एका भयंकर नरकात जाऊन पडीन". असें बोलल्यानंतर सोमदत्त त्याचे शंखू वाजवतो. एक गर्जना करतो. ते ऐकल्यावर सत्यकी त्याला उत्तर देतो, "अहो कुरुवंशाचे, मला तुमच्याशी किंवा इतर कोणाशीही लढण्यास भिती वाटत नाही. जरी तू तुझे सगळे सैन्य घेऊन माझ्याशी लढण्यास आलास तरी मी तयार आहे त्या द्वंद्वांसाठी. मी क्षत्रिय धर्म सोडलेला नाही. म्हणून मला तू वाट्टेल ते बोलून भडकवण्याचा प्रयत्न करू नकोस, फालतू बडबड न करता माझ्याशी द्वंद्व करण्यास ये. मी तयार आहे. मी तुझ्या मुलाचा वध केला आहे, मी साल व वृषसेनांना पराभूत केले आहे. तुलासुद्धा मी आज ठार मारणार आहे जर तशी तुझी इच्छा असेल तर. तुझ्याबरोबर तुझे सगळे आले तर त्याना सुद्धा मी मारणार आहे. तू त्या युधिष्ठीराच्या विरूद्ध लढण्यास आलास तेव्हांच तू मारला गेल्यात जमा झालेला आहेस. युधिष्ठीराच्या सारख्या सत्वशिल, संयमी, शुद्ध मनाच्या, दयाळू, नम्र, बुद्धीमान, क्षमाशिल अशा राजाच्या विरूद्ध उभे राहून तू तुझा मृत्यू ओढवला आहेस. तू कर्ण व सुवलाच्या मुलांबरोबर ह्या युद्धात मरणार आहेस.

कृष्णाच्या पायाच्या कृपेने तू व तुझ्या मुलांबरोबर लढण्यास मी तयार आहे. परंतु, जर तू व तुझे पळून गेलात तर मात्र वाचणार अहात. असे बोलल्यांनंतर तो लाल डोळ झालेला वृश्नी त्यांच्यावर बाणाचा मारा करू लागतो. त्यानंतर दुर्योधन त्याचे हजार रथ व दहा हजार घोडे घेऊन सोमदत्ताच्या पाठीशी सज्ज होतो. त्याला साथ देण्यासाठी शकूनी त्याच्या मुलांसह त्याची सेना घेऊन सत्यकीला मारण्यासाठी तयार होतो. तुमचा मेव्हणा, त्याचे दहा हजार घोडेस्वार घेऊन सज्ज होतो. ते सगळे सोमदत्ताच्या साठी तयार होतात. अशा तयारीने सोमदत्त सत्यकीला वेढा देतो. सत्यकीवर अशाप्रकारे मारा होत आहे ते पाहून धृष्टद्युम्न त्याच्या मदतीसाठी पुढे होतो त्याच्या सैन्यानिशी. अशा प्रकारे दोन मोठ्या फौजा लढण्यासाठी एकमेका समोर उभ्या होतात. सोमदत्त सत्यकीला नऊ बाण मारतो. सत्यकीसुद्धा नऊ बाण मारतो. सत्यकीचे बाण सोमदत्ताला वर्मी लागतात, तो खाली बसतो. तो बेहोष होतो. सोमदत्त बेशुद्ध झाला आहे ते पाहून त्याचा सारथी त्याला रणांगणातून बाहेर नेतो. सोमदत्त युयुधनाच्या बाणांने बाद झाला आहे ते पाहून द्रोण तेथे येतात. द्रोण सत्यकीचा वध करण्याच्या इराद्याने त्यात शिरतात. द्रोणांची ती चाल पाहून पांडवांचे वीर युधिष्ठीराच्या नेतृत्वाखाली सत्यकीला संरक्षण देण्यासाठी पुढे होतात. आता द्रोण व पांडवांत लढाई सुरू होते. द्रोण त्यांच्या बाणांच्या माराने पांडवांचे सैन्य भरून काढतात. त्यातील कांहीं बाण युधिष्ठीराला लागतात. सत्यकीला दहा लागतात. शिखंडीला वीस लागतात. भिमाला नऊ लागतात. नकूलाला पांच लागतात, सहदेवाला आठ लागतात, शिखंडीला शंभर लागतात, द्रौपदीच्या मुलांना प्रत्येकी पांच बाण लागतात. विराटाला आठ बाण लागतात, द्रुपदाला दहा लागतात, युधमन्यूला तीन, उत्तमौजसास सहा बाण ते मारतात. त्याशिवाय इतर अनेकांना ते मारतात. त्या नंतर ते युधिष्ठीराकडे त्यांचा मोर्चा वळवतात. द्रोणांच्या मारामुळे हैराण झालेले पांडवांचे सैनिक रणभूमीतून पळून जात असलेले दिसत होते. ते पाहून अर्जुन तेथे जाण्याचे ठरवतो. द्रोण अर्जुनाला येतांना पहातात व त्याचा मोर्चा त्याच्या कडे वळवतात. पुन्हा पांडव आणि द्रोण अशी लढाई होते. द्रोण पांडवांच्या सैन्याचा नाश करू लागतात. द्रोणांचा तो मारा आडवणे कोणालाच शक्य नव्हते. शेकडो मुंडकी त्या रणभूमीत पडलेली दिसत होती. असंख्य कबंध (डोक्या शिवाय धड) इतस्तः पडलेले दिसत होते. रक्ताचे पाट वाहू लागले होते. ते

पाहून पुन्हा पांडवांचे सैनिक युद्धभूमी सोडून पळत असलेले दिसत होते. अर्जुन ते पहात होता. अर्जुन कृष्णाला विनंती करतो कीं, त्याने त्यांचा रथ द्रोणाकडे न्यावा. अर्जुनाचा रथ आता द्रोणांच्या रथाजवळ येतो. अर्जुनाला द्रोणांकडे जाताना पाहून भिमाला जोर येतो व तो त्याच्या सारथ्याला तसेंच करावयास सांगतो. ते दोघे द्रोणांकडे जात आहेत ते पाहिल्यावर पांडवांचे पांचाल, श्रींजय, मत्स्य, छेड्डी, कुरुष, कौसल, कैकेया आणि इतर बरेच राजे मोठ्या जोमांने द्रोणांवर चाल करतात. पुन्हा मोठी लढाई होते. अर्जुन व वृकोदर द्रोणांवर हल्ला करतात. त्याचा बरोबर धृष्टद्युम्न असतो. त्यांच्या मागून सत्यकी मुसंडी मारतो. मोठा गोंधळ उडालेला असतो. सागराच्या लाटा उसळाव्यात तसे आवाज होत होते बाणांचे. सत्याकीच्या मागे अश्वत्थामा लागतो. त्याला भुरिश्रवाचा वध झालेला आवडत नाही. तो सत्यकीच्या रथाकडे त्याचा रथ नेतो. भिमसेनाचा प्रचंड आकार असलेला राक्षस मुलगा घटोत्कच अश्वत्थामावर धावून जातो त्याच्या प्रचंड आकाराच्या लोखंडी रथातून. ज्याच्यावर काळ्या रेड्याच्या कातड्याचे आवरण होते. त्याची लांबी व रुंदी इतर रथांच्या चौपट होती. त्या रथाची आगाशी इतर रथांपेक्षा खूप जास्त उंचावर होती. त्याच्यात अनेक आयुध बसवलेली होती. त्याच्या रथाला घोडे नव्हते त्या ऐवजी कांहीं मायावी संरचना ते काम करत होती. त्याच्या ध्वजाच्या जागी गिधाड राज होता ज्याची दोनही पंख विस्फारलेली होती. तो चौफेर त्याची नजर फिरवत आहे असे दिसत होते. एकंदरच ते सगळे घाबरवणारे होते. त्याच्या ध्वजाच्या स्तंभावर लाल रंगाचा झेंडा होता. त्याच्यावर अनेक प्राण्याची आतडी टांगलेली दिसत होती. सगळे बीभत्स होते. त्या रथाला आठ चाकं होती. त्या रथात बसून तो राक्षस मुलगा हिडींबेचा जात असताना त्याला तुमच्या सैन्याने घेरले. परंतु, त्याचे ते भीषण रुप पाहून कांहीं राजे घाबरले. त्याचे अजस्त्र रुप त्याचे भिववणारे दात, त्याचे टोकदार कान, लांब हनुवटी, अंगावरील दाट राकट केस असे सगळे पाहून कोणालाही समजत होते कीं हा मानव नाही. त्याच्या डोक्यावर एक मुकूट होता. त्याच्या कडे पाहून कोणालाही भय वाटणे स्वाभाविक होते. घटोत्कचाने एक मोठी आरोळी ठोकली त्या आवाजाने हत्तींची तारांबळ उडली, कित्येक मुतले तर कांही हगले भितीमुळे. ती लढाई रात्रीची असल्याने राक्षसांचा तो काल असल्यामुळे घटोत्कचाची ताकद जास्त झाली होती. त्याच्या यंत्रांतून मोठ्या प्रमाणात

दगड गोटे, शलाक, लोखंडी चाकं असें रणभूमीत फेकले जाऊ लागले, त्याच्या माराने कित्येक मेले. त्याशिवाय भाले, बाण असें सुद्धा फेकले जाऊ लागले त्याच्या शत्रूघ्न यंत्रांतून. असे युद्ध आधी कोणी पाहिलेले नव्हते. कर्णासह कित्येक योद्धे चक्रावून गेले. त्यांना समजेना काय करावयाचे व कसे? घटोत्कचापासून दूर जाणेंच बरे असे कांहीं समजून त्याच्या पासून ते दूर पळू लागले होते. त्या तुझ्या योद्ध्यातील एक अश्वत्थामा मात्र न घाबरता त्याच्या कडे पहात राहिला असें कीं, त्याचा मुकाबला कसा करावयाचा त्याचा तो विचार करत असतो. थोड्याच वेळांत त्याला समजते कीं ते घटोत्कचाने एक भ्रमदृष्य तयार केलेले होते. त्यांने त्याच्या पुरते ते दृष्य नाहीसे केले. त्यामुळे रागावलेला भिमपुत्र द्रोणाच्या मुलावर भीषण असे बाणांचे वर्षाव करू लागतो. त्यामुळे अश्वत्थामा जखमी होतो. घटोत्कचाचे बाण अश्वत्थामाच्या अंगात घूसून आरपार जातात व नंतर त्याच्या रक्ताने भिजलेले ते बाण मातीत घूसतात. अश्वत्थामा घटोत्कचाच्या नेमक्या जागी दहा बाण मारतो त्यामुळें भिमाच्या मुलाला फार त्रास होतो तरी तो एक चक्रायुध त्याच्यावर फेकतो ज्यामध्ये हजार बाणांची शक्ती होती. ते चक्रायुध त्याच्या कडे वेगांने यात असतांना अश्वत्थामा त्याचे असंख्य तुकडे करतो. घटोत्कच बाणांच्या माराने अश्वत्थामाला अडकवून टाकतो. त्याच वेळी घटोत्कचाचा मुलगा अंजनापर्वन अश्वत्थामावर त्याचे बाण मारण्यास सुरूवात करतो. अश्वत्थामा त्याच्या रथाचा ध्वजस्तंभ तोडतो. त्यानंतर आणखीन दोन बाण मारून तो त्याच्या सारथ्यांना बाद करतो. त्यानंतर तो राक्षसाचे धनुष्य मोडून टाकतो त्याचे घोडे मारून टाकतो. रथाचा उपयोग नाही म्हणून अंजनापर्वन त्याची समशेर घेऊन खाली उतरतो. अश्वत्थामा त्या समशेरीचे दोन तुकडे करून टाकतो. हिडींबाचा नातू त्यानंतर एक गदा घेतो. जीच्यावर सोन्याचे नक्षीकाम केलेले होते. तो ती गदा द्रोणाच्या मुलावर भिरकावतो. अश्वत्थामा ती गदा खाली पाडतो. त्यानंतर तो राक्षस आकाशात उडी मारतो. तेथून मोठ्याने ओरडत तो झाडं अश्वत्थामावर फेकू लागतो. त्यानंतर अश्वत्थामा अंजनापर्वनला बाण मारू लागतो. त्याचा कांहीं परिणाम त्याच्यावर होत नाही. आता तो घटोत्कचाचा मुलगा पुन्हा त्याच्या रथात येतो त्याच्या मायावी सिद्धीचा उपयोग करत. त्याला खाली आलेला पहातो अश्वत्थामा. ते त्याचा वध करतो. ते पाहून घटोत्कच अश्वत्थामाला बोलतो कीं, मी तुला आज ठार मारणार आहे.

जसे अग्नीने क्रौचाचा वध केला तसा मी तुझा वध करणार आहे. त्यावर अश्वत्थामा त्याला बोलतो, "अरे जा, इतरांशी तशा गप्पा मार, माझ्या पुढे नको. मला तुझ्या बद्दल कांहीं वाईट भावना नाही. तरी जर राग आला तर कांहींहीं होऊ शकते".

संजय पुढे सांगतो, अश्वत्थामाचे ते उद्धटपणाचे बोलणे ऐकतो, त्याला त्याच्या मुलाच्या मृत्यूचे दुःख झालेले असते. तो त्याला विचारतो, "अरे तुला काय मी युद्धात निकम्मा आहे असे वाटते कां? तुझ्या वाह्यात बोलण्याचा माझ्यावर कांहीं परिणाम होणार नाही. तुझे असे बोलणे योग्य नाही. मी  योग्य नाही. मी भिमाचा मुलगा आहे, मी एक पांडव आहे. पांडव कधी हार मानत नाहीत त्या प्रमाणे मीसुद्धा कधी हार मानणारा नाही. मी राक्षसांचा राजा आहे. रावणाच्या बरोबरीचा आहे, मी तुला सोडणार नाही. मी ह्या रणभूमीवर तुझी लढण्याची सगळी इच्छा पूर्ण करणार आहे". असे बोलून तो शक्तीमान राक्षस अश्वत्थामावर चालून जातो. त्यानंतर तो राक्षस अश्वत्थामावर बाणांचा बर्षाव करू लागतो. अश्वत्थामा त्याचे बाण स्वताच्या बाणांने अडवत असतो त्यामुळें त्या बाणांचा म्हणावा तसा उपयोग घटोत्कचाला होत नाही. त्याच वेळी आकाशात आणखीन एक लढाई होत होती, तेथे बाणांची लढाई होत होती त्यांच्या चमकण्यामुळे खाली प्रकाश येत होता. ते एक भ्रमदृष्य त्याने तयार केले होते. परंतु, ते अश्वत्थामा घालवतो त्याच्या मंत्रशक्तीने. घटोत्कच पुन्हा दिसू लागतो. आता तो एकाद्या अवाढव्य डोंगरा सारखा दिसू लागतो. त्या डोंगरातून वहाणार्या झर्यातून मात्र पाण्याऐवजी बाण व भाले बाहेर फेकले जात होते जे अश्वत्थामावर येत होते. त्याला बंद करण्यासाठी अश्वत्थामा वज्र अस्त्राचा उपयोग करतो. त्यामुळे ते दृष्य नष्ट होते. आता तो आणखीन एक भ्रमदृष्य बनवतो त्यात आकाशातील ढगांतून दगड धोंडे खाली कोसळू लागतात. त्याला बाद करण्यासाठी द्रोणाचा मुलगा वायव्य अस्त्र सोडतो. त्यामुळे ती ढग निघून जातात. त्यानंतर अश्वत्थामा चारही दिशांना बाणांचा वर्षाव असा करतो कीं, त्यात पांडवांचे व आपले असंख्य वीर मारले जातात. आता त्याला दिसते कीं घटोत्कच एक मोठे राक्षसांचे सैन्य आकाशातून खाली आणत आहे. ते फार भयंकर दिसणारे होते. कांहीं हत्तीवर स्वार झालेले होते. कांहींच्याकडे रथ होते तर कांहीं घोड्यावर बसलेले होते. ते पौलस्त्य आणि यतूधीन्य जातीचे होते. त्यांचे सामर्थ्य इंद्रासारखे होते. त्यांच्याकडे विविध प्रकारची आयुध होती. त्यांचे रुप घाबरवणारे होते.

त्यांना घेऊन भिमाचा मुलगा अश्वत्थामाशी लढण्यासाठी पुढे होतो. त्यांचे अवतार पाहून दुर्योधनाला काळजी वाटू लागते. ते पाहून अश्वत्थामा दुर्योधनाला बोलतो, "कांहीं काळजी करू नकोस, तुम्ही भावंड बाजूला उभे रहा. मी तुझ्या शत्रूंचा नाश करणारा आहे. तो पर्यंत तू तुझे सैन्य सज्ज करून ठेव".

दुर्योधन बोलतो, "मला नाही वाटत कीं जे तू बोलतोस ते बरोबर आहे. तरी मी मानतो कीं, तू आमचा रखवाला आहेस".

संजय पुढे सांगतो, ते बोलल्यानंतर तो शकूनीला बोलतो, "धनंजय एक लक्ष रथींशी लढत आहे. तू तुझे सहा हजार रथ घेऊन त्याच्याशी लढण्यासाठी जा. त्यानंतर तो बोलतो, कर्ण, वृषसेन, कृप, नील, तसेंच उत्तरेकडील, कृतवर्मन, पुरुमित्राचे मुलगे, दुःशासन, निकुंभ , कुंडभेदीन , पुरंजय, धृदरथ, हेमकंपन, सल्य, पुराक्रीथीन, अरुणी, इंद्रसेन, संजय, विजय, जय, जयवर्मन, सुदरसन व त्यांचे सैन्य तुम्ही जाऊन भिमाचा आणि नकूल व सहदेव ह्यांचे वध करा".

ते होत असतांना, राक्षस व द्रोणांचा मुलगा ह्यांच्यातील युद्ध विलक्षण होते. जसे इंद्र व प्रह्लाद ह्यांच्यात प्राचीन काळी युद्ध झाले होते. संतापलेला घटोत्कच अश्वत्थामाच्या छातीत जोरदार बाण असें मारतो कीं, अश्वत्थामा थोडा वेळासाठी हादरतो. त्यानंतर भिमाचा मुलगा त्याचे मोठे धनुष्य तोडून टाकतो. त्या धक्क्यातून बाहेर आल्यानंतर कृपाचा भाचा नवीन एक धनुष्य घेतो व घटोत्कचावर बाणांचा मारा सुरू करतो. त्या नंतर आकाशातील राक्षसांचा पराभव करण्यासाठी तो त्या कामाचे खास असलेले बाण आकाशाच्या दिशेने मारू लागतो. त्या बाणांमुळे ते आकाशातील राक्षस त्यांच्या सहकार्यांसह मरून पडू लागतात. युगांतात जसा नाश होतो तसा त्यांचा नाश तो करत होता. ते पाहून घटोत्कचाला फार राग येतो. तो ओरडून बोलतो त्या राक्षसांना, "अरे. त्या ब्राह्मणाला ठार मारा. ते मोठे दात असलेले, मोठा चेहरा असलेले, तोंडं सदैव उघडी असलेले, त्यांची लांब जीभ बाहेर असलेले आणि डोळे बटबटीत असलेले असे भयंकर दिसणारे मोठ्या मोठ्याने ओरडत त्यांची विचित्र आयुध घेऊन अश्वत्थामावर चाल करतात. ते चिडलेले राक्षस अश्वत्थामावर त्यांची आयुध फेकून मारू लागतात. त्या विविध शस्त्रांचा भडिमार अश्वत्थामाच्या डोक्यावर पडत असतो. त्याचा त्याला फार त्रास होतो.

तरी तो हार मानत नाही. त्याच्या पर्याप्त आयुधांनी तो ते सगळे वार उलटवतो. त्यामुळें ते रुंद छाती असलेले राक्षस चिडलेल्या हत्तीसारखे द्रोणाच्या मुलावर जोराचा हल्ला करतात. त्या हल्ल्याला तो मोठ्या धाडसाने सामोरी जातो. घटोत्कचाच्या समक्ष तो त्या राक्षसांना उत्तर देतो. युगांताच्या समयी जसा समवर्तक अग्नी असावा तसा तो त्या वेळी दिसत होता. ते तेज असे होते कीं त्याच्याकडे कोणी पाहू शकत नव्हते. तो त्या राक्षसांचा संहार करत होता. तो त्याच्या सारथ्याला आज्ञा करतो कीं, त्याला अश्वत्थामाच्या समोर न्यावे. घटोत्कच एक दैवी बनावटीचे महाशक्तीशाली अस्त्र ज्याला अशनि म्हणून बोलले जात होते व जे धुमकेतू प्रमाणे होते ते तो अश्वत्थामाच्या रथावर फेकतो. अश्वत्थामाला त्या आयुधाची माहिती असल्यामुळे तो त्याच्या रथातून उंच उडी मारतो व तो अशनी हवेतच झेलतो व तसांच राक्षसाच्या रथावर फेकतो. त्याबरोबर घटोत्कच त्याच्या रथातून उंच उडी मारतो त्यामुळे बचावतो, त्याचा रथ बेचीराख होतो. अश्वत्थामाचे ती चपळाई पाहून स्वर्गातील प्रेक्षक टाळ्या वाजवून त्याचे कौतुक करतात. आता धृष्टद्युम्न त्याला त्याच्या रथात घेतो. आता त्यांच्या लढाईत धृष्टद्युम्न प्रवेश करतो. तो अश्वत्थामावर बाणांचा वर्षाव करू लागतो. अश्वत्थामासुद्धा त्याच्यावर अनेक बाण मारत असतो. घटोत्कच व धृष्टद्युम्न अश्वत्थामाला चकवण्याचा प्रयत्न करू लागतात. ते युद्ध भीषण झाले. ते होत असतांना भिम त्याची हजार रथ व तीनशे हत्ती असलेली पलटण घेऊन तेथे पोहोचतो. द्रोणाचा मुलगा अजून थकला नव्हता. त्याची चपळाई विलक्षण होती, पहाणारे अचंबित होत होते. त्याने त्याच्या मंतरलेल्या बाणांने राक्षसांच्या एक अक्षौहिणी सैन्याचा नाश केला होता. ते भिमाच्या समक्ष झाले होते. त्याबरोबर घटोत्कच, अर्जुन व साक्षात कृष्ण असे सगळे, तो प्रकार पहात होते. सगळी रणभूमी त्या मेलेल्या राक्षसांनी व त्यांच्या मेलेल्या हत्तींनी भरली होती. त्यांच्या रक्ताच्या नद्या वाहू लागल्या होत्या. रथाचे भाग, चाकं, ध्वज त्यांचे दांडे असे सगळे त्या रक्ताच्या नदीत वहात होते. असे वाटत होते जसे काय ती नदी यमाच्या द्वारी जात आहे त्या सगळ्यांना घेऊन. राक्षस सेनेचा नाश केल्यावर तो भिमाच्या मुला मागे लागतो. तो त्याच्यावर बाणांचा वर्षाव करू लागतो. त्या बरोबर तो पांडवांच्या इतर मंडळींवरसुद्धा वार करू लागतो. प्रिशताचा मुलगा सुरथाचा वध करतो. त्यानंतर तो त्याचा धाकटा भाऊ शत्रूंजयाला यमाकडे धाडतो. त्यानंतर तो पांडवांचे वलनिक,

जयनिक, जय, प्रिशधर, चंद्रसेना, कंबोजाचे दहा मुलगे, कुंत्नूभोजाची मुलं असे मारतो. तेवढ्याने समाधान न झालेला तो द्रोणांचा पुत्र घटोत्कचावर चाल करतो पुन्हा एकदा. त्याचे बाण राक्षसाच्या अंगात शिरून आरपार जाऊन नंतर मातात खाली पडतात. त्यामुळें तो बेहोष होतो त्याच्या रथातच बसतो. सगळ्यांना वाटते कीं, तो मेला आहे. धृष्टद्युम्न त्याला आपल्या रथात घेतो व तेथून निघून जातो. ते पाहून अश्वत्थामा जोराने ओरडून त्याचा विजय जाहीर करतो. आकाशातील सिद्ध, गंधर्व, अप्सरा, नाग, पक्षी, पिशाच्च आणि पितर ते पाहून अश्वत्थामाचे कौतुक करत होते.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे त्रेपन्नावा संपला.

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे चौपन्नावा

संजय पुढे सांगतो. ज्या पद्धतीने अश्वत्थामाने द्रुपदाची मुलं, कुंत्तीभोजाची मुलं , घटोत्कच राक्षसाचा मुलगा मारले त्यावरून युधिष्ठीर, भिमसेन, धृष्टद्युम्न व युयुधन ठरवतात कीं, त्याचा बिमोड त्याला ठार मारण्यानेच शक्य होणार आहे तेव्हां त्याच्याबरोबर युद्ध करण्याचे ठरते. सत्यकीला रणांगणात पाहून सोमदत्ताला त्याचे राग आठवतात व तो सुडाच्या भावनेने प्रेरित झालेला पुढे होतो. त्यांच्यात एक धमासान युद्ध होते. जे आकाशातील पहाण्यार्यांस चांगले होते. सगळे जिंकण्यासाठी लढत होते. भिम कौरवांना दहा बाण मारतो. सोमदत्त त्या बदल्यात भिमाला शंभर बाण मारतो. सत्यकी सोमदत्ताला दहा तीव्र स्वरुपाचे बाण असें मारतो कीं, सोमदत्त जो त्याच्या मुलाच्या मरण्याने आधीच दुःखी असा, कळवळतो. त्याला त्याचे पूर्वज ययाति, नहूष आठवतात. सत्याकी साठी लढणारा भिम सोमदत्तावर एक आयुध फेकतो ज्याला परिघ म्हणतात. सत्यकी सोमदत्ताच्या छातीवर वार करतो बाणांचा. परिघ व तो जळजळीत बाण दोनही एकाच वेळी सोमदत्तावर पडतात. त्या आघाताने सोमदत्त मातीत कोसळतो. ते पाहून त्याचा पिता वल्हीक, सत्यकीवर चाल करतो. त्याच्यावर बाणांचा पाऊस पाडतो. भिम सत्यकीच्या संरक्षणासाठी वल्हकीवर चालून जातो. त्याच्यावर बाणांचा मारा करतो. तेव्हां प्रतीपाचा मुलगा वल्हकी संतापाने भिमाच्या छातीवर प्रहार करतो. भिम त्या प्रहारामुळें हलबलतो. त्यानंतर बेहोष होतो. थोड्या वेळांनी सावध होतो. एक गदा उचलून ती तो वल्हकीवर फेकतो. त्या गदेच्या फटक्याने वल्हकींचे डोके फुटते व ते मरतात. तुमच्या शूरवीर वल्हकीचा अशारितीने मृत्यू झाल्यावर त्याचे दहा मुलगे, जे प्रत्येक भार्गवासारखे होते, भिमाच्या मागे लागले. त्यांतील नागदत्त व धीरदत्त तसेंच विरवाहू, आयुभूज आणि ध्रीज, सुहस्त, वीर्गस, प्रमथ, उग्रयायीन असें भिमाकडे जात असतांना तो त्यांना पहातो. भिमाला त्यांचा फार राग येतो. त्यांच्यावर बाणांचा जोरदार मारा करू लागतो. त्यांच्या वर्मी ते तो मारत असतो. त्यामुळें ते बेहोष होतात व रथांतून खाली कोसळतात. तेसुद्धा मरतात. भिम त्यानंतर कर्णाच्या मुलांवर चालून जातो. त्यावेळी कर्णाचा भाऊ वृकारथ

भिमावर बाण मारून त्याला बेजार करतो. महाबली भिम त्यालासुद्धा वृकारथाला मारतो. त्यानंतर तुझे सात मेहूणे भिमाकडे जातात लढण्यासाठी. त्यातील सतचंद्राला तो मातीत गाडून टाकतो. ते इतर शकूनीच्या भावांना रुचत नाही. त्यातील गवाक्ष, सरभ आणि बिभू, सुभग, भानूदत्त भिमावर चालून जातात. परंतु, भिम त्या सगळ्यांना एकेका बाणांने ठार मारतो. त्यांना विशेष कांहीं करता येत नाही. ते पाहिल्यावर अनेक तुमचे राजे रणांगणातून काढता पाय घेतात. युधिष्ठीर कौरवांच्या फौजांचा नाश करू लागतो. ते तो द्रोणांच्या व दुर्योधनांच्या समक्ष करत असतो. अम्वस्थ आणि मालव तसेंच त्रिगर्त, शिवी तसेंच अभिशह व सुरसेन, वल्हीक, वस्त अशांच्या सैन्याची त्यांनी दाणादाण उडवली होती. त्यांच्या रक्ता मासांचा चिखल त्या रणांगणात झाला होता. त्याबरोबर यौधेय, मालव व मद्रक ह्यांचे मोठे सैन्य त्यांना मारून टाकले. ते होत असतांना युधिष्ठीराच्या रथाजवळ मोठ्याने ओरडा ऐकू येतो, "मारा, पकडा, भोसका, कापून टाका", अशा प्रकारचे ते ओरडणे होते. द्रोणांना ते बघवत नव्हते कीं, तुमचे सैन्य तो पांडव अशाप्रकारे खतम करत आहे. द्रोण त्याच्यावर वायव्य अस्त्राचा प्रयोग करतो. परंतु, युधिष्ठीर त्याना बाद करतो तशांच प्रकारच्या दुसर्या अस्त्रांनी. द्रोणांची चाल फसली हे त्या ब्राह्मणाला रुचत नाही. ते युधिष्ठारावर इतर अस्त्र सोडू लागतात जसें, वरुण, यम्य, अग्नेय, त्वश्त्र, सवितृ वगैरे. युधिष्ठीर त्या सगळ्यांमध्ये तरबेज असल्यामुळे ते त्याच्यावर काम करू शकत नाहीत. ते जमत नाही हे लक्षात आल्यावर द्रोण त्याचा वध करावयाचे ठरवतात, तुमच्या मुलासाठी. त्यासाठी ऐंद्रय व प्रजापत्य अस्त्रांचा उपयोग करण्याचे ठरते. त्याच वेळी युधिष्ठार हहेंद्र अस्त्र वापरण्याचे ठरवत असतो. त्याच्या मदतीने तो द्रोणांची सगळी अस्त्रं निकामी करतो. आपली चाल व्यर्थ गेली हे त्यांना अजिबात आवडत नाही. त्यांचा राग अनावर होतो व ते ठरवतात कीं, वाट्टेल ते करून त्या पांडवाचा वध करावयाचा. तो ब्राह्मण त्यासाठी ब्रह्मास्त्र वापरावयाचे ठरवतो. त्यावेळी एक दाट धुके पसरलेले होते त्यामुळे तेथे नेमके काय होत होते ते मी पाहू शकत नव्हतो. सगळे प्राणीमात्र घाबरलेले दिसत होते. युधिष्ठीर पहातो कीं, द्रोण ब्रह्मास्त्र काढत आहेत, त्याबरोबर तो त्याचे पर्याप्त अस्त्र काढतो व द्रोणांचा बेत फसतो. ते पाहून सगळे योद्धे युधिष्ठीराचे कौतुक करतात. त्यामुळें खच्ची झालेला त्यांचा गुरू, द्रुपदाच्या मागे लागतात. त्याच्यावर वायव्य सोडतात. त्यामुळे वैतागलेले पांचाल

तेथून पळून जातात. ते भिम व अर्जुन पहातात. मुकूटधारी धनंजय व भिम त्या पळणार्या योद्ध्यांना धीर देतात व थांबवतात. आता दोन जोरदार फौजांशी द्रोणांना मुकाबला करावा लागतो. ते पाहून कैकेया, श्रींजय आणि पांचाल फौजांना जोर येतो व ते द्रोणांवर चालून जातात. त्यांना मत्स्य व सतवत सामील होतात. त्या माराने द्रोण व त्यांचा मुलगा थकलेले दिसतात. कारण रात्रभरच्या युद्धाने ते थकले होते. त्यांच्या डोळ्यावर झापड येत असते.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे चौपन्नावा संपला.

# घटोत्कट वध पर्व

## भाग एकशे पंचावन्नावा

संजय पुढे सांगतो, ते अफाट सैन्य चालून येत आहे ते पाहून दुर्योधन कर्णाला बोलतो, "अरे माझ्या मित्रा, तू नेहमीच संकटात उपयोगी येणारा माझा मित्र राहिला आहेस. त्या पांडवांपासून तू आता माझ्या सैन्याला वाचवले पाहिजेस. आपले सैन्य चहोबाजूने पांचालांच्या सैन्याने घेरले आहे. त्यांना मदत करण्यासाठी कैकेया, मत्स्य, सतवत आणि पांडव फौजा येत आहेत". कर्ण त्याला बोलतो, "जरी इंद्र स्वतः अर्जुनाला वाचवायला आला तर मी त्यालासुद्धा पराभूत करीन. मी खरे तेंच बोलत आहे. त्या सगळ्यांना मी एकटा भारी आहे. तरी मी काय सांगतो ते नीटपणे ऐक, त्या सगळ्या पांडवांत एक अर्जुन सर्वात जास्त जोरदार आहे. त्याच्यावर मी मला इंद्राने दिलेले शलाक मारणार आहे. एकदा तो मेला कीं, पांडवांचा पराजय झालाच असे तू समज. कारण बाकीच्यांच काही दम नाही. त्यांना तू पुन्हा वनात पाठवून आरामात राज्य करत बस. मी जोवर जीवंत आहे तोवर तुला कोणालाही घाबरावयाचे कारण नाही. मी एकटा पांडव, कैकेया, पांचाल, मत्स्य, वृश्नी ह्यांना भारी आहे. तू काळजी अजिबात करू नकोस. त्या सगळ्यांना इतके बाण मारणार आहे कीं त्यांच्या साळुंक्या होतील". असे बोलून तो स्वतःशीच हसू लागतो. संजय पुढे सांगतो, कर्णाचे ते ऐकून कृप गालातल्या गालात हसत होते. त्यानंतर ते कर्णाला बोलतात, "अहो कर्ण, जर केवळ बडबडण्याने विजय मिळणार असेल तर तू सगळ्यांचा संरक्षक होशिल. तुझी गर्वोक्ती, तीसुद्धा दुर्योधनापुढे होत असते पण त्या प्रमाणात कधी तुझे धाडस दिसलेले नाही. भूतकाळात जेव्हां जेव्हां पांडवांशी मुकाबला झाला तेव्हां तेव्हां तू असतांनासुद्धा पांडवांनी कौरवांना पराजित केलेले आहे असा अनुभव आहे. आयत्या वेळी तू कोठे पळून जात असतोस ते समजत नाही. जेव्हां गंधर्वाने दुर्योधनाला अटक केले तेव्हां तू कोठे गायब झाला होतास. जेव्हां विराटाच्या गुरांना पळवण्यासाठी तुम्ही गेला होतात तेव्हां अर्जुनाने तुझे कपडे उतरवून पाठवले होते ते तू कसा विसरतोस"? तू कोणत्याही पांडवाला हरवू शकलेला नाहीस. असे असतांना तू अशी गर्वोक्ती कशी करतोस त्याचे मला नवल वाटते. विशेष करून जेव्हां त्यांच्या बरोबर कृष्ण

आहे. तू असे शेखी मिरवणे बंद करशिल तर बरे होईल. तुझे वल्गना करणे कोरड्या ढगांच्या गडगडाटा सारखे वाटते. असे माहीत असले तरी आपला राजा ते कां ऐकून घेतो ते समजत नाही. जोवर पार्थ आलेला नाही तोवर तुझी बडबड असते तो आला कीं, तू कोठे पळून जातोस ते समजत नाही. क्षत्रिय कमी बोलतात व करून दाखवतात, पार्थ त्याच्या कर्तृत्वाने चमकत आहे. त्याने महादेवाला प्रसंन्न केले, इंद्राला प्रसन्न केले आहे".
कृपांचे ते बोलणे कर्णाला फार लागते. तो त्याला बोलतो, "खरे क्षत्रिय असेंच गर्वोक्ती करतात, त्यामुळे त्यांना लढण्याची शक्ती प्राप्त होत असते. असें बोलण्यामुळे त्याचे भाग्य उजळत असते. जो क्षत्रिय मोठ्या जबाबदार्या झेलतो त्याला असे बोलणे आवश्यक असते. जेव्हां पार्थाला कृष्ण आणि सत्यकीसह मारावयाचे असेल तेव्हां मी असेच बोलणार, त्यामुळे मला जोर येतो. ते तुम्हाला ब्राह्मणांना नाही समजणार. माझ्या दर्पोक्तीचा प्रभाव पहाशिल तेव्हां तुला समजेल त्याची ताकद. मी दुर्योधनाला सगळी पृथ्वी जिंकून देणार आहे. ते मी आधीसुद्धा एकदा केले आहे. ते ऐकल्यावर न राहून कृप त्याला दुर्योधनाच्या समक्ष बोलतात, "तुझ्या बोलण्यावर माझा विश्वास बसत नाही. तुझ्या मनात नेहमीच पार्थ, कृष्ण व युधिष्ठीर ह्यांच्या बद्दल द्वेष आढळतो. एक गोष्ट लक्षात असू दे कीं, जेथे हे दोन कृष्ण असतात विजय तेथेंच असतो. यक्ष, गंधर्व सुद्धा त्यांना पराजित करू शकत नाहीत. युधिष्ठीर ब्राह्मणांचा फार मान राखतो. तो सद्‌गुणी आहे. तो पितरांचा व देवतांचा मान ठेवतो. तो पुण्यवंतांच्या मार्गाने जाणारा आहे. त्याच प्रमाणे तो युद्ध कलेत निष्णात आहे. तो बुद्धीमान आहे. तो प्रामाणिक आहे. त्याचे सगळे बंधू त्याच्या इतकेच गुणी आहेत. ते मोठ्यांचा मान ठेवतात. त्यांना योग्य अयोग्यचे भान आहे. ते मर्यादा समजतात, त्यांचे आप्त जे त्यांच्यासाठी लढत आहेत ते सगळे इंद्रासारखे शूर आहेत. त्यांची पाडवांवरील श्रद्धा पूर्ण आहे. असे असल्याने ते कधीच हरणार नाहीत. युधिष्ठीराचे तेज असे आहे कीं, केवळ क्रोधाने तो पाहिल तर त्यामुळे सगळे भस्म होईल अशी शक्ती त्याच्या नजरेत आली आहे त्याच्या तपस्येमुळे, ते तुला नाही समजणार. हा तुझा मूर्खपणा आहे कीं, तू नेहमी शौरीच्या विरुद्ध बोलत असतोस".
संजय पुढे सांगतो, ते कृपाचार्यांचे ऐकून कर्ण ते हसण्यावर घेतो. परंतु, जे शरदवताचा मुलगा जे बोलला ते सगळे रास्त होते. त्या पंडुच्या मुलांत ते व आणखीन कितीतरी उत्तम

गुण आहेत. तो कर्ण सांगतो कीं, "काही असो माझ्याकडे जो शलाक इंद्राने दिला आहे, माझ्या कवच व कुंडलांच्या बदल्यात , त्यांने अर्जुनाचा नाश मी करणार आहे. अर्जुन मेला कीं, पांडव संपले, त्यानंतरचे काम सोपे आहे. त्यांना वनवासात पाठवावयाचे, जे ते आनंदाने स्वीकारतील कारण त्याना दुसरा पर्याय नसेल. ह्या जगात कांहींही कारस्थानाने साध्य करता येते. म्हणून माझे ओरडणे व्यर्थ नाही हे तुम्हाला समजणार नाही, गौतमा. तुमच्या बाबत बोलावयाचे म्हणजे तुम्ही आता वृद्ध झाला अहात. त्यात तुम्ही ब्राह्मण अहात. युद्धासाठी अयोग्य असतात तुम्ही ब्राह्मण. तुम्ही पांडवांवर फार माया दाखवता, म्हणून माझा असा अपमान करत असता. पुन्हा जर माझा अपमान केला तर मी तलवारीने तुझी जिभ कापून टाकीन, हे लक्षात ठेव. तुमच्या अशा वक्तव्यामुळे कौरवांची सेना अस्वस्थ होते समजत नाही कां"? "अरे गौतमा आणखीन एक सांगतो ते नीट ऐक, येथे दुर्योधन, द्रोण, शकूनी, दुर्मुख, जय, दुःशासन, वृषसेन, सल्य, तुम्ही स्वतः, सोमदत्त, अश्वत्थामा, विविंसती, असे सगळे चिलखतात सज्ज असतांना कोणता पांडव येथे येण्याची हिम्मत करणार आहे"? "विजय दैवावर असतो, परंतु, आपले काम करत रहावयाचे असते. भिष्म, विकर्ण, जयद्रथ भुरिश्रव, सुदक्षिण, सल असे सगळे अजिंक्य समजलेले गेलेले पांडवांच्या हातून मरत आहेत कारण भाग्य त्यांच्या कडे झुकलेले आहे. म्हणून तू असे बोलत आहेस पण त्यांचेसुद्धा कित्येक योद्धे आपण मारलेले आहेत. शिवाय अजून युद्ध संपलेले नाही ह्याचे भान तुम्ही ठेवले पाहिजे. भाग्य केव्हां व कसे फिरेल ते सांगता येत नाही कोणाला म्हणून, आपण सतत प्रयत्न करत रहावयाचे असते. त्यालाच क्षत्रिय कर्तव्य समजले जाते. आता पर्यंतच्या लढाईत पांडवांनी कांहीं खास कमाल केली आहे असे मला तरी दिसत नाही. त्या पांडवांना एवढे घाबरण्याचे कारण नाही. अशा घाबरण्यानेच त्यांची ताकद वाढत आहे. म्हणून असे बोलणे, विचार करणे बंद करा. मी माझ्या सगळ्या शक्तीनिशी दुर्योधनासाठी लढत रहाणार आहे बाकी नशिबावर सोडू.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे पंचावन्नावा संपला.

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे छप्पन्नावा

संजय पुढे सांगतो, कृपांबद्दल कर्णाचे ते कठोर बोलणे ऐकून अश्वत्थामा चिडतो व त्याची तलवार घेऊन तो कर्णावर चालून जातो. ते दुर्योधन पहात असतो. अश्वत्थामा त्याला पुढे बोलतो, "कृप मामा फक्त अर्जुनाच्या उत्तम गुणांची तारिफ करत होते जे एका खर्या योद्ध्यास शोभते. खरा योद्धा शत्रूच्या गुणांचीसुद्धा स्तुती करत असतो कारण ते उत्तम गुण असतात, मग ते कोणांचे ते महत्वाचे नसते. ते न समजून घेता तू असे क्रूर बोलत आहेस त्यासाठी तुला शासन झालेच पाहिजे. तुझ्या सारख्या उद्धट व घमेंडखोराला त्याची जागा दाखवलीच पाहिजे. अरें घमेंडखोरा, तुझ्या समोर जयद्रथाचा वध पार्थाने केला तेव्हां तू कां त्याला वाचवण्याचा प्रयत्न केलास? तू त्याला पराभूत करण्याच्या गोष्टी करत आहेस ज्याने महादेवाला पराभूत केले आहे. सगळे दानव, देव एकत्र येऊन अर्जुनाशी लढले असतां त्यांने त्या सगळ्यांना हरवले आहे ते तू विसरलास कां? त्याचा कृष्ण साथी आहे". असे बोलून अश्वत्थामा कर्णाला आव्हान देतो कीं, असे जर तो नेहमी बोलत रहाणार असेल तर मी त्याची डोके धडापासून वेगळे करण्यास मागेपुढे पहाणार नाही.

संजय पुढे सांगतो, ते बोलल्यानंतर द्रोणांचा मुलगा कर्णावर धाव घेतो. परंतु, दुर्योधन व कृप स्वतः त्याला आवरतात. ते झाल्यावर कर्ण बोलतो कीं, हा फालतू ब्राह्मणाचा कारटा स्वताला मोठा शूरवीर समजतो. त्याला धरून ठेवू नका. त्याला येऊ द्या माझ्या अंगावर म्हणजे समजेल क्षत्रियांचे अंगावर जाण्याने काय होते ते. अश्वत्थामा बोलतो, "अरे मूर्खा, तुला आम्ही माफ करतो त्यामुळे तुझी मस्ती वाढत आहे. पण तो तुझा गर्व अर्जुन मोडून काढणार आहे यथावकाश".

दुर्योधन अश्वत्थामाला शांत करण्याचा प्रयत्न करतो. अरे ब्राह्मणा तू त्याला माफ कर. तू त्या सुतावर रागावणे तुझ्या योग्यतेला शोभत नाही. आपल्या युद्धाची सगळी मदार तुम्हा लोकांवर अवलंबून आहे. अशा परिस्थितीत तुझे असे एकमेकांवर रागावणे बरोबर नाही. कृपया रागावणे बंद करा. पांडव त्यांच्या फौजा घेऊन आपल्या कर्णावर चाल करून येत

आहेत. म्हणून सज्ज व्हा. अशारितीने दुर्योधन ते भांडण मिटवतो. त्यानंतर पोक्त स्वभावाचे कृप कर्णाला बोलतात, "अरे सुताच्या मुला, तुला आम्ही माफ करत आहोत. परंतु, फाल्गुनी तुला माफ करणार नाही हे लक्षात ठेव".

संजय पुढे सांगतो, त्यावेळी पांडव सर्व तयारीनिशी पांचालांच्या बरोबर मोठ्या मोठ्याने आरोळ्या ठोकत कौरवांवर चालून जातात. त्यांचा मुकाबला करण्यासाठी कर्ण त्याच्या फौजानिशी सज्ज असतो. त्यानंतर कर्ण व पांडवांच समर सुरू होतो. त्या लढाईत सैनिक जोरांने आव्हानात्मक ओरडत होते. ते बोलत होते, "कर्ण कोठे आहे? त्याला शोधा". ते कर्णाला आव्हान देत असतात, बोलत असतात, "अरे नीच माणसां, आता आमच्याशी लढावयाला तयार हो". जे त्याला पहातात ते त्याच्या कडे हातवारे करत बोलतात, "हा पहा तो नालायक कर्ण त्याला मारून टाकू. त्याला जीवंत ठेवण्यात अर्थ नाही. तो पार्थाचा शत्रू आहे. तो दुर्योधनाचा चमचा आहे. सगळ्या पापाचा तो कारण आहे ज्यामुळे हे युद्ध आरंभ झाले आहे". असें बोलत ते पांडवांचे मित्र योद्धे कर्णावर बाणांचा जोरदार मारा सुरू करतात. ते आव्हान पाहून कर्ण घाबरलेला वाटला नाही. त्याची हिम्मत कमी झाली नव्हती. उलट त्याचा उत्साह वाढलेला दिसत होता. तो सुद्धा बाणांचा वर्षाव करू लागतो. पांडवांच्या योद्ध्यांच्या बाणांना तो चांगले प्रत्यूत्तर देत असतो. ते एक भीषण युद्ध होते. कर्ण त्याचे नांव असलेले बाण मारून पांडवांच्या योद्ध्यांच्या रथावरील झेंडे, दांडे तोडून काढत असतो. थोड्या काळातच ते राजे कर्णाचा मुकाबला करण्यास असमर्थ असल्याचे दिसू लागते. ते तेथून काढता पाय घेत असल्याचे दिसू लागतो. कर्णाच्या बाणांने त्यांचे हत्ती, घोडे मरून पडू लागतात. सगळी रणभूमी त्या मेलेल्या लोकांच्या शवांनी भरलेली दिसत होते. कांहींची फक्त तुटून पडलेली डोकी दिसत होती तर कांहींचे फक्त धडं (कबंध) दिसत होती. कांहीं मरणासन्न अवस्थेत पडलेले योद्धे दिसत होते, त्यांचे शेवटचे कण्हणं ऐकू येत होते. ते पाहून खूष झालेला दुर्योधन अश्वत्थामाला बोलतो, "पहा कर्णाची हिम्मत, पहा कसे पांडवांचे सैन्य पळत आहे. जसे कार्तिकेयापुढे असुरांच्या सैन्याचे झाले होते तसे झालेले दिसत आहे. आपल्या लष्कराची दैना कर्णाने केली आहे ते विभत्सू पहातो व तो तेथे येण्यास निघतो. कर्णाचा वध करण्याशिवाय हे थांबणार नाही असें तो स्वताला

समजावतो. अर्जुन कर्णाकडे जात असलेले कौरवांचे सगळे पहात असतात. त्यात कृतवर्मन, अश्वत्थामा, सल्य, कृप इतर मोठे योद्धे असतात.
धृतराष्ट्र विचारतात, "अरे सुता, मला सांग त्याला येतांना पाहून कर्णाची काय प्रतिक्रीया झाली"? तो महारथी विकर्तनाची मुलगा, जो नेहमी पार्थाला आव्हान देतो, त्याला अचानकपणे पुढे आलेला पाहून त्यांने काय केले"?
त्याला येतांना पाहून कर्णाने त्याचा रथ अर्जुनाकडे नेण्यास सांगितले त्याच्या सारथ्याला. परंतु, पार्थाने त्याच्या बाणांने कर्णाला घेरले होते. कर्णाने त्याच्यावर तीन बाण मारले. अर्जुनाला त्याचे ते वागणे आव्हान दिल्यासारखे वाटते, त्याला ते रुचत नाही. तो तीस बाण कर्णावर फेकतो. त्या मारामुळे कर्णाचे धनुष्य त्याच्या हातातून खाली पडते. परंतु, तो त्वरित ते धनुष्य उचलतो व पार्थावर बाणांचा मारा करू लागतो. त्यांचे द्वंद्व जोर धरते. कोणी कमी ठरत नाही. पहाणार्यांसाठी ते विलक्षण आनंद देणारे होते. जो थकतो तो हरतो ह्या नियमाप्रमाणे कोणीही थकत नव्हता. अखेरीस कर्णाचा तिरकमटा मोडतो. त्यानंतर पार्थ कर्णाचे घोडे मारतो. त्याच्या सारथ्याला मारतो. रथ घालवलेल्या बेसहारा कर्णावर नंतर तो आणखीन चार जोरदार बाण मारतो. कर्ण त्या रथातून उडी मारून उतरतो व कृपाच्या रथात चढतो. त्या द्वंद्वात कर्ण पार्थाकडून हरलेला होता. ते पाहून तुमचे इतर योद्धे इतस्ततः पळून जातात. दुर्योधन त्यांना ओरडून सांगतो कीं, "असे पळू नका, मी तुमच्यासाठी पार्थाला मारण्यासाठी येत आहे. माझे युद्ध सामर्थ्य आता तुम्ही पहा. मर्दानो मी कसा पार्थाला नमवतो ते पहा. ते एकदा पाहीले कीं, तुमच्या मनातील भिती नाहीशी होईल. माझे सामर्थ्य पाहून पार्थ पुन्हा कधी लढण्याचा विचारसुद्धा करणार नाही माझ्याशी". असे बोलून तुझा मुलगा अर्जुनावर चाल करतो. ते पाहून कृप अश्वत्थामाला बोलतात, "तो पहा विवेक घालवलेला दुर्योधन अर्जुनाला आव्हान देण्यासाठी जात आहे. जसे किटक ज्योतीवर झडप घालतो. तो मरण्या आधी त्याला ह्या द्वंद्वांपासून दूर रहाण्यास सांग. कारण जर ते द्वंद्व झाले तर युद्ध आताच संपेल. आपण असतांना राजाला लढावे लागणे चांगले नाही. तू जर हे द्वंद्व थांबवले नाहीस तर कुरु वंश नष्ट होईल". मामाचे ते ऐकल्यावर अश्वत्थामा दुर्योधनाकडे जातो. त्याला बोलतो, "आम्ही जीवंत असतांना आपल्याला लढावे लागणे योग्य वाटत नाही. आम्ही आपले हितचिंतक प्रथम लढणार व

आम्ही गेलो तरच तुम्हाला शस्त्र हातात घ्यावे लागेल. पार्थाचे पारिपत्य करण्यासाठी आम्ही आहोत. आपण दूर व्हावे". द्रोण नेहमी पांडवांची बाजू घेत असतांना तू त्यांचा मुलगा असें कसे बोलत आहे. मला माहीत आहे तुमचे युधिष्ठीरावर व द्रौपदीवर फार प्रेम आहे. त्यांना तू तुझे आप्त समजता. असे असतांना आताच का हा पुळका तुला आला"? मला जिकवण्यासाठी जे आले ते सगळे यमाकडे गेले हेच माझे दुर्भाग्य आहे. तू गौतमाच्या मुलीचा मुलगा सशस्त्र धारी असा योद्धा माझ्या शत्रूचा नाश करू शकेल कां"?

देव, दानव तुझ्या पुढे टिकत नाहीत हे मला माहित आहे. अरे द्रोणाच्या सुपुत्रा जा त्या पांचालाना व पांडवांना यमाकडे पाठवून दे. सोमक व पांचाल मोठे थोर लढवय्ये आहेत. ते माझ्या फौजांचा नाश करत आहेत. अरे महायोद्ध्या, तुला त्या कैकयांचा सुद्धा बंदोबस्त करावयाचा आहे. वेळीच कारवाई नाही केली तर ते कौरवांचा संहार करून टाकतील. अर्जुनाच्या मदतीने. अरे ब्राह्मणा तुझा जन्म पांचालांच्या नाशासाठीच झाला आहे हे लक्षात घे. तुझे सैन्य घेऊन तू पांचालांवर हल्ला करण्यासाठी जा. तुझ्यापुढे देवांचा टिकाव नाही लागत तर पांचाल काय टिकणार"? माझे शब्द खरे कर. मला माहित आहे, पांडव व सोमक तुझ्यापुढे टिकणार नाहीत. आता उशीर न करता त्यांच्यावर चालून जा. ते पहा आपले सैन्य पार्थाच्या बाणांना घाबरून पळत आहे.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे छप्पन्नावा संपला.

## घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे सत्तावन्नावा

संजय पुढे सांगतो, दुर्योधनाची ती आज्ञा झाल्यावर अश्वत्थामा त्याला बोलतो, "जसे आपण सांगता तसेंच होईल. खरे पहाता पांडव आम्हा दोघांना (द्रोण व स्वतः) प्रिय आहेत. त्यांनासुद्धा आम्ही फार प्रिय आहोत. तरी जर युद्धाचा प्रसंग असेल तर मी माझे कर्तव्य पार पाडल्याशिवाय रहाणार नाही. आम्ही सगळे कृप, कर्ण, सल्य, कृतवर्मन पांडवांना पराभूत करू. पण जर आम्ही नसू तर ते कौरवांचा खतमा करतील कांहीं क्षणात. जोवर पांडव जीवंत आहेत तोवर त्यांचा पराभव शक्य नाही. सगळे पंडुपुत्र फार शक्तीमान आहेत. ते सुडाच्या भावनेने लढत आहेत त्यामुळें त्यांच्या प्रत्येक बाणात त्वेष आहे. ते शापाने भरलेली लढाई करत आहेत, न्यायासाठी. म्हणून ते तुझे सैन्य नष्ट करत आहेत. तुम्ही स्वार्थी अहात, कौरव बदमाष आहेत म्हणून तुमचे भाग्य कधीच उदयास येणार नाही. तू तुझ्या करता काम करणार्यांवर सुद्धा विश्वास ठेवत नाहीस, माझ्या पित्याचा सतत अपमान तू करत असतोस त्यामुळे जरी आम्ही कितीही चांगले लढलो तरी शेवटी विजय सत्याचा म्हणजे युधिष्ठीराचाच होणार असे जे माझे तात सांगतात ते खरे होणार आहे. आम्ही लढतो कारण आम्ही खाल्या अन्नाला जागत आहोत. त्यात विश्वास नाही, श्रद्धा नाही व प्रेमसुद्धा नाही हे लक्षात असू दे दुर्योधना. तरीसुद्धा आता मी लढण्यासाठी जाणार आहे. त्यामुळे जे पाप होणार त्याचा धनी तू असशिल. मी पांचालांशी, सोमकांशी, कैकेयांशी व पांडवांशी लढणार आहे. माझ्या बाणांमुळें तुझे शत्रू चारही बाजूंना पळून जात असलले तू पहाशिल. ते पाहून यमाचा मुलगा दुःखी होणार हे मला माहीत आहे पण त्याला माझा इलाज नाही. माझ्या बाणातून कोणीही सुटणार नाही. एवढे बोलून तो युद्धासाठी निघतो. तुझ्या मुलाच्या भल्यासाठी तो लढणार असतो. जरी त्याला पांडवांशी लढण्याची इच्छा नव्हती. रणभूमीत आल्यावर तो पांचालांना व कैकेयांना बोलतो, "अहो शूर योद्ध्यानो, माझ्यावर तुमच्या सगळ्या शक्तीने हल्ला करा. तुमचे कौशल्य दाखवा. ते ऐकून तेथे असलेले सत्तेचाळीस योद्धे त्याच्यावर बाणांचा भडिमार करतात. तो मारा चुकवत अश्वत्थामा त्यांच्या पैकी दहा जण मारतो. दृष्टद्युम्न ते पहात असतो. इतर

पांडवसुद्धा ते पहात असतात. उरलेले योद्धे पळून जातात. आपले योद्धे पळत आहेत ते पाहिल्यावर धृष्टद्युम्न अश्वत्थामावर जातो. त्याच्या बरोबर त्याचे खास योद्धे त्यांच्या शस्त्र सामुग्रीसह द्रोणाच्या मुलावर चालून जातात. तो अश्वत्थामाला बोलतो, "अरे मूर्खा, त्या मामुली लोकांना कां मारण्यात तू तुझी शक्ती व्यर्थ घालवत आहेस"? तू खरा असशिल तर माझ्याशी द्वंद्व करून दाखव. असं बोलून तो द्रोणाच्या मुलाच्या वर्मी कांहीं बाण मारतो. ते सहन करत अश्वत्थामा त्याला बोलतो, "जरा थांब, माझ्या पुढून हलू नकोस, मी तुला यमाकडेच आता धाडतो कसा ते पहा". त्यानंतर तो प्रिशताच्या मुलाला सर्व अंगात बाणं मारतो. ते झाल्यावर तो त्याला बोलतो कीं, "अरे तुला माझे मूळ काय आहे ते माहीत आहे कां? तुझ्या पित्याचा वध केल्याशिवाय मी मरणार नाही ते तुझ्या ध्यानात आलेले दिसत नाही. ही रात्र सरल्यानंतर जो युद्धाचा सतरावा दिवस उगवेल त्या दिवशी मी द्रोणाला ठार मारणार आहे हे विधीलिखीत आहे, ते समजून प्रथम घे. त्यानंतरच मी जाणार आहे हे जग सोडून". "म्हणून जेवढा तिरस्कार तुला पांडवांबद्दल दाखववायाचे आहे तो दाखव. माझ्या तावडीतून तुझी सुटका होणार नाही. ज्या ब्राह्मणाने त्याचे कर्तव्य सोडले व क्षत्रिय पिंडाचा आश्रय घेतला तो तत्वतः ब्राह्मण राहिला नाही असें समजले जाते". असें अपमानास्पद बोलल्यानंतर अश्वत्थामाला फार राग येतो व तो चिडून बोलतो, "थांब, थांब, असे बोलत तो रागाने धृष्टद्युम्नाकडे पहातो. त्यानंतर तो पांचालावर बाणांचा वर्षाव करतो. परंतु, त्या वर्षावाचा त्याच्यावर कांहींच परिणाम होत नाही. त्यांचे द्वंद्व होत होते कोणीही हटायला तयार नव्हता. आकाशात बसलेले सिद्ध व चरण त्या द्वंद्वांची मजा लुटत होते. ते द्वंद्व सगळे पहात रहातात त्यामुळे इतर योद्धे त्यांची लढाई बंद करून ते द्वंद्व पहात रहातात. ते होत असतांना ते प्रेक्षक योद्धे त्यांची रणवाद्ये जोरांनी वाजवू लागतात. थोड्या वेळानंतर अश्वत्थामा धृष्टद्युम्नाचे रथाचे घोडे, सारथी, ध्वज असें सगळे निकालात काढत जातो. त्यामुळें प्रिशताचा मुलगा युद्ध सोडून जातो. त्याचा तो आवेश पाहून पांडवांचे इतर लढवय्ये घाबरून जातात. अश्वत्थामा पांचालांचे अनेक योद्धे अर्जुनाच्या समोर ठार मारतो. पांचालांचे व श्रींजयांचे योद्धे रणभूमी सोडून पळून जातात. शेकडो शत्रूपक्षाचे सैनिक मारल्यानंतर अश्वत्थामा एका वेगळ्या तेजाने चमकू लागतो.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे सत्तावन्नावा संपला.

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे अठ्ठावन्नावा

संजय पुढे सांगतो, त्यानंतर युधिष्ठीर, भिमसेन, नकूल व सहदेव इतर राज्यांच्या सह अश्वत्थामाला गराडा घालतात. ते पहाताच दुर्योधन त्याला मदत करण्यासाठी तेथे आपले सैन्य पाठवतो. त्यानंतर पुन्हा एक भयानक युद्ध सुरू होते. युधिष्ठीर रागात कौरवांचे अमवश्थ, मालव, वंग, शिवी, त्रिगर्त लोकांची सेना नष्ट करत जातो. भिम अभिशह, सुरसेना व इतर क्षत्रिय फौजांचां नाश करतो. त्यांच्या रक्ताचा चिखल झाला होता. अर्जुन पहाडी लोकांचे सैन्य, यौधेय राजे, मद्रक, मालव असे राजे मारून टाकतो. मेलेल्या हत्तींच्या सोंडी मातीत वळवळत होत्या त्यामुळे मोठे साप तेथे वावरत आहेत असे कोणाला वाटले असते. त्या सुमारास द्रोणांच्या रथाजवळ कांहीं गडबड झाली होती. त्यांच्यावर हल्ला करणारे पांडवांचे मोठ्याने ओरडत बोलत होते, "धरा, मारा, पकडा, तुकडे करा" असें ते होते. द्रोण मात्र वायव्य अस्त्राच्या मदतीने तो मारा व्यर्थ ठरवत होते. त्यानंतर पांचाल तेथून पळून जातात. ते सगळे भिम व अर्जुनाच्या समोर होत होते. ते दोघे त्या पळणार्या त्यांच्या लष्कराला पळण्यापासून थांबवतात. त्यानंतर एक मोठी फौज घेऊन ते द्रोणांच्या फौजेवर चालून जातात. विभत्सू उजवीकडून व भिम डावीकडून असें ते द्रोणांवर चाल करतात. त्यावेळी तुमचे एक मोठे सैन्य द्रोणांना मदत करण्यासाठी तेथे पोहोचते. त्यांचा संहार अर्जुन करतो. त्याशिवाय अंधारामुळे ते पांगतात. त्या पांगणार्या तुमच्या फौजा एकत्र आणण्याचा प्रयत्न दुर्योधन करत असतो. परंतु त्यात त्याला यश येत नाही. अंधार वाढत होता.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे अठ्ठावन्नावा संपला.

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे एकोणसाठावा

संजय पुढे सांगतो, सत्यकी पहातो कीं सोमदत्त त्याच्या तिरकमट्याने नेम धरत आहे. ते पाहिल्या नंतर तो त्याच्या सारथ्याला सांगतो कीं, त्यांचा रथ सोमदत्ताकडे न्यावा. त्याला बोलतो, "अरे सुता, मी आज ह्याचा वध केल्याशिवाय रहाणार नाही. हा सर्वात खराब कौरव आहे, वल्हीकाचा मुलगा आहे". ते ऐकल्यावर सारथी त्यांचा रथ तेथे नेतो. सोमदत्त पहातो कीं, सत्यकी त्याच्या दिशेने येत आहे. ताबडतोब तो त्याच्यावर बाणांच्या फेर्या झाडू लागतो. युयुधनसुद्धा तेंच करतो व दोघांत द्वंद्व सुरू होते. सोमदत्त सत्यकीला साठ बाण मारतो. ते दोघे एकमेकांच्या बाणांने जखमी होतात. रक्तबंबाळ झालेले ते त्यांचे द्वंद्व चालूच ठेवतात. त्या दोघांच्या अंगात इतके बाण घुसलेले होते, ते दोघे साळूंकी सारखे दिसत होते. सोमदत्त सत्यकीचे धनुष्य तोडून टाकतो. त्यानंतर तो युयुधनाला पंचवीस बाण मारतो. सत्यकी नवीन धनुष्य घेतो व सोंदत्ताला पांच जोरदार बाण मारतो. सोमदत्ताचा झेंडा व त्याचा दांडा असें सगळे मोडून टाकतो. त्यानंतर एका धारदार बाणांने सिनीच्या नातवाला जखमी करतो. सत्यकी सोमदत्ताचे धनुष्य मोडून टाकतो. सोमदत्त दुसरे धनुष्य घेऊन सत्यकीवर बाणांचा मारा करू लागतो. ते द्वंद्व चालू असतांना मध्येच भिम येतो सत्यकीला मदत करण्यासाठी. तो सोमदत्ताला दहा बाण मारतो. त्याबरोबर सोमदत्त भिमाला अनेक बाण मारून बेजार करतो. युयुधन सोमदत्ताच्या छातीवर एक परिघ अस्त्र फेकतो. ते लोखंडाचे होते. पुन्हा सत्यकी सोमदत्ताचे धनुष्य तोडतो. त्यानंतर सत्यकी सोमदत्ताचे चारही घोडे यमाकडे धाडतो. त्यानंतर सत्यकी सोमदत्ताच्या सारथ्याचे डोके उडवतो. त्यानंतर आणखीन एका धारदार बाणांने सोमदत्ताच्या छातीत असे मारतो कीं, सोमदत्त रथातून व खाली पडतो यमाकडे जाते. सोमदत्ताचा वध झाला आहे ते सजल्यावर तुमच्या सैन्याची एक मोठी तुकडी त्याच्यावर चाल करते. त्याच वेळी पांडवांचे सैन्य प्रभाद्रकांच्या बरोबर द्रोणांवर हल्ला करण्यासाठी सज्ज झालेले होते. द्रोण युधिष्ठीराला पांच बाण मारतात. त्यामुळें चिडलेला युधिष्ठार अश्वत्थामाचे सैन्य कापण्यास सुरूवात करतो. द्रोण ते पाहून संतापाने युधिष्ठीराच्या कडे जाऊ लागतात. ते दोघे

एकमेकांना बाण मारतात. द्रोण युधिष्ठीराचा ध्वज फाडतो. त्यानंतर त्याचे धनुष्य तोडतो. धर्माचा मुलगा नवीन धनुष्य घेतो व द्रोणांचे घोडे, सारथी आणि रथ सगळे हजार बाण मारून मोडून टाकतो. त्या झटक्याने वृद्ध द्रोण त्यांच्या रथात खाली बसतात. थोड्या वेळांनी सावध होतात. ते वायव्य अस्त्र सोडतात युधिष्ठीरावर. परंतु, सावध युधिष्ठीर ते वळवतो दुसरी कडे म्हणजे आपल्याच सैन्यावर, त्यामुळे आपल्या अनेक लोकांचा नाश होतो. पुन्हा युधिष्ठीर द्रोणांच्या धनुष्याचे तुकडे करतात. द्रोण पुन्हा एक नवीन तिरकमटा काढतो. तो पांडव तेसुद्धा मोडून टाकतो. ते पाहून कृष्ण युधिष्ठीराला सांगतो, "मी काय सांगतो ते नीट ऐक, द्रोणाबरोबर लढण्यात अर्थ नाही. द्रोण तुला पकडण्याचा सतत प्रयत्न करत असतात, म्हणून तू त्यांच्याबरोबर जास्त लागू नकोस. ज्याला द्रोणांचा वध करण्यासाठी योजलेले आहे तो त्याची वध करणार आहे. द्रोणाला सोडून तू दुर्योधनाच्या मागे लागलास तर ते जास्त बरे होईल. राजाने राजांशी लढावयाचे असते हा नियम तुला माहीत आहे. तुझी फौज घेऊन तू भिम आहे तेथे जा व त्याला मदत कर. ते ऐकल्यावर युधिष्ठीर त्या प्रमाणे भिम जेथे होता कौरवांशी लढत तेथे जाऊ लागले. त्यांनी नंतर कौरवाचे सैन्य कापून काढण्यास सुरूवात केली. द्रोण पांचालांच्या फौजांचा पराभव करण्या गुंतले होते त्या रात्रीच्या लढाईत.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे एकोणसाठावा संपला.

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे साठावा

संजय पुढे सांगतो, ती रात्रीची लढाई होत असतांना सगळे जग अंधारात झोपलेले होते. लढणारे राजे एकमेकांना पाहू शकत नव्हते. सगळी द्वंद्व केवळ अंदाजाने केली जात होती. नांवाने, आवाजाने असें ते शत्रूला ओळखत होते. त्यामुळें अनेक सैनिक चुकींने मारले जात होते. त्या युद्धात द्रोण, कर्ण, भिम, धृष्टद्युम्न, सतवत, अर्जुन असे दिग्गज लढत होते. त्या लढाईत ह्या महायोद्ध्यांच्या दबावाखाली ते सैरावैरा पळून जात होते. त्यांचा मोठा संहार झाला होता. त्या लढाईत चुकीचे योद्धे मारले जात होते व ते होत होते कारण तुमच्या मुलाचे मूर्ख धोरण.

धृतराष्ट्र विचारतात, "त्या अंधारामुळे तुझ्या मनाची कशी अवस्था झाली होती? तुमची सगळी ताकद पांडवांचा मुकाबला करण्यात खर्च होत होती. त्या अंधारात, ते एकमेकांना कसे पाहू शकत होते"?

संजय बोलतो, जे सैन्य उरलेले होते ते त्यांच्या सेनानींच्या आज्ञेने पुन्हा व्युहासाठी सज्ज झाले होते. द्रोण आघाडीला होते. सल्य पिछाडीला होते. शकूनी व त्याचे बंधू उजव्या व डाव्या बाजूला होते. दुर्योधन उजव्या बाजूला राहून सगळ्यांचे व्यवस्थापन करत होते. दुर्योधन पायदलातील सैनिकांना सांगतो कीं तुम्ही न लढता फक्त मशाली हातात घेऊन असा. आकाशात असलेले स्वर्गातील प्रजाजन, देव, ऋषी, गंधर्व, राजर्षी, विद्याधर, अप्सरा, नाग, उरूग, यक्ष, किन्नर वगैरे सुद्धा हातात मशाली घेऊन उभे होते. त्या मशालीत सुगंधी तेल होती. कांही तेल नारदानी व पर्वत ऋषीनी दुर्योधनाच्या विनंतीमुळे दिली होती. त्या प्रकाशात ते युद्ध होत होते. योद्ध्यांची अंधारात लढण्याची क्षमता तशा प्रकारे तपासली जात होती. कौरवांचे सैन्य त्यांच्या चमकणार्या गणवेषामुळे त्या अंधारातसुद्धा स्वच्छ दिसत होते. त्यांमुळे ते सहजपणे मारले जात होते. पांडव अंधारात जास्त दिसत नसल्यामुळे कमी मारले गेले होते त्या रात्रीच्या युद्धात. अशी लढाई असावी ही तुमच्या मूर्ख मुलांची कल्पना होती हे विशेष. प्रत्येक रथावर पांच मशाली होत्या. प्रत्येक हत्तीवर तीन मशाली होत्या. प्रत्येक घोड्यावर एक मशाल होती. अशी प्रकाशाची

व्यवस्था केलेली होती. ते सगळे पहाणार्यांना सुख देत होते. सैनिकांच्या अंगावरील चमकणार्या कपड्यामुळे त्या मशालींचा प्रकाश वाढत होता. त्यांमुळे लढणे शक्य होत होते. अंगावरील वस्त्रामुळे शत्रू का मित्र ते ओळखणे शक्य होत होते. लढतांना वेगाने जाणारे बाण त्याच्या चमकदार टोकांनी समजत होते. तसेंच शलाक, भाले सुद्धा समजत होते. तेथे असंख्य दिवे त्याप्रमाणे चमकत होते जसे काजवे चमकावेत. सैनिकांच्या अंगावरूल दागिनेसुद्धा त्यात भर घालत होते.

पांडवांच्या प्रत्येक हत्तीवर सात मशली होत्या. प्रत्येक पाईक एक मशाल घेऊन होता. त्या लढाईत पायदलाचे दोनही बाजूचे लढत नव्हते, ते फक्त मशाली घेऊन रणांगणात फिरत होते. पांडवांच्या प्रत्येक रथावर दहा मशाली होत्या. प्रत्येक घोड्यावर तीन दिवे होते. अशारितीने दोनही सैन्याचे लोक स्वयंप्रकाशित झाले होते. त्या दोनही सैन्याचा प्रकाश लढण्यासाठी पुरेसा होता. सगळे एकमेकांना पाहू शकत होते. ती रात्रीची लढाई पहाण्यासाठी सगळे आकाशातील लोक जसे ऋषी, देव, यक्ष, गंधर्व, अप्सरा ते सुद्धा पहाण्यासाठी गर्दी करतात. त्यांच्या बरोबर युद्धात मारल्या गेलेल्या योद्ध्यांचे आत्मे सुद्धा तेथे जमा होऊन ते युद्ध पाहू शकत होते. ते दिव्यानी झगमगणारे सैन्य पहाण्यास मोठे मनोरंजक होते. जसे योद्धे मरत होते त्यांचे दिवे विझत असतं. त्यामुळे रणांगणातील प्रकाश त्याप्रमाणात कमी होत होता.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे साठावा संपला.

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे एकसष्ठावा

संजय पुढे सांगतो, अशारितीने उजळलेल्या रणांगणात योद्धे एकमेकांचा जीव घेण्यासाठी उताविळ झालेले दिसत होते. त्या लढाईत बाणांपेक्षा तलवारी, समशेरी, दांडपट्टे, सुरे, बरच्या अशा शस्त्रांचा उपयोग करण्याचे ठरले होते त्याप्रमाणे ते सैनिक त्यांची शस्त्रं घेऊन सज्ज झाले होते. चौफेर दिव्यांचा प्रकाश पसरलेला होता जरी तो सूर्याच्या प्रकाशा सारखा प्रभावी नव्हता तेवढ्या प्रकाशात ते लढू शकत होते. योद्धा योद्ध्याबरोबर, घोडस्वार घोडेस्वाराबरोबर, हत्ती हत्ती बरोबर, रथी रथीबरोबर असे युद्ध होणार होते. क्षात्रतेजाने उन्मत्त झालेले ते सगळे योद्धे, त्यात आनंद मानत होते. तुमच्या मुलाच्या आदेशांनी ते त्या रात्रीचे युद्ध प्रारंभ होणार होते. ते युद्ध भीषण होते. अर्जुनानी कौरवांच्या सगळ्या फळ्या फोडण्यास सुरूवात केली. त्यामुळे तुमचे राजे घाबरून गेले. ते सपाटा फारच भयंकर होता.

धृतराष्ट्र विचारतात, "जसे अर्जुनाचे सैन्य कौरवांच्या फळ्या तोडून संहार सरू लागले तुझ्या मनाची काय अवस्था झाली? माझ्या सैनिकांची काय अवस्था झाली ते मला सांग. दुर्योधनाने काय केले? अर्जुनाला तोंड देण्यासाठी माझे कोणते योद्धे पुढे झाले? अर्जुनापासून द्रोणांना संरक्षण देण्यासाठी कोण नेमलेले होते? द्रोण शत्रूंचा संहार करण्यासाठी जात असतांना त्याच्या पुढून कोण होते आपले? त्यानंतर द्रोण कसे मरतात त्या युद्धात ते मला समजून घ्यावयाचे आहे. तू नेहमी माझ्या शत्रूपक्षाबद्दल चांगलेच बोलत असतोस. त्यांचे कौतुक करत असतोस, तशा प्रकारे तू कधी माझ्या मुलांबद्दल कां बोलत नाहीस"?

संजय बोलतो, द्रोणांच्या मर्जीप्रमाणे, दुर्योधन त्या रात्री, त्याच्या भावांना व त्यांच्या सहकार्याने उद्देशून बोलतो, "तुम्ही शूर योद्धे, ऐका मी काय सांगतो ते, द्रोणांना संरक्षण देण्याची तुमची जबाबदारी आहे. कृतवर्मन त्याची उजवी बाजू पाहिल व सल्य डावी बाजू सांभाळेल". त्यानंतर तो त्रिगर्तांना सांगतो, "द्रोणांना संरक्षण देण्याची तुमची जबाबदारी आहे. द्रोण देवांना सुद्धा भारी आहेत तरी पांडवांची आणि सोमकांची एवढी भिती कां

वाटावी? धृष्टद्युम्न त्यांना ठार मारण्याची प्रतिज्ञा घेऊन आहे म्हणून त्याच्या पासून त्याना धोका आहे हे लक्षात घ्या. द्रोणांना हरवू शकेल असा कोणी योद्धा पांडवांत मला दिसत नाही तरी काळजी घ्यावयाची असते कारण दैव कसे फिरेल कोणाचे ते कांहीं सांगता येत नाही. अशारितीने संरक्षित असें द्रोण पांडवांचे व सोमकांचे इतर योद्धे मारत जातील. ते होत असतांना द्रोणांचा मुलगा अश्वत्थामा धृष्टद्युमनाचा निश्चितपणे वध करील असे माझे मन मला सांगत आहे. त्याच प्रमाणे कर्ण अर्जुनाचा नाश करील असे मी समजतो. भिमाबाबत म्हणावयाचे असें कीं, त्यांना मी भारी जाणार आहे. म्हणून त्यांची काळजी करावयाला नको. त्यासाठी द्रोणांला संरक्षण देण्यात कोठलीही कुचराई करू नका".

त्यानंतर युद्ध सुरू होते. विविध प्रकारच्या आयुधानी ते एकमेकांवर वार करत होते. अश्वत्थामा पांचालांच्या राजावर हल्ला करतो. द्रोण श्रींजयांवर चाल करतात. ते एकमेकांच्या सैनिकांची कत्तल करू लागतात. प्रचंड गोंधळ झाला होता. ते युद्ध इतके भीषण होते जसे आधी कधी कोणी पाहिले नसेल.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे एकसष्ठावा संपला.

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे बासष्ठावा

संजय पुढे सांगतो, त्या रात्रीच्या युद्धात धर्माचा मुलगा युधिष्ठीर त्याच्या लोकांना बोलतो, "तुम्ही द्रोणांवर चाल करून जा, त्याला ठार मारा. ती आज्ञा झाल्यावर ताबडतोब ते द्रोणाच्या फौजांवर चालून जातात. ते जोरांनी ओरडत जातात. त्यावेळी कृतवर्मन युधिष्ठीरावर हल्ला करतो. कारण ते द्रोणाकडे जात होते. द्रोण सत्यकीच्या मागे लागले होते. कौरवांचे एक वीर भूरी आणि कर्ण सत्यकीला विरोध करत असतात. दुर्योधन सहदेवाला अडवत होता. मध्येच भिमाने दुर्योधनावर वार करण्यास सुरूवात केली. त्यानंतर भिम शकूनीवर हल्ला करतो. नकूल कृपांना अडवत असतो. दुःशासन शिखंडीला अडवण्याचा प्रयत्न करत असतो. त्यात प्रतिविंध्य दुःशासनावर हल्ला करतो. त्याच वेळी भिमाचा राक्षस मुलगा घटोत्कच व अश्वत्थामा ह्यांच्यात जुंपलेली असते. घटोत्कचाकडे अनेक मायावी सिद्धी होत्या. वृषसेन द्रुपदाला आव्हान देतो. जेव्हां द्रुपद द्रोणाला पकडण्यासाठी त्याच्या फौजा घेऊन जात असतो. सल्य मद्रदेशाचा राजा, विराटाशी लढत असतो. जसे ते द्रोणाचा वध करण्यासाठी पुढे होतात, चित्रसेन त्याना विरोध करतो त्याच्या सगळ्या ताकदीने. नकूलावर तो अनेक बाण मारतो. राक्षस अलमवुष अर्जुनाला विरोध करत असतो. पांचाल राजपुत्र धृष्टद्युम्न द्रोणांना सहजपणे अडवत असतो. तुमचे योद्धे पांडवांच्या योद्ध्याना चांगला विरोध करत असतात. सगळे सैनिक जोराने ओरडत एकमेकांना प्रोत्साहन देत होते. त्यांची शस्त्रं त्या दिव्यांच्या प्रकाशात चमकत होती. फार मोठ्या प्रमाणात नरसंहार झाला होता. त्या लढाईत गदांचा, तलवारींचा, भाल्यांचा असा जास्त वापर होत होता. कृतवर्मन युधिष्ठीराला विरोध करत होता. परंतु, युधिष्ठीर त्याला अनेक बाण मारून त्याचा विरोध व्यर्थ ठरवतो. कांही वेळांनी कृतवर्मन युधिष्ठीराचे धनुष्य तोडून टाकतो. दुसरे धनुष्य घेऊन युधिष्ठीर त्याला वर्मी बाण मारू लागतो. तरी तो युधिष्ठीराला सात बाण मारतोच. पार्थाचा मुलगा पुन्हा त्याचे चिलखत फाडून टाकतो बाणांच्या माराने. त्यांचे बाणांचे द्वंद्व असेंच चालू असते. कृतवर्मनाला तो बराच जखमी करतो. थोड्याच वेळात कृतवर्मन युधिष्ठीराचे घोडे व सारथी मारून त्याचा रथ निकामी

करतो. पंडुचा मुलगा तलवार व ढाल घेऊन रथातून उतरतो. कृतवर्मन त्याची तलवार व ढाल दोनही मोडून टाकतो. त्यानंतर युधिष्ठीर दुसरी तलवार घेतो. त्याचेसुद्धा हाद्रीकाचा मुलगा तुकडे करतो. कृतवर्मन त्याच्याकडे पहात हसत असतो. त्यानंतर तो युधिष्ठीराच्या जवळ जाऊ लागतो. त्याला अनेक बाणाने भोसकत असतो. त्यामुळें त्याचे कवच फाटून निघतो. तो चिलखत खाली मातीत पडते. ते झाल्यावर तो युद्ध सोडून जाण्याची खूण करतो. अशारितीने युधिष्ठीराचा पराभव केल्यानंतर तो द्रोणांना संरक्षण देण्यासाठी इतर योद्ध्यांकडे जातो.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे बासष्ठावा संपला.

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे त्रेसष्ठावा

संजय पुढे सांगतो, सत्यकीला भूरी विरोध करतो. ज्याचे पुढे जाणे एकाद्या चवताळलेल्या हत्तीसारखे मोठे आक्रमक होते. सत्यकी त्याच्या प्रतिस्पर्ध्याच्या छातीत पांच बाण मारतो. भूरीसुद्धा त्याला तसेंच बाण मारतो. ते एकमेकांना जखमी करतात व त्यांचे रक्त वाहू लागते. ते द्वंद्व फारच भयंकर होते. कांहीं कालासाठी ते दोघे तुल्यबळ होते. त्यानंतर नवीन हुरूपाने सत्यकी हसत हसत भूरीचे धनुष्य तोडून टाकतो. भूरी कांहीं कमी नव्हता. ते नवीन धनुष्य घेतो आणि सत्यकीवर जोराचा मारा करू लागतो. आता भूरीची पाळी होती हसण्याची. तो हसत हसत सत्यकीचे धनुष्य मोडून टाकतो. सत्यकीला तो अपमान वाटतो व तो भयंकर चिडतो. ते एक शलाक (शर) भूरीवर फेकतो. त्यामुळें भूरी खाली पडतो. भूरी मेला ते अश्वत्थामा पहातो व सत्यकीकडे जाऊ लागतो. सत्यकीला आव्हान देतो व त्याच्यावर बाणांचा वर्षाव करू लागतो. सिनीच्या नातवाकडे अश्वत्थामा जात आहे ते पाहून घटोत्कच त्याच्यावर हल्ला करतो. तो मोठ्याने ओरडतो. अरे द्रोणाच्या मुला मी तुला सोडणार नाही. जसा षडाननाने (कार्तिकेय) असुर मनिषाचा वध केला होता तसा मी तुझा करणार आहे. आज मी तुझी लढण्याची सगळी इच्छा पूर्ण करणार आहे. त्याचे डोळे लालेलाल झाले होते रागांने. रथाच्या चाकासारखे मोठे बाण जे राक्षस वापरतात ते त्याने अश्वत्थामावर फेकण्यास सुरूवात केली. अश्वत्थामा त्याच्या सर्पासारख्या बाणांने घटोत्कचाचे सगळे बाण उलटवतो. राक्षसाच्या अंगात सगळीकडे अश्वत्थामाचे बाण घुसलेले दिसत होते. अश्वत्थामाचे मंतरलेले बाण हवेतून जातांना वारा कापत गेल्यामुळें सूं सूं असा आवाज करत होते त्या आवाजाने सगळे आसमंत दणाणून गेले होते. त्याचे विविध आकाराचे बाण त्यात होते. घटोत्कचावर ते फेकले जात होते. त्यावेळी आकाशात आणखीन एक समर चालू झाले होते. त्याकडे पृथ्वीवरूल योद्धे पहात बसले. त्या आकाशातील युद्धामुळे थांबलेले त्यांचे द्वंद्व पुन्हा सुरू झाले जसे शक्र व प्रह्लाद ह्यांचे झाले होते. घटोत्कच अश्वत्थामाच्या छातीत बाण मारण्यास सुरूवात करतो. त्या हल्ल्याने अश्वत्थामा हादरतो. रथाचा ध्वजस्तंभ हाताने धरून तो कसाबसा उभा असतो. त्यानंतर

तो बेशुद्ध होतो. ते पाहून सगळे कौरवांचे सैनिक टाहो फोडू लागतात. त्यांना वाटते कीं, अश्वत्थामा मेला. अश्वत्थामाची ती अवस्था पाहून पांचाल व श्रींजयाचे सैनिक गर्जना करू लागतात. थोड्या वाळात तो शुद्धीवर येतो व त्याचे धनुष्य ताणून घटोत्कचाच्या दिशेने एक असा बाण मारतो जसा साक्षात यमाचा बाण असावा. तो बाण घटोत्कचाच्या छातीत घुसतो. त्यामुळें राक्षस त्याच्या प्रचंड आकाराच्या रथात बसतो. घटोत्कच शांतपणे बसला आहे ते पाहून त्याचे सैनिक भयभीत होतात. त्यावेळी अश्वत्थामा एक गर्जना करतो. तो सूर्यासारखा चमकू लागतो. ते होत असतांना भिमसेन तेथेच दुर्योधना बरोबर लढत होता. ते एकमनेकांना बाणांने जखमी करत होते. त्यात भिम दुर्योधनाचे धनुष्य तोडतो. त्याशिवाय त्याचा ध्वजस्तंभ मोडतो. त्याशिवाय दुर्योधनाला आठ बाण मारतो. दुर्योधन त्यानंतर भिमावर कांही जोरदार बाण णारतो परंतु, ते भिम उलटवतो. नंतर दुर्योधन भिमाचे धनुष्य मोडतो. भिमाने घेतलेले सगळे धनुष्य दुर्योधन अशाप्रकारे मोडत असतो. त्याचे धनुष्य तो तोडतो म्हणून भिम एक शलाक त्याच्यावर नळीतून फेकतो. तो लोखंडी होता. परंतु, दुर्योधन त्या शलाकाचे तुकडे करतो सगळ्यांच्या समोर. त्यातून त्याचे कौशल्य सिद्ध होते. त्यानंतर भिम त्याची गदा फेकतो. त्या गदेमुळे त्याचे घोडे, रथ व सारथी सगळे मरतात. भिमाला घाबरत तो दुसर्या रथात चढतो. तो नंदकाचा रथ असतो. भिमाला वाटते दुर्योधन मेला म्हणून तो एक मोठी गर्जना करतो जी आकाशाला ऐकू जाते. तुमचे सैन्य समजते कीं, दुर्योधन मेला. ते जोराने ओरडू लागतात. ते ओरडणे व भिमाची आरोळी युधिष्ठीराला ऐकू जाते. त्यालासुद्धा वाटते कीं दुर्योधन मेला. ते समजल्यावर तो वृकोदराच्या जवळ वेगांने जातो. पांडवांचा उत्साह वाढतो, त्यांचे पांचाल, श्रींजय, मत्स्य, कौकेय, छेड्डी, द्रोणांवर चाल करतात. त्यांचा नाश करण्यासाठी. तेथे त्यांच्या व द्रोणांच्या फौजात तुंबळ युद्ध होते. त्यारात्री तेथे असलेले दिवे विझले गेल्यामुळे अंधार झाला होता. कोणी कोणाला पाहू शकत नव्हते.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे त्रेसष्ठावा संपला.

# घटोत्कच वध पर्व
## भाग एकशे चौसष्ठावा

संजय पुढे सांगतो, तेथे सहदेव आणि कर्णात द्वंद्व होत होते. सहदेवाला द्रोणांपर्यंत पोहोचावयाचे होते. परंतु, मध्येच कर्ण उभा होतो त्याला अडवतो. सहदेव कर्णाला नऊ बाण मारतो त्याच्या बदल्यात कर्ण शंभर मारतो. कर्ण माद्रीच्या मुलाचे धनुष्याची दोरी तोडतो. तेव्हां तो दुसर धनुष्य घेतो. कर्णाला वीस बाण मारतो. कर्ण सहदेवाचे घोडे मारतो. त्यानंतर त्याच्या सारथ्याला मारतो. सहदेव तलवार व ढाल घेऊन कर्णावर जातो. परंतु, तेसुद्धा कर्ण तोडतो. आता सहदेव त्याची गदा घेऊन कर्णाच्या रथाकडे जातो. परंतु, कर्ण ती गदा त्याच्या बाणांने खाली पाडतो. गदासुद्धा पडल्याने सहदेव एक शलाक त्याच्यावर फेकतो. त्या चक्राकार शलाकाला तो अनेक बाण मारतो. त्यामुळे तो शलाक निकामी होतो. ते पाहून सहदेव त्याच्या रथाचा दांडा काढतो व तो कर्णावर फेकतो. त्याबरोबर त्याच्या मेलेल्या घोड्यांचे पट्टे व नंतर जे हातात येऊन ते तो त्याच्यावर फेकत रहातो. शेवटी तो युद्ध सोडून जातो. तो जात असतांना कर्ण त्याला हिणवण्यासाठी बोलतो, "अरे तुझ्या पेक्षा उच्च योद्ध्याबरोबर लढण्याची हिम्मत करत जाऊ नकोस. नेहमी तुझ्या बरोबरीच्यांशी लढत जा. अरे माद्रीच्या मुला. हे माझे शब्द लक्षात ठेव". त्यानंतर त्याच्या धनुष्याच्या टोकाने डिवचत तो बोलतो, "पलिकडे अर्जुन आहे, त्याच्याकडे जा किंवा घरी जा". एवढे बोलल्यावर कर्ण हसत हसत पांचालांच्या फौजाकडे जातो. कर्ण माद्रीच्या मुलाला मारत नाही कारण, तो कुंतीची आठवण ठेवतो . त्यांने तिला शब्द दिला होता कीं, तो एक अर्जुन सोडून इतर कोणाही पांडवांचा वध करणार नाही. सहदेव खूप नाराज झालेला असतो त्या कर्णाच्या डिवचून बोलण्यामुळे, त्याला जीव नकोसा झालेला होता. त्यानंतर तो पांचाल युवराज जमनेजयाच्या रथात चढतो व तेथून निघून जातो.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे चौसष्ठावा संपला.

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे पासष्ठावा

संजय पुढे सांगतो, सल्याला विराटांच्या बाणाने घेरले होते. ते सगळे द्रोणाना पकडण्यासाठी धडपड करत होते. त्यात सल्य विराटाला बाण मारतात. ते दोघे एकमेकांना शेकडो बाण मारत असतात. सल्य त्यानंतर विराटांचे घोडे मारतो. तेव्हां तो राजा त्याच्या रथातून खाली उडी मारतो. जमिनीवर उभा राहून तो बाण मारण्याच्या तयारीत असतो. ते रथाशिवाय आहेत हे पाहिल्यावर त्यांचा भाऊ सतनिक तेथे येतो व त्यांना त्याच्या रथात घेणार असतो. परंतू सल्य त्याच्यावर बाणांचा वर्षाव करतो त्यामुळे तो मरतो. विराट त्याच्या रथात चढतो. संतापलेला तो राजा लवकरच सल्यावर बाणांचा मारा करू लागतो. परंतु, सल्याच्या बाणांमुळे जबर जखमी झालेले वृद्ध विराट त्या रथात खाली बसतात. ते बेशुद्ध होतात. त्यांचा सारथी त्यांना रणभूमीतून बाहेर काढतो. ते युद्धातून बाद होतात. विराट गेल्यामुळें त्यांचे सैनिक सुद्धा युद्धातून निघून जाऊ लागतात. त्यांच्यावर सल्य विनाकारण बाणांचा वर्षाव करत असतो. ते पाहून अर्जुन व कृष्ण तेथे सल्याचा मुकाबला करण्यासाठी त्याच्या पुढे होतात. त्या वेळी अलमवुष त्याच्या अवाढव्य रथातून येतो ज्या रथाला आठ चाकं होती. त्याचे घोडे पाण घोड्यासारखे होते. त्याचा झेंडा रक्ताच्या वर्णाचा होता. त्याची सजावट काळ्या रंगाच्या फुलांची होती. रथाची आतील बाजू अस्वलाच्या कातड्याची होती. त्याच्या रथात एक उंच खांब होता ज्यावर एक भयंकर दिसणारं गिधाड बसले होते. ते गिधाड सगळीकडे निरखून पहात होते जसे कांही सावज शोधत आहे. अलमवुष राखाडी रंगाच्या पत्थराचा असावा असा वाटत होता. तो अर्जुनाला अडवतो. तो अर्जुनावर बाणांचा वर्षाव करत होता. त्या द्वंद्वांत जे एक राक्षस व माणूस असे होते ते फारच भीषण होते. ते पहाणार्या प्रेक्षकांची चांगलीच करमणूक होत होती. सभोवारचे कावळे व गिधाडं सुद्धा ते पहात होते मोठ्या कौतुकाने. इतर मांसाहारी प्राणीसुद्धा ते पहात होते. अर्जुन राक्षसाला सहा बाण मारतो. त्यानंतर त्याचा ध्वजस्तंभ मोडून टाकतो केवळ दहा बाणांत. त्यानंतर अर्जुन त्याचे सारथी, घोडे, मदतनीस, असे सगळे कांहीं बाणातच बाद करतो. त्यानंतर तो राक्षसाला चार बाण मारतो. त्यामुळें

घाबरून राक्षस तेथून पळून जातो. त्याचा पराभव केल्यानंतर तो द्रोणाकडे निघतो. वाटेत हत्ती, घोडे तो मारत असतो. त्यावरील स्वार मरून पडत होते. त्यानंतर कौरवांचे सैनिक त्याच्या पासून दूर पळून जात होते.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे पासष्ठावा संपला.

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे सहासष्ठावा

संजय पुढे सांगतो, आपला मुलगा, चित्रसेन नकूलाच्या मुलाला, सतनिकाला, विरोध करत असतो. सतनिक तुमचे सैनिक मारत असतो ते थांबवण्यासाठी तो गेला होता. सतनिक चित्रसेनाला कांहीं बाण मारतो. चित्रसेनसुद्धा त्याला बाणांने जखमी करत असतो. त्यानंतर सतमिक चित्रसेनाचे कवच फाडून टाकतो. त्यानंतर त्याचा ध्वज पाडतो. त्यानंतर चित्रसेनाचा तिरकमटा तो तोडतो. चित्रसेन दुसरे धनुष्य घेतो. तो सतनिकाला आठ बाण मारतो. त्यामुळे चिडलेला सतनिक चित्रसेनाचे घोडे व सारथी मारून टाकतो. रथातून उतरून चित्रसेन जमिनीवर उभा राहून सतनिकावर बाण मारत असतो. तेव्हां सतनिक चित्रसेनाचे धनुष्य तोडून टाकतो. त्यानंतर चित्रसेन हृद्रीकाच्या रथात चढतो. वृषसेन द्रुपदाला आव्हान देतो. जे द्रोणांकडे जात होते. द्रुपद वृषसेनाला छाती आणि हातात बाण मारून जखमी करतात. वृषसेन त्यांच्यावर बाणांचे वार करू लागतो. त्यातील कांहीं त्यांच्या छातीत मारतो. त्यामुळें त्यांचे शरीर साळूंखी सारखे दिसत होते. ते दोघे रक्ताने नाहून निघाले होते. तरी त्यांचा लढण्याचा जोर कमी झाला नव्हता. वृषसेनांचा मारा द्रुपदावर चालूच होता. त्यानंतर तो पुन्हा शेकडो बाण यज्ञसेनावर फेकतो. रागावलेले यज्ञसेन वृषसेनाचे धनुष्य तोडून टाकतात. त्यानंतर वृषसेन एक नवे धनुष्य घेतो व द्रुपदांवर नेम धरतो आणि त्यांच्या छातीत बाण मारतो. त्या बाणांमुळें यज्ञसेन बेहोष होतात. त्यांचा सारथी त्यांना युद्धभूमीतून बाहेर काढतो. ते बाद होतात. त्यामुळे सोमकांत एकच गदारोळ होतो. त्या रात्रीच्या लढाईत द्रुपद गेल्यावर कौरवांचे सैन्य सोमकांवर जोराने हल्ला करते. तेथे तुंबळ युद्ध होते. त्यामुळे सैनिकांच्या हातातील दिवे मातीत पडलेले दिसत होते. त्यांच्या प्रकाशात तेथे मरून पडलेल्या योद्ध्यांचे चेहरे उजळून दिसत होते. वृषसेनाला घाबरून पांचालांचे सैनिक तेथून पळून जातात. आता मध्यरात्र झाली होती. त्यानंतर तो कर्णाचा मुलगा युधिष्ठीराच्या दिशेने निघतो.

दुःशासन प्रतिविंध्याला आव्हान देतो. कारण तो द्रोणांकडे जात होता. त्यांच्यात एक चांगले पहाण्यासारखे द्वंद्व होते. दुःशासन प्रतिविंध्यला अनेक बाण मारतो. त्यातील कांही

त्याच्या कपाळावर मारतो. प्रतिविंध्य त्याला सात बाण मारतो. त्यानंतर तुमचा मलगा प्रतिविंध्याचा घोडा मारतो. त्यानंतर त्याचा सारथी मारतो. त्यानंतर त्याचा ध्वज मोडतो. तेवढ्याने तो शांत होत नाही तर त्याचा रथसुद्धा मोडून टाकतो. रथ गेल्यानंतर तरीसुद्धा तो जमिनीवर उभा राहून धनुष्य हातात धरून बाण मारत असतो त्या वेळी दुःशासन त्याचे त्याचे धनुष्य मडून टाकतो. आपला भाऊ अडचणीत आहे ते पाहून त्याची भावंड मोठा फौजफाटा घेऊन तेथे जातात. प्रतिविंध्य शुतषोमाच्या रथात चढतो. दुसरे धनुष्य घेऊन तो युद्ध करू लागतो. पांडवांचे योद्धे दुःशासनावर चाल करतात. त्यामुळे यमाच्या दारी मोठी रांग लागते मेलेल्या योद्ध्यांची.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे सहासष्ठावा संपला,

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे सदुसष्ठावा

संजय पुढे सांगतो. नकूल शकूनीशी लढत होता. त्यांचे युद्ध कौशल्य तुल्यबळ होते. त्या दोघांनी एकमेकांना इतकेबाण मारले होते कीं, ते साळूंखी सारखे दिसत होते. त्या दोघांची चिलखतं फाटलेली होती. ते दोघे त्यांच्या रक्ताने भिजलेले होते. ते दोघे संतापलेल्या नजरेने एकमेकांकडे कटाक्ष टाकत होते. त्यानंतर शकूनी नकूलाच्या छातीत एक बाण मारतो. नकूल त्यामुळे खाली रथात बसतो व बेशुद्ध होतो. तुमचा मेहुणा ते पाहून अभिमानाने मोठ्याने गर्जना करतो जसे तो जिंकला आहे. थोड्याच वेळात नकूल शुद्धीवर येतो. पुन्हा त्यांच्यात द्वंद्व सुरू होते. नकूल आता शकूनीच्या छातीत अनेक बाण मारतो. त्यानंतर तो शकूनीचे धनुष्य मोडून टाकतो. त्यानंतर नकूल शकूनीच्या ध्वजाच्या स्तंभाचे तीन तुकडे करतो ते खाली मातीत पडतात. त्याचा सारथी त्याला घेऊन त्यांचा रथ रणभूमीतून बाहेर काढतो. शकूनी बाद झाला होता त्या द्वंद्वामध्ये. नकूल त्यावर एक मोठी आरोळी मारतो त्याच्या विजयाची. त्यानंतर तो त्याच्या सारथ्याला सांगतो कीं, ते आता द्रोणांकडे जाणार आहेत. ते द्रोणांकडे जाऊ लागतात. त्याच वेळी महारथी शिखंडीसुद्धा द्रोणांकडे जात असतो. त्याला कृप अडवतात. शिखंडी त्यांच्याकडे पहात व हसत त्यांच्यावर नऊ बाण मारतो. कृप त्याला पांच बाण मारतात. त्यानंतर वीस बाण मारतात. त्यांच्यात द्वंद्व सुरू होते. जसे देव आणि असुरांचे असावे असें ते होते. त्यांच्या बाणांने सारे आकाश भरून जाते. ते द्वंद्व भीषण होते जणूकाय साक्षात मृत्यू तेथे नाचत आहे असे वाटत होते. त्यानंतर शिखंडी कृपांचे धनुष्य मोडून टाकतो. त्यामुळे कृप चिडतात. ते एक शलाक त्याच्यावर फेकतात. शिखडी तो शलाक तोडतो. त्याचा कांहींच परिणाम होत नाही. कृप दुसरे धनुष्य घेतात. त्यांच्या बाणाने शिखंडी बेहोश होऊन रथात बसतो. ते पाहून कृप त्याच्यावर आणखीन बाण मारतात. त्याला ठार मारण्यासाठी ते बाण मारत असतात. त्यानंतर शिखंडीचा सारथी त्याला घेऊन रणभूमीतून निघून जातो. शिखंडी त्या द्वंद्वांत बाद होतो. शिखंडी जात असतांना पांचालांचे व सोमकांचे योद्धे त्याला संरक्षण देत असतात. त्याच प्रमाणे तुमचे मुलगेसुद्धा कृपांना संरक्षण देण्यासाठी पुढे झालेले असतात.

त्या दोन बाजूच्या संरक्षकांत युद्ध जुंपतो. त्यात हत्ती, घोडे सगळे असतात. ते युद्ध फारच भयानक होते. त्या अंधार्या रात्री सैनिकांचे आवाज व प्राण्यांचे आवाज व शस्त्रांचे आवाज ह्यांने कानठळ्या बसल्या होत्या. त्या रात्रीचे ते दिवे, मशाली ती रणभूमी उजळून टाकत होते. त्यात शस्त्रांचे चमकणे विशेष जाणवत होते. त्या अंधारातील युद्धात कोण कोणाला मारत होते ते समजत नव्हते. सगळे स्वताच्या जीवाची पर्वा न करता, दुसर्याचा जीव घेण्यासाठी इतरांना मारत होते.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे सदुसष्ठावा संपला.

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे अडुसष्ठावा

संजय पुढे सांगतो. त्या भयकर लढाईत धृष्टद्युम्न लढत लढत द्रोणापर्यंत पोहोचतो. त्याला मदत करण्यासाठी पांचाल व पांडवांच्या फौजा तेथे तयार असतात. ते पाहून तुमचे मुलगे त्या फौजांवर हल्ला करतात. द्रोणांना संरक्षण देण्याचा ते आटोकाट प्रयत्न करत असतात. ते दोन मानवी फौजांचे समुद्र एकमेकात टक्कर देत असतात. धृष्टद्युम्न द्रोणांना छातीत बाण मारतो. आणि गर्जना करतो. द्रोण त्याच्यावर अनेक बाण मारतात व अखेरीस त्याचे ते मजबूत धनुष्य तोडून टाकतात. धृष्टद्युम्न नवीन धनुष्य घेतो. एक जबरदस्त बाण घेतो द्रोणांवर मारण्यासाठी. त्या बाणाच्या तेजांनी ती रणभूमी छळाळून निघते. तो बाण पाहून आकाशात बसलेले प्रेक्षक देव, दानव, यक्ष, गंधर्व असे सगळे बोलतात, "अरे ह्यातून द्रोणांना कोण वाचवणार"? कर्ण ते पहातो, तो नाराज असतो, तो त्या बाणांचे शतशः तुकडे करून टाकतो, द्रोणांपर्यंत त्या बाणाला पोहोचू देत नाही. तो शक्तिमान बाण जमिनीवर पडतो. कर्ण त्यानंतर धृष्टद्युम्नाला बाण मारण्यास सुरूवात करतो. त्याप्रमाणे अश्वत्थामा कांहीं बाण मारतो. त्याबरोबर द्रोणसुद्धा त्याला बाण मारतात. सल्य, दुःशासन, शकूनी आणि दुर्योधन त्याला कांहीं बाण मारतात. धृष्टद्युम्न त्या सगळ्यांना तितकेच बाण मारतो. त्यात तो एक जबरदस्त बाण द्रोणांना मारतो. अशारितीने ते युद्ध होत असते. प्रत्येक वेळा बाण मारतांना ते सगळे जोरांने ओरडून एकमेकांना आव्हान देत होते. त्यात तुमचा मुलगा दृमसेन भाग घेतो. धृष्टद्युम्न त्याला सुद्धा बाण मारतो. त्या बाणामुळें दृमसेनाचे डोके तुटून पडते. धृष्टद्युम्न त्यांचा बाण मारत अखेरीस कर्णाचे धनुष्य तोडून टाकतो. ते कर्णाला सहन होत नाही. तो त्याचा अपमान झाला असे समजतो. तो नवीन धनुष्य घेतो. जोराने एक श्वास घेतो व धृष्टद्युम्नावर बाणांचा वर्षाव करण्यास सुरूवात करतो. ते पाहून इतर सहाजणांना उत्साह येतो व तेसुद्धा त्याच्यावर बाणांचा मारा चालू करतात. धृष्टद्युम्नाला ते भारी जाणार होते परंतु, तेवढ्यात सत्यकी आणि त्याची फौज त्याच्या संरक्षणासाठी येते. सत्यकीला येतांना पाहून कर्णाचा राग आणखीनच वाढतो. तो

त्यांच्यावर हल्ला करतो. सत्यकीसुद्धा कर्णावर हल्ला करतो. तो कर्णाला बोलतो, "आता माझ्यापासून पळून जाण्याचा प्रयत्न करू नकोस".

त्यानंतर कर्ण व सत्यकी ह्यांचे द्वंद्व सुरू होते. जसे प्राचीन काळी वली आणि शक्रांत झाले होते. दोघे तुल्यबळ होते. विविध प्रकारचे बाण ते एकमेकांना मारत असतात. महारथी युयुधन कर्णाला त्याच्या बाणाने घेरून टाकतो. तेथे दुर्योधन येतो व कर्णाच्या नेतृत्वाखाली सत्यकीशी लढाई होत रहाते. त्याच वेळी सत्यकी कर्णाचा मुलगा वृषसेनावर हल्ला करतो. त्याच्या छातीत बाण मारतो. त्या वर्मी बसलेल्या वारामुळे तो त्याच्या रथात खाली बसतो. कर्णाला वाटते कीं, त्याचा मुलगा मेला. त्यामुळें तो सत्यकीवर आणखीन जोरांने बाणाचा मारा चालू ठेवतो. सत्यकीसुद्धा मोठ्या उत्साहाने त्याच्यावर बाणांचा मारा करत रहातो. त्यानंतर तो कर्णाच्या हातावर असलेले चामड्याचे हातमोजे फाडून टाकतो. ज्याच्या शिवाय बाण मारणे शक्य होत नाही. वृषसेन उठतो तेव्हां कर्णाला समजते कीं, त्याचा मुलगा मेलेला नाही, त्याचा तो उत्साह कमी होतो. ते होत असतांना गांडीवाचा टणत्कार सगळ्यांना ऐकू येतो. म्हणजे अर्जुन व कृष्ण तेथे आले हे सगळ्यांना समजते. ते ऐकल्यावर कर्ण दुर्योधनाला बोलतो, "त्याने बहुतेक आपले अनेक राजे व सैन्य बरबाद केले असावेत म्हणून तो त्याच्या धनुष्याचा आवाज काढत आहे. त्याच्या रथाच्या चाकांचा आवाज सुद्धा मोठा होता तोसुद्धा सगळ्यांना ऐकू येत आहे. अहो राजे ह्या पृथाच्या मुलांने आपले सगळे सैन्य मारून टाकले आहे. त्याच्यामुळे आपले सैन्य व राजे पळून जात आहेत. अर्जुनाला आटपणे कोणालाही जमलेले नाही. ह्या अंधार्या रात्री त्याच्या भोवती रणवाद्ये वाजत आहेत. मरणार्या सैनिकांचे किंकाळणे ऐका. ते सगळे आवाज त्या पार्थाच्या रथा भोवतीच होत आहेत. त्याचा सत्यकीसुद्धा आपल्याला भारी होत आहे. जर त्या दोघांना आवरता आले तर आपण कांहीतरी करू शकू. तसेंच पांचालांचा पुत्र द्रोणांच्या मागे लागला आहे. त्याला त्यांचे संरक्षक योद्धे मदत करत आहे. जर आपण सत्यकी व धृष्टद्युम्नाला मारले  तर कांहीं आशा आहे. जसे अभिमन्यूचे केले तसे कांही तरी ह्यांच्या बद्दल सुद्धा केले पाहिजे. अर्जुनावर आपले योद्धे पाठवले तर तो सत्यकीला मदत करण्यासाठी येऊ शकणार नाही. म्हणजे मग सत्यकीचा बळी घेणे मला सोपे जाईल. आपले योद्धे सत्यकीवर जोराचा हल्ला करतील असे पहा. म्हणजे त्यात अडकलेल्या त्या

युयुधनाचा फडशा मी पाडू शकेन. त्याला यमाकडे पाठवणे सोपे होईल". कर्णाचे ते मत ऐकल्यावर दुर्योधन शकूनीला आज्ञा करतो कीं त्याच्या गांधार सेनेने सत्यकीला घेरून ठेवावे. त्याच हत्ती व घोडे आणि रथ असले पाहिजेत. त्या नंतर अर्जुनावर सुद्धा तसेंच लष्कर पाठवण्याचे ठरते. दुःशासन, दुर्विश, सुवाहू, दुष्प्रदर्शन त्या लष्कराचे नेतृत्व करतील. त्यांत मोठ्या प्रमाणात पायदळ सुद्धा असेल. जे तिरकमटा चालवणारे असतील. ते त्या दोन कृष्णांचा वध करण्यासाठी पुरेसे आहेत असें ते समजतात. दुर्योधन कर्णाला बोलतो. "माझे सगळे जिंकणे तुझ्या सामर्थ्यावर आहे ते लक्षात ठेवून काम कर. जसे इंद्र कार्तिकेयावर विसंबून होता तसे हे आहे हे लक्षात ठेव". ते ऐकल्यावर शकूनी शस्त्रसज्ज पांडवांचा संहार करण्यासाठी निघतो. त्यानंतर एक मोठे युद्ध होते तुमच्या व पांडवांच्या सैन्यात. शकूनी त्याचे सैन्य घेऊन सत्यकीवर चाल करतो. बाणांचा बर्षाव सुरू होतो. दुसरी कडे द्रोणांचे धृष्टद्युम्नाकडे निघतात. त्यांच्यात सुद्धा मोठी लढाई होते.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे अठुसष्ठावा संपला.

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे एकोणसत्तरावा

संजय पुढे सांगतो, तुमचे पराक्रमी योद्धे सत्यकीवर चाल करून जातात. त्यांचे रथ सर्व शस्त्रसज्ज होते त्याशिवाय सोन्याने व रत्नानी मढवलेले होते. त्यांच्या दिमतीस हत्ती फौजा होत्या. ते सत्यकीला वेढा देतात. चहुबाजूनी ते त्याच्यावर मारा करू लागतात. सत्यकाला ते सगळे एकत्रपणे आव्हान देत मोठ्या मोठ्याने ओरडत असतात. तो एकच गोंधळ झालेला होता. युयुधनाचा वध करण्यासाठी ते त्याच्यावर बाणांचा सतत मारा सुरू करतात. सत्यकीला समजते कीं, आता खरी त्याची परीक्षा आहे. तो आता थेट त्या कौरव योद्ध्यांची मुंडकीच उडवण्याच्या उद्देशाने धनुर्धारी करू लागतो. एरवी जसे इकडे तिकडे बाण मारले जात तसे तो आता करत नाही. त्याचा प्रत्येक बाण एक बळी घेणारा ठरतो. त्यामुळे फार मोठ्या वेगांने तुमच्या फौजांतील योद्धे कमी होत जातात. त्या बरोबर अनेक हत्ती व घोडे व त्यावरील स्वार मारले जाऊ लागतात. हत्तीवरील अंबारी आणि झेंडेसुद्धा कोसळू लागतात. मरणार्या योद्ध्यांच्या किंकाळ्याने आसंमत भरून गेले होते. त्या किंकाळ्याने दुर्योधनाला काळजी वाटू लागते व तो त्याच्या सारथ्याला सांगतो कीं, त्यांचा रथ त्या भागाकडे न्यावा. दुर्योधन सत्यकीवर चाल करतो. सत्यकी त्याच्यावर बरेच बाण मारतो. त्यामुळें दुर्योधनाच्या अंगातून रक्ताच्या धारा लागतात. त्यानंतर तो त्याचा सारथी मारतो. त्यानंतर घोडे मारतो. तशा परिस्थितीत तुमचा मुलगा सत्यकीवर बाण मारत असतो. परंतु, अंधारामुळे तुमच्या मुलाचे बाण चुकत होते सत्यकी आवाजाच्या रोखाने मात्र नेमके शरसंधान करत होता ते बिनचूक होते. त्यानंतर सत्यकी दुर्योधनाचा तिरकमटा तोडतो. दुर्योधन कृतवर्मनाच्या रथात चढतो. दुर्योधनाचा पराभव झाल्यानंतर सत्यकी तुमच्या सैन्याचा समाचार घेऊ लागतो. ते पळून जातात. त्यात हजारो हत्ती होते. त्यांच्या धावण्यामुळे जमीन हादरत असते. त्यावेळी शकूनी अर्जुनाला वेढा घालतो. त्यात हजारो हत्ती, घोडे व पायदल होते. कित्येक योद्धे दैवी अस्त्रांचा प्रयोग धनंजयावर करतात. अर्जुन त्याच्या विविध अस्त्रं व शस्त्रांच्या सहाय्याने ते आक्रमण आवरण्यात यशस्वी होतो. अर्जुनाशी जे लढत होते ते सगळे मारले जात होते. अखेरीस त्या शत्रूसेनेला माघार घ्यावी

लागते. शकूनी संतापलेला अर्जुनावर एक जोरदार बाण फेकतो. तो अर्जुनाला लागतो. तसे कित्येक बाण तो मारतो. परंतु, अर्जुन ते सगळे परतवतो, त्यांचा कांहींच परिणाम होत नाही. रणभूमी वर मेलेल्या क्षत्रियांचे ढीग पडलेले होते. ते एकमेकांवर झोपल्यासारखे दिसत होते. कांहींचे डोळे अजून उघडे होते, कांहींची तोंड उघडी होती. कांहींच्या अंगातून अजून रक्त वहात असते. कित्येकांचे मुकूट मातीत पडलेले होते. त्यांच्यावर असंख्य बाण विखूरलेले दिसत होते. कित्येकांचे विविध दागिने व इतर प्रकारचे अलंकार तेथे मातीत पडलेले दिसत होते. त्यात राजे व सामान्य सैनिक एकत्र कायमची निद्रा घेत होते. तेथे कांहीं फरक नव्हता. शकूनीचा मुलगा उलूकी अर्जुनावर बाण मारतो. ते पाहून अर्जुन मोठ्याने ओरडून त्याच्यावर बाण मारतो. त्याचे धनुष्य मोडतो व त्याचे घोडे यमाकडे धाडतो. शकूनी त्याचा रथ निकामी झाला म्हणून उलूकीच्या रथात चढतो. अर्जुन त्या दोघांना बाण मारत असतो. त्याची हालत पाहून त्यांचे गांधार सैन्य रणभूमी सोडून पळून जाते. पळून जाणारे सैनिकसुद्धा अर्जून त्याच्या बाणाने ठार मारत असतो. त्या अंधारात पळून जाणे सुद्धा मुष्किलीचे होते. त्यात लोक एकमेकांवर आपटून त्यात किती जखमी होत होते त्याची गणना नाही. अशारितीने तुमचे सैन्य पराभूत झाल्यानंतर धनंजय व कृष्ण त्यांचे शंखू वाजवतात.

धृष्टद्युम्न द्रोणांवर बाणांचा मारा करत असतोच. द्रोणांचे धनुष्य तो तोडत असतो. त्यामुळे द्रोण हैराण झालेले दिसतात. ते एक अतिशय मजबूत धनुष्य घेतात असें कीं, ते सहजपणे मोडणार नाही. ते त्या धनुष्याने पांचालपुत्रावर पांच बाण मारतात. त्याच्या सारथ्याला जखमी करतात. एका बाजूला द्रोणांना शह देत असतांना तो पराक्रमी पांचालपुत्र कौरवांच्या इतर फौजांचासुद्धा परामर्श घेत होता. जसे मेघावत असुरांच्या फौजांचा नाश करत असें प्राचीन काळी. तुमच्या फौजांचा नाश होत असतांना रक्ताची नदी वाहू लागते. त्यात सगळ्यांचे रक्त मिसळलेले होते, जसे वैतरणी नदी यमाकडे वहात असावी. स्वर्गीय देवतांसारखा धृष्टद्युम्न चमकत होता. त्यानंतर तो व शिखंडी त्यांची शंखू वाजवतात. नकूल व सहदेव त्यात सामील होतात. वृकोदर सुद्धा त्याचे शंखू वाजवतो. युद्धाला जोर आलेला असतो. कौरवांचे असंख्य राजे त्या रात्रीच्या युद्धात मारले गेलेले होते. तुझा मुलगा व कर्ण त्यांचे विजयाचे शखू वाजवणे संतापाने ऐकत असतात, त्यात द्रोण व

अश्वत्थामासुद्धा असतात. त्यांना कळत नाही काय करावयाचे. असें रात्रीचे युद्ध करण्याची काय गरज होती असा प्रश्न द्रोणांना पडतो पण ते त्यांच्याच सांगण्यावरून आरंभलेले होते. बहुतेक राजे व सैनिक त्या युद्ध कलेत निष्णात नसल्यामुळे त्यांचा मोठ्या प्रमाणात नाश झाला होता. पांडव सगळे तशा कलेत तरबेज होते त्याचा त्यांना चांगलाच उपयोग झाला होता. अंधारात आवाजाने नेम घ्यावयाची कला सगळ्या क्षत्रियांना अवगत नव्हती त्याची मोठी किंमत कौरवांना भरावी लागत होती. त्यांची संख्या त्या एका रात्रीत खूप कमी झाली होती. पांडवांनी त्यांचे नेमके सैन्य लावले होते व इतर आराम करत होते रात्रीचे. त्यामुळें पांडवांचे नुकसान कमी झाले होते. दुसर्या दिवशी त्यामुळे पांडवांचे सैन्य चांगले नव्या दमाने लढणार होते.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे एकोण सत्तरावा संपला.

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे सत्तरावा

संजय पुढे सांगतो, आपले सैन्य मारले जात आहे ते पाहून तुमचा मुलगा कर्णाला व द्रोणांना बोलतो, "हे युद्ध तुम्हा दोघांच्या योजनेनुसार केले जात आहे. तरी त्यात जयद्रथाचा वध झाला. ते तुम्ही दोघे एकाद्या परक्यासारखे नुसते पहात अहात. जणू तुम्हाला त्याचे कांहीं देणेघेणे नाही. आपण पांडवांचा नाश करण्यात पूर्ण सक्षम असतांना असे कसे तुम्ही होवू देता हे मला समजत नाही. तुम्ही मोठ्या दिमाखात मला सांगत होता कीं, तुम्ही पांडवांचा पराभव चुटकीसरशी करू, मग हे काय होत आहे"? "तुमच्या त्या आश्वासनामुळें मी ह्या युद्धाचा प्रस्ताव आग्रहपूर्वक धरून ठेवला होता. जर तुम्ही तसे आश्वासन मला त्यावेळी व वेळोवेळी दिले नसते तर मी युद्धाच्या भानगडीत पडलोच नसतो. ती तुमची जबाबदारी होती कीं, हे युद्ध आपल्या प्रमाणे होईल पण त्यात तुम्ही कमी पडला अहात. असंख्य माझे मित्र मारले गेले आहेत माझे बंधू मारले गेले आहेत. अजून पर्यंत एकही पांडव तुम्ही मारू शकला नाहीत. त्यांने मात्र आपले कित्येक मारले आहेत. जर मी आत्महत्त्या करू नये असे तुम्हाला वाटत असल तर अजून तुम्ही तुमचे शब्द खरे करून दाखवाल". असें तुमचा मुलगा त्या दोघांना सुनवतो.

ते ऐकल्यावरते दोघे कौरवांचे महारथी पार्थांचा नाश करण्याच्या इच्छेने पुन्हा युद्धासाठी निघतात. त्याच वेळी पार्थसुद्धा तेवढ्याच तयारीने गर्जना करत निघतात. द्रोण सत्यकीला बाण मारतात. कर्णसुद्धा त्याला दहा बाण मारतात. दुर्योधन सात बाण मारतो. वृषसेन सुद्धा दहा बाण मारतो. शकूनी सात मारतो. अशारितीने युयुधनाच्या भोवती कौरवांची भिंत उभी रहाते. कांहीं करून एकतरी पांडव मारावयाचाच ह्या रात्रीत एवढ्या एका उद्देशाने ते सगळे प्रेरीत झालेले होते. द्रोणांना पाहून सोमक त्वेषाने त्यांच्यावर हल्ला करतात. त्यानंतर द्रोण पांडवांच्या क्षत्रियांचे बळी घेऊ लागतात. द्रोण पांचालांचा संहार करत असतांना पांचाल एकमेकांना ओरडून त्याबद्दल सांगत होते ते ऐकायला येत होते. कोणांचे काका, कोणाचे मामा, कोणाचा मुलगा, कोणाचा पुतण्या असे मारले जात होते द्रोणांच्या बाणांमुळे. पांडवांचे सैनिक त्यांच्या हातातील दिवे विझवून मातात टाकून निघून

जात होते पंडुच्या मुलांच्या देखत ते होत होते. त्यामुळें एकदम अंधार पसरला. परंतु कौरवांचे दिवे होते त्यामुळे त्यांना पहाणे सोपे होते. ज्या क्रूरपणे पांचालांची हत्त्या द्रोणांनी केली होती ते पाहून जनार्दन नाराज झाला होता. तो फाल्गुनीला  बोलतो, "धृष्टद्युम्न, सत्यकी पांचालांच्या मदतीने द्रोणांवर व कर्णावर मारा करत आहेत. तरी द्रोणांनी आपला मोठा हिस्सा बाद केला आहे. आपल्या फौजांचे अशाप्रकार निघून जाणे बरोबर नाही. ते थांबवले पाहिजे. त्यासाठी आपली शस्त्रं उचलून द्रोणांवर चाल आपल्याला करावी लागणार आहे". कृष्ण पहातो कीं, भिम कौरवांवर चालून जात आहे. तेव्हां तो अर्जुनाला सांगतो, "तो पहा भिम सोमकांच्या व पांडवांच्या फौजा घेऊन द्रोणावर चालून जात आहे. त्याला तू साथ दिली पाहिजेस".

त्यानंतर दोघे पांडव द्रोणाच्या विरुद्ध उभे रहातात.

संजय पुढे सांगतो, त्यानंतर युधिष्ठीराचे अफाट सैन्य पुन्हा रणभूमीत लढण्यासाठी येते. ते सगळे आता द्रोण व कर्णावर हल्ला करण्याच्या इराद्याने जात असतात. ती मध्यरात्र होती. दोन फौजा एकमेकांना भिडणार होत्या. त्यानंतर तुमचे सैनिक त्यांच्या हातातील दिवे फेकून देतात व अंधारात हातापायी चालू होते. वेट लागल्यासारखे ते दोनही बाजूचे क्षत्रिय लढत होते. नांवा वरून ते एकमेकांना पकडून मारत होते. स्वयंवराच्या वेळी जसे राजे एकमेकांना मारतात तसे होत होते. अचानक एकदम शांतता पसरते. फक्त कांही वेळच ती असते नंतर पुन्हा जोरा जोराने सगळे ओरडत मारामरी करू लागतात. कोठे तरी एकादा दिवा जळत होता त्या प्रकाशात ते युद्ध होत होते. त्या अंधाराचा त्यांना कांहींच त्रास होत नसावा असे त्यांचे वागणे होते.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे सत्तरावा संपला.

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे एकाहत्तरावा

संजय पुढे सांगतो, कर्ण धृष्टद्युम्नाला पहातो आणि त्याला दहा बाण मारतो. ते सगळे वर्मी लागतात. धृष्टद्युम्न त्याला ताबडतोब पांच बाण त्याच्या वर्मी मारतो आणि बोलतो, "थांब, आणखीन बाण घे माझे". त्यानंतर कर्ण त्याचे चार घोडे व सारथी यमाकडे धाडतो. त्यानंतर तो त्याचे धनुष्य तोडतो. ते घडल्याने न घाबरता तो प्रिशताचा मुलगा धनंजयाच्या रथात चढतो. तेथून तो कर्णाचा नाश करण्याचे ठरवतो परंतु, युधिष्ठीर त्याला विरोध करतो कारण कर्ण हे अर्जुनाचे सावज आहे असें सांगतो. कर्ण मात्र त्याचे शंखू मोठ्या मोठ्याने वाजवत त्याला आव्हान देत असतो. धृष्टद्युम्न पराभूत झाला आहे ते पाहून त्यांचे व सोमकांचे सैनिक खच्ची होतात. त्यातील कांहीं मात्र उत्तेजित होतात व कर्णाच्या फौजांवर हल्ला करतात. ते कर्णाची कत्तल करण्याच्या उद्देशांने त्याच्यावर हल्ला करतात. कर्ण त्यांना आवरू शकतो. तेवढ्यात कर्णाच्या सारथ्याने नवीन घोडे जे सिधू जातीचे व फार वेगांने धावणारे आहेत असें त्यांच्या रथाला जोडलेले असतात. त्यामुळे नव्या उमेदीने कर्ण पांचाल योद्‌ध्यांचा परामर्श घेऊ लागतो. त्याच्या बाणांच्या वर्षावामुळें पांडवांचे हत्ती व घोडे त्यांच्यावरील योद्‌ध्यासह जमिनीवर कोसळत होते. अनेकांची मुंडकी तो उडवत होता. त्यांचे दागिने सर्वत्र विखूरलेले दिसत होते. त्या हल्ल्यामुळे पांचालांचे आणि श्रींजयांचे सैनिक धूम पळत होते मागे न बघता. कर्ण त्यांचा पाठलाग करत त्यांचा आणखीन लांब पळवत असतो द्रोणांपासून त्यामुळे द्रोण अधिक सुरक्षित व्हावेत. ते पळणारे योद्धे, धावत असतांनासुद्धा कर्णाकडून मारले जात होते. ते त्यांचे पळणे व मरणे द्रोण पहात असतात. आपले लष्कर पळत आहे ते युधिष्ठीर पहातो. त्यांचे पळणेंच योग्य आहे प्राप्त परिस्थितीत हे समजून तो अर्जुनाला बोलतो, "पहा आपले सैन्य पळत आहे. कर्ण रुद्रासारखा त्यांचा संहार करत आहे. ह्या अंधार्या रात्री आणखीन काय अपेक्षा आपण करावी. त्या सैनिकांचे ओरडणे, विव्हळणे त्याला ऐकू येत होते. ज्या पद्धतीने कर्ण त्याना पळत असतांना मारत आहे हे युद्धनितीच्या विरूद्ध आहे, अशाने तो आपले सगळे सैन्य ठार मारू शकेल. त्यासाठी काय करावे म्हणजे कर्णाला चाप बसेल"?

पार्थ कृष्णाला सांगतो, "आपले राजे कर्णाच्या अवताराला पाहून घाबरलेले दिसत आहे. जशास तसे ह्या तुझ्या शिकवणूकीनुसार आता काय करावे ते सांगावे. म्हणजे त्यांचे पळणे थाबेल व त्यांचा संहारसुद्धा बंद होईल? आपले सैन्य द्रोणांच्या बाणाच्या वर्षावाने व कर्णाच्या हल्ल्यामुळें बेहाल झाले आहे. ते असहायपणे पळत आहेत. अशाने कौरवांचे नैतिक बळ सुधारेल जे आपल्यासाठी चांगले नाही. माझ्या समोर हे होत आहे ते मला मान्य नाही. म्हणून आपण आपला रथ कर्णाच्या पुढे घेऊन जाल तर बरे". "मी त्याला आजच मारून टाकतो".

वासुदेव त्याला सांगतो, "कर्णाकडे पहा, त्याचा अवतार पहा, तो दैवी शक्तीने प्रेरित असा लढत आहे ते समजून घे. अरे धनंजया, तुझ्या आणि घटोत्कचाशिवाय त्याला पराभूत करील असा कोणीही तिसरा नाही, परंतु, तू त्याला आत्ता मारण्यापेक्षा ते काम जर घटोत्कचाला दिले तर ते जास्त योग्य होईल. त्याचे कारण कर्णाकडे एक शलाक आहे जो त्याला इंद्राने दिला आहे व जो कर्ण फक्त एकदाच उपयोगात आणू शकतो. तो त्याच्या कडे आहे त्याचा उपयोग जर त्याने तुझ्यावर केला तर तुला वाचवणे मला मुष्किल होईल. जो पर्यंत तो त्याच्याकडे आहे तोवर तू कर्णाला उघडपणे आव्हान द्यावयाचे नाही असा माझा तुला सल्ला आहे. म्हणून आज आपण घटोत्कचाला त्यांचा परामर्श करण्यासाठी पाठवणे रास्त ठरेल. घटोत्कच तुझे ऐकतो म्हणून तू त्याला कर्णाचा परामर्श घेण्यासाठी सांगावे, ते उचीत असेल प्राप्त परिस्थितीत. तो कर्णाचा मुकाबला यशस्वीपणे करण्यास समर्थ आहे". अर्जुन भिमाला सांगून घटोत्कचाला बोलावणे धाडतो. तो पांडवांचा राजपुत्र राक्षस कुळाशी संबंध असलेला त्याच्या पुढे हजर होतो. त्याच्याकडे सगळी दैवी, राक्षसी व मानवी अस्त्रं आणि शस्त्रं असतात. तो कृष्णाला व धनंजयाला नमस्कार करतो. "हा मी हजर आहे, बोला काय आज्ञा आहे"? घटोत्कच बोलतो. कृष्ण त्याला सांगतो, "ऐक नीटपणे मी काय सांगतो ते, आता तुझी ताकद दाखवण्याची वेळ आली आहे. तू पांडवांच्या सैन्याला आज वाचवू शकशिल, तुझ्याकडे विविध आयुधं आहेतच. त्याशिवाय राक्षसांची मायावी सिद्धी सुद्धा आहे. कर्णामुळें सध्या पांडवांचे व पांचालांचे सैन्य पळत आहे ते थांबवण्यासाठी तुला कांहीं करावयाचे आहे. कर्ण आपल्या सैन्याचा संहार करत आहे. त्याला मारावयासाठी तुला पाठवले जाणार आहे. ते काम तुझ्याशिवाय इतर कोणी

करू शकणार नाही. तुझ्या राक्षसी शक्तीने ते तू साध्य करू शकशिल. कर्णाचा नाश करून तू पांडवांचे सैन्य वाचवू शकशिल. त्यासाठी तुझ्याकडे सगळी शस्त्रं साधन आहेत. ते जर आत्ता नाही केले तर पांडवांच्या विजयाची शाश्वती रहाणार नाही. विशेष म्हणजे ही रात्रीची लढाई आहे व तुम्ही राक्षस रात्री जास्त प्रभावी असता त्यामुळें तू अर्जुनापेक्षा जास्त योग्य आहेस कर्णाचा मुकाबला करण्यासाठी ह्या युद्धात. कर्णाचा वध करून तू पांडवांची मोठी सेवा करणार आहेस. तुझी मायावी भ्रमसिद्धी तुला वापरावी लागेल. जे अर्जूनाला शक्य नाही. त्यानंतर पार्थ धृष्टद्युम्नाच्या मदतीने द्रोणांचा परामर्श करतील".
संजय पुढे सांगतो, केशवाचे ते उद्‌गार ऐकल्यावर अर्जुन त्याला सांगतो, "अरे राक्षस पुत्रा, घटोत्कचा, तू आमच्या पांडवांतील एक प्रमुख योद्धा आहेस असा कीं ज्याची नेमणूक कर्णाला मारण्यासाठी करणे उचीत होईल. म्हणून तू आता जाऊन कर्णाचा नाश करून ये. त्यानंतर आम्ही इतर कौरवांचा परामर्श करणार आहोत. रात्रीच्या लढाईत कर्णासाठी तूच योग्य आहेस इतर कोठे कमी पडणार आहेत म्हणून त्यांना पाठवले जाणार नाही. तुला मागून सत्यकी संरक्षण देणार आहे".
ते ऐकल्यावर घटोत्कच बोलतो, "मी कर्णाचा परामर्श करू शकतो ते योग्य आपण सांगत अहात. माझा विश्वास आहे कीं, मी कर्णाला ठार मारू शकेन. त्यासाठी जी आयुध लागतात ती सगळी माझ्याकडे आहेत. मी त्याला मारले तर माझी सगळ्या जगात ख्याती होईल ते मला आवडेल. खरे तर, ती माझीच इच्छा आहे कीं, मी कर्णाचा वध करावा पण मी तसे बोलून दाखवत नव्हतो एवढेंच. आता तुम्ही तशी आज्ञा करत अहात ते उत्तम होत आहे. आज रात्री मी कर्णाचा वध करणार आहे हे निश्चित. त्याला माफी मी करणार नाही. राक्षसांच्या रिवाजानुसार मी त्याचा वध करणार आहे".
संजय पुढे सांगतो, त्या नंतर कर्ण व राक्षसांत मोठी लढाई होते. त्याचे भयंकर रुप पाहून कर्णाचे सैन्य घाबरून जाते. कर्ण मात्र न घाबरता त्याच्याशी लढत असतो. कर्णाच्या मुखावर हास्य असते. त्याचा आत्मविश्वास जबरदस्त असतो. ते युद्ध इंद्र आणि प्रह्लाद ह्यांच्या द्वंद्वासारखे होते. दोघे तुल्यबळ वाटत होते. दोघे जोरा जोरांने ओरडत होते.
घटोत्कच वध पर्व भाग एकशे एकाहत्तरावा संपला.

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे बाहत्तरावा

संजय पुढे सांगतो, दुर्योधन घटोत्कचाला कर्णाच्या दिशेने जाताना पहातो व दुःशासनाला बोलतो, "हा राक्षस कर्णाच्या तोडीचा आहे, तो आता कर्णाकडे जात आहे, त्याला तेथे जाण्यापासून थांबवले पाहिजे. त्यासाठी त्याच्या भोवती आपल्या सैनिकांचा वेढा घातला पाहिजे. म्हणजे तो कर्णापर्यंत जाऊ शकणार नाही. त्याच्या हातून आपल्या कर्णाचा वध होता कामा नये. जरासा बेसावधपणा आपल्याला भारी पडू शकतो". त्याच वेळी जटासूर नांवाच्या राक्षसाचा मुलगा, आणखीन एक राक्षस, दुर्योधनाला भेटण्यास आलेला असतो. तो जटासूराचा मुलगा तुमच्या मुलाला बोलतो, "अहो दुर्योधना, जर मला संधी दिली तर मी पांडवांचे पारिपत्य करण्यात आपल्याला मदत करू इच्छितो. ते पांडव ज्याना तुम्ही पराभूत करू शकत नाही, त्यांचा नाश करण्याचे माझे ब्रीद आहे. माझे पिता जटासूर जे एक महान राक्षस होते. त्यांचा वध त्या पांडवांपैकी एकाने केला आहे. त्याकरता मला त्यांचे रक्त व मांस माझ्या पित्याच्या श्राद्धासाठी पाहिजे आहे. म्हणून मला त्यांचा वध करण्याची परवनगी द्यावी. ते ऐकून दुर्योधनाला फार आनंद होतो. तरी त्याला महत्व न देण्याच्या उद्देशाने तो त्या राक्षसाला म्हणतो, "द्रोण व कर्णाच्या मदतीने मी माझ्या शत्रूंचा नाश करण्यात सक्षम आहे. मला दुसर्यांची मदत घेण्याची गरज नाही. परंतु, जर तुझी तशी इच्छा असेल तर प्रथम तू त्या पांडवांच्या राक्षसाबरोबर युद्ध करून त्याला ठार मार म्हणजे मी कदाचित तुझ्या विनंतीचा विचार करीन".

त्यानंतर तो जटासुराचा मुलगा घटोत्कचाला आव्हान देतो. तो त्याच्या विविध मायावी भ्रम आयुधाने त्याला फसवण्याचा प्रयत्न करत असतो. परंतु, घटोत्कच त्याकडे दुर्लक्ष करत अलमवुष आणि कर्णावरच आपले लक्ष केंद्रीत करतो. त्यानंतर तो कौरवांचे मोठे सैन्य बाद करतो. अलमवुष त्यानंतर त्याचे विविध बाण पांडवांवर मारू लागतो. त्यामुळें त्या मध्य रात्री पांडवांचे सैन्य रणभूमी सोडून जाते. त्याच प्रमाणे तुमचे सैन्यसुद्धा पांडवांच्या हल्ल्याने अस्ताव्यस्त झालेले होते. त्यात घटोत्कचाचे बाण तुमचे हत्ती घोडे मारत होते. अलमवुष घटोत्कचावर त्याच्या बाणांचा मारा करू लागतो. घटोत्कच त्याच्या आयुधानी

शत्रूपक्षाचे सैन्य, हत्ती घोडे मारून टाकतो. त्यांमुळें तुमचे लोक व्यथित होतात. सगळे चारही प्रकारचे सैन्य एकमेकांवर हल्ले करू लागले होते. त्यात जटासुराचा मुलगा, त्याचा रथ, घोडे व सारथी गेल्यामुळें बेसहारा झाला होता. तरी तो घटोत्कचावर हल्ला करतो. त्यांची हातापायी होते. त्याच्या फटक्याने घटोत्कचाला त्रास झालेला दिसतो. त्यानंतर तो चिडतो व त्याच्या गदेने जटासुराच्या मुलाला जोरात मारतो. त्यानंतर तो त्याला उचलून जोरात आपटतो व नंतर त्याचा गळा दाबू लागतो. त्याच्या तावडीतून तो निसटतो व आता तो घटोत्कचाचा गळा दाबू लागतो. ते द्वंद्व भयंकर होते. प्राचीन काळी इंद्र आणि विरोचनांचे जसे झाले तसे ते होते. त्यांच्या द्वंद्वांत अनेक विचित्र भ्रमदृष्ये दिसत होती. त्यामुळे पहाणार्याचा गोंधळ होत होता. लढतांना ते कधी आकाशात उडून जात होते तर मध्येच खाली येत होते. त्यांच्या द्वंद्वांत ते गदा, सोटे, तलवारी, कुर्हाडी असे विविध शस्त्रं वापरत होते. कधी ते घोड्यावर दिसत तर कधी रथात. असे सगळे विचित्र दिसत होते. त्यांचे द्वंद्व माणसांच्या सारखे नव्हते. घटोत्कच त्याला जमिनीवर दाबतो जोराने त्यामुळे तो मरेल अशी अपेक्षा होती. त्यानंतर घटोत्कच एक धारदार तलवार घेतो आणि त्याचे मुंडके कापून टाकतो. ते कापलेले डोके कांहीं बोलत होते. घटोत्कच ते रक्ताने भरलेले मुंडके त्याच्या केसांने पकडतो आणि दुर्योधनाला दाखवतो. त्यानंतर हसत हसत तो ते मुंडके त्याच्या रथात फेकतो. तो दुर्योधनाला बोलतो, "तुझा हा दोस्त आता मेला आहे. आता तुझ्या कर्णाची पाळी आहे मरण्याची. त्यानंतर तुझी वेळ येणार आहे. जो ह्या तीन गोष्टी पाळतो, नैतिकता (चांगुलपणा), हित आणि सुख तो कधी रिकाम्या हाताने राजाकडे, ब्राह्मणाकडे व स्त्रीकडे जात नाही. कर्ण मारे पर्यंत तू मजेत रहा. मी हे तुझ्या दोस्ताचे मुंडके तुला देत आहे, हे आपल्या लढाईचे एक द्योतक समज". असे बोलून तो कर्णाकडे निघतो. त्यानंतर जी लढाई होते एका राक्षसा मध्ये व माणसात ती फार भयंकर होती. आकाशातील प्रेक्षकांची चांगली करमणूक झाली.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे बाहत्तरावा संपला.

## घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे त्र्याहत्तरावा

धृतराष्ट्र विचारतो, "त्या अंधारात ते कसे लढत होते ते मला समजत नाही. कर्ण व राक्षस घटोत्कच कसे लढत होते? त्यासाठी ते कोणती वाहने वापरत होते? तो भयंकर दिसणारा राक्षस कसा वागत होता"? त्याचे घोडे कसे होते ते मला सांग. त्यांची आयुधं कोणती होती, त्याचे धनुष्य कसे होते, बाण कसे होते, त्याचा पोषाख कसा होता, ते सगळे मला वर्णन करून सांग. तुझे सांगणे मला फार आवडते".

संजय सांगू लागतो, लाल डोळे असलेला तो राक्षस ज्याचा आकार प्रचंड होता, त्याचे पोट मोठे होते, त्याच्या अंगावर केस असे होते जसे काटे असावेत. त्याच्या डोक्याचा रंग हिरवा होता, त्याचे कान टोकदार होते, त्याची हनुवटी लांब होती. त्याचे तोंड मोठे व उघडलेले होते, त्यातून त्याचे दांत व सुळे बाहेर आलेले दिसत होते, त्याची जिभ तोंडाबाहेर लांब आलेली होती तसेंच त्याचे ओठ मोठे व जाड होते. दोनही तांबड्या रंगाचे होते. त्याच्या भुवया जाड व कानापर्यंत पसरलेल्या होत्या. त्याचे नाक मोठे व रुंद फताडे होते ज्याच्या दोन बाजूला त्याचे डोळे होते. त्याचे शरीर नीळ्या रंगाचे होते, त्याच्या मानेचा रंग लाल होता, तो एकाद्या डोंगरासारखा उंच होता. ते सगळे रुप मोठे भिववणारे होते. त्याचे हात अवाढव्य होते. डोकेसुद्धा प्रमाणाने मोठे होते. त्याच्या कडे पाहिले कीं, समजत असे कीं, तो एक बलाढ्य राक्षस आहे. ते रुप कुरूप होते. त्याच्या डोक्यावरील केसांचा बुचडा बांधलेला होता तेसुद्धा भयंकर वाटत होते. त्याचे ढुंगण मोठे होते. त्याच्या अंगावर त्याला साजेसे अलंकार, आभूषणं होती. त्याच्यामध्ये भ्रमसिद्धी होती ज्यामुळें तो त्याच्या प्रतिस्पर्ध्याला सहजपणे चकवू शकत असें. त्याचा मुकूट सोन्याचा होता. तो त्याला साजेसा होता. त्याने एक चिलखत घातले होते जे त्याच्या शरीराला संरक्षण देत होते. ते कोणत्याही बाणाने फाटणारे नव्हते. त्याच्या कानांत मोठी कुंडलं होती . त्याचा रथ लोखंडाचा होता त्यावर सोन्याचे नक्षीकाम केलेले होते. त्या रथाला छोट्या घंटा लावलेल्या होत्या त्यांचा आवाज होत असें जसे तो रथ धावत असे. त्या रथावर अनेक लाल रंगाचे झेंडे फडकत होते. त्याच्या रथावर अस्वलाचे कातडे लावलेले होते. त्या

रथात मानवी, दैवी आणि असुरी अशी सगळी आयुधं सज्ज होती. त्याच्या रथाला आठ चाकं होती. त्याचे घोडे हत्ती एवढे होते. त्यांचे अक्राळ विक्राळ रुप कोणाच्याही छातीचा ठोका चुकवणारे होते. ते सतत गुरगुरत होते. त्यांचे डोळे मोठे व लाल रंगाचे होते. त्या घोड्यांवर विविध रंगांच्या छटा होत्या. त्यांच्या आयाळी लांब होत्या. त्यांच्या मोठ्या तोंडातून त्यांच्या जिभा लोंबत होत्या व त्यांचे दात दिसत होते. त्याचा सारथी त्याच्या सारखाच भयंकर दिसत होता. जसे सूर्याचा अरुण तसा तो घटोत्कचाचा होता. रथावरील स्तंभ आकाशाला भिडणारा होता. त्याच्यावर लहान मोठी गिधाडं बसलेली होती. त्या गिधाडांचे शरीर लाल रंगाचे होते. ती अधून मधून त्यांची विस्तीर्ण पंख उघडून फड फड आवाज करत होती. ती गिधाडं सगळीकडे सतत पहात होती जसें संरक्षक सैनिक आजूबाजूला पहात असतात. घटोत्कचाने आल्या बरोबर त्याच्या धनुष्याचा टणत्कार केला. त्या आवाजाने सगळे क्षत्रिय दचकले. त्या धनुष्याची दोर फार जाडी व मजबूत होती. सहजपणे तुटणारी नव्हती. सर्व तयारीने तो त्या काळोख्या रात्री कर्णावर चाल करतो. सगळे घाबरले होते परंतु, राधासुत घाबरलेला दिसत नव्हता. तो त्या अजस्त्र राक्षसाचे रुप अभ्यासत होता. त्याच्या चेहर्यावर हास्य होते असे कीं, त्याने ते आव्हान स्वीकारले होते. जसे दोन हत्ती एकमेकांवर जावेत तसे ते जात होते. त्यांचे द्वंद्व सुरू होते जसे इंद्र व समवरांचे झाले प्राचीन काळी. ते एकमेकांची कवच फाडून टाकण्याचा प्रयत्न करत असतात. एकमेकांना ते जखमा करत असतात. त्यांचे द्वंद्व पहातांना भिती वाटत होती. जोरात ते लढत होते पण कोणीही माघार घेत नव्हते. घटोत्कचाच्या धनुष्याचा टणत्कार सर्वांना घाबरवत होता. काहीवेळा असे दिसत होते कीं, कर्णाला राक्षस भारी जात आहे. पण पुन्हा बरोबरी होत होती. घटोत्कचाला समजते कीं, आता तो त्याची भ्रमसिद्धी वापरेल तरच काम होईल, तेव्हां तो भ्रमसिद्धी वापरू लागतो. त्याप्रमाणे अचानकपणे अनेक राक्षस कर्णाला दिसू लागतात. ते सगळे त्याच्यावर हल्ला करण्याच्या तयारीने पुढे होत असतात. कर्ण त्यामुळे बिचकतो, ते पाहून घटोत्कच त्याच्या आयुधांनी कर्णावर चाल करतो. घटोत्कच त्याची गदा उचलतो त्याच वेळी आकाशातून दगडांचा पाऊस पडू लागतो. रात्री राक्षस जास्त बलवान होतात त्याप्रमाणे तो खूप जास्त बलवान झाला होता. त्याच प्रमाणे आकाशातून रथाची चाकं, भूशुंडी, शलाक, तलवारी, भाले असें

कितीतरी पडू लागतात. त्या मारामुळे कौरवांचे राजे व त्यांचे सैनिक पळून जाऊ लागतात. फक्त कर्ण न डगमगता लढत होता. त्याचा आत्मविश्वास त्याला ताकद देत होता. कर्ण त्याच्या मंतरलेल्या बाणांने ती सगळी भ्रमदृष्ये नष्ट करत होता. आपली भ्रमदृष्ये नष्ट होत आहेत हे पाहून राक्षस आणखीन चवताळला. कर्णाचा वध करण्याच्या उद्देशांने तो मोठ्या बाणांने जे हत्तीसाठी वापरतात ते कर्णावर मारू लागला. कर्ण घटोत्कचावर दहा बाण मारतो. ते बाण त्याला वर्मी लागतात व त्याचा त्याला फार त्रास होतो. म्हणून तो एक दैवी चक्र उचलतो, त्याला हजार आरे असतात, ते कर्णावर फेकतो. त्याने कर्ण मरेल असे त्याला वाटत असते. परंतु, कर्णाच्या मंतरलेल्या बाणाने ते शतशः छिन्नभिन्न होते व खाली पडते. ते आयुध व्यर्थ जाते. तो प्रयत्न फसला हे समजल्यावर राक्षसाला फार राग येतो. तो कर्णावर बाणांचा मारा सुरू करतो. त्या बाणांमुळे कर्ण घेरला जातो. कर्ण घटोत्कचाच्या रथाला त्याच्या बाणाने घेरतो. अशाप्रकारे ते एकमेकांना आवरण्याचा प्रयास करत असतात. त्यानंतर राक्षस त्याच्या मायावी विद्येच्या मदतीने आकाशातून मोठी झाडे खाली टाकू लागतो. त्यानंतर कर्ण घटोत्कचाचे भ्रमदृष्य नष्ट करतो त्याच्या मतरलेल्या बाणाने. आकाशात गेलेल्या राक्षसाला तो त्याच्या बाणांने खाली आणतो व त्याच्यावर बाणांचा वर्षाव करू लागतो. त्या असंख्य बाणांमुळें घटोत्कच एकाद्या प्रचंड साळूखी सारखा दिसत होता. त्यानंतर तो घटोत्कचाचे घोडे, सारथी व इतर गोष्टी संपवतो. तो बाणांचा वर्षाव असा होता कीं, आम्ही त्यातून कोणालाही पाहू शकत नव्हतो. त्याच्या मायावी सिद्धीने तो आकाशातून कर्णावर बाणांचा वर्षाव करू लागतो. घटोत्कच आता कर्णाशिवाय इतर कौरवांच्या सैनिकांना त्याच्या सिद्धीने घाबरवू लागतो. त्याची असंख्य तोंड कर्णाने फेकलेली अस्त्र खाण्यास सुरूवात करतात. त्यानंतर असंख्य जखमामुळे त्याला ग्लानी येते. तो मेल्यासारखा निपटितपणे पडून रहातो. कौरवांना वाटते कीं, घटोत्कच मेला आहे, ते जोराने विजयाच्या घोषणा करू लागतात. परंतु, आता तो सगळीकडे दिसू लागतो. त्यातील खरा कोणता ते समजत नव्हते. मनैक पर्वताला जशी शेकडो शिखरं आहेत तसे ते दिसू लागते. कोठे बाण मारावयाचा म्हणजे त्याला लागेल ते कर्णाला समजेना. पुन्हा तो लहान होतो इतका कीं त्याला बाणांने मारणे शक्य नव्हते. तो सगळीकडे वारा जावा तसा फिरू लागतो. कर्णाला त्याला मारणे अशक्य झाले होते

कारण, नेमका तो कोठे आहे तेंच समजत नव्हते. कधी येथे तर कधी तेथे असे तो दिसत होता. कधी पाण्यातून बाहेर येत होता व मातीत घूसत होता. कर्ण त्यामुळें चक्रावून गेला होता. कधी तो कर्णाच्या रथात दिसत होता तर कधी फार लांब गेलेला दिसत होता. अशारितीने कर्णाला बुचकळ्यात टाकत तो त्याला बोलतो, "आणखीन थोडा थांब, तू मला कसा पकडणार? आज मी तुझी लढण्याची सगळी हौस पुरी करणार आहे. त्यानंतर तू लढण्यासाठी रहाणारच नाहीस". असे बोलून तो राक्षस आकाशात उंच भरारी मारतो व हसत हसत खाली येऊ लागतो वेगांनी. तो आकाशातून कर्णावर आंसाच्या लांबीचे बाण फेकू लागतो. त्यामुळे कर्णाचा आत्मविश्वास कमी होत जावा असा त्याचा उद्देश होता. कर्ण ते थांबवू शकत नाही पण त्यांचा प्रभाव कमी करत असतो. पुन्हा एकदा घटोत्कच अदृष्य होतो. त्यानंतर तो आकाशात एक मोठा डोंगरासारखा होतो व तेथून तो शस्त्रं फेकू लागतो. कर्णाला त्याचे कांहींच वाटत नाही. कर्ण त्याच्या दैवी अस्त्रांने ते नष्ट करतो. पण इतर कौरव मात्र त्यामुळें प्रभावित झालेले होते. ते रणभूमी सोडून जाऊ लागतात. त्यानंतर घटोत्कच एक निळे ढगाचे रुप घेतो व त्यातून दगडांचा वर्षाव करू लागतो. कर्ण ज्याला वृष सुद्धा बोलले जात असे, आता वायव्य अस्त्र काढतो व त्याने घटोत्कचाचे ढग पुढे ढकलून देतो. त्याच्या दैवी शस्त्राने तो घटोत्कचाची सगळी अस्त्रं निकामी करत असतो. पण त्यांना कांहीं अंत नसतो. पुन्हा तो मोठ्यानो हसत हसत आणखीन भ्रमदृष्य कर्णावर पाठवत असतो. आता तो त्याच्या रथात येतो व त्याच्या बरोबर असंख्य भयंकर दिसणारे राक्षस असतात त्यांना सिंह, वाघ ह्यांची तोंड होती. कांहीं हत्तीवर होते, कांही रथात होते, त्यांच्याकडे विविध शस्त्रं होती, कर्ण त्या सगळ्यांना मारण्यासाठी त्यांच्यावर बाणांचा मारा करू लागतो. पण ते मरत नाहीत कारण ते सगळे खोटे होते. घटोत्कच मात्र कर्णावर मोठे बाण मरू लागतो. घटोत्कच अंजलिका नांवाचे अस्त्र फेकतो व कर्णाचे धनुष्य मोडून टाकतो. कर्ण नवीन धनुष्य घेतो. त्याने तो राक्षसावर बाण मारू लागतो. त्या बाणांने राक्षसाला त्रास होतो असें दिसते. त्या भ्रमदृष्यातील सगळे राक्षस कर्ण घालवून टाकत असतो. त्यावेळी तो फार तेजस्वी दिसत होता. घटोत्कच मात्र फारच रागावलेला होता कारण अजून त्याला कर्णाला ठार मारता आलेले नसते. दोघेही एकमेकांचा जीव घेण्यासाठी उतावीळ असलेले दिसत होते. कर्णाला तो एका रथात दिसतो जो

घटोत्कचाचा आणखीन एक भ्रम होता. त्या रथाला गाढवं खेचत होती व त्याचे सारथी पिशाच्च होती. घटोत्कच त्या सारथ्याना ओरडून बोलतो कीं, त्याला कर्णाकडे घेऊन जा. त्यांचे द्वंद्व सुरू होते. राक्षस अशनि रुद्राच्या बनवटीचे फेकतो. कर्ण त्याच्या रथातून उडी मारून खाली येतो व ते अशनि झेलतो, ते तो पुन्हा घटोत्कचाच्या अंगावर फेकतो. त्यामुळे राक्षसाचा रथ भस्म होतो आणि ते सगळे एकदम नाहीसे होते कारण, ते सगळे भ्रम होते. अशनिसुद्धा भ्रम होते. सगळे आकाशातील प्रेक्षक त्यांचे कौतुक करतात. कर्ण पुन्हा त्याच्या रथात चढतो. कर्ण बाणांचा वर्षाव करू लागतो. घटोत्कच पुन्हा दिसेनासा होतो. अशाप्रकारे घटोत्कच कर्णा कडे असलेली स्वर्गीय शस्त्रं एकेक करून नष्ट करत असतो. ते कर्णाला समजते पण तो न घाबरता त्याचे युद्ध चालू ठेवतो. आता घटोत्कच अनेक रुपाने तेथे अवतरतो जे पाहून कौरवांचे सैनिक गोंधळून जातात. तो त्या रणभूमीत सिंह, वाघ असें दाखवू लागतो जे सैनिकांवर हल्ला करून लागतात. त्यावेळी कर्णाने मारलेला एक बाण त्याला वर्मी लागतो व तो अदृष्य होतो. त्याच वेळी ती हिंस्र जनावरं कर्णावर धावून जातात त्याच्या रथावर चढतात त्याला खाण्यासाठी. त्यांच्या भीषण डरकाळ्या सगळ्यांना घाबरवतात. परंतु, कर्ण न घाबरता त्यांना बाणाने जखमी करत असतो. अखेरीस तो त्याच्याकडे असलेले स्वर्गीय अस्त्र वापरून ते मायावी दृष्य नष्ट करतो. कर्ण घटोत्कचाचे घोडे मारून टाकतो. त्याचे भ्रम दृष्य नष्ट झालेले तो पहातो व पुन्हा अदृष्य होतो. जातांना तो कर्णाला बोलतो कीं, "मी लवकरच तुझा समाचार घेण्यासाठी येणार आहे".

घटोत्कच पध पर्व भाग एकशे त्र्याहत्तरावा संपला.

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे चौर्याहत्तरावा

संजय पुढे सांगतो, कर्ण व घटोत्कच ह्यांच्यातू द्वंद्व चालू असतांना आणखीन एक राक्षस अलायुध नांवांचे दुर्योधनाला भेटतो. त्याच्या बरोबर त्याचे राक्षस सैन्य असते. ते सगळे राक्षस फारच भयंकर दिसत होते. तो सांगतो कीं, त्याच्या वंशातील अनेकांचा वध ह्या पांडवांनी निरनिराळ्या प्रसंगी केला आहे. त्याचा सूड उगवण्यासाठी तो कौरवांना सामील होऊ इच्छित आहे. तो सागतो कीं, त्याचे आप्त जसें, बकासूर, किरमिरा, हिडींब त्या भिमाने मारले आहेत. त्याचा राग त्या सगळ्या राक्षसांना आहे, त्यासाठी ते कौरवांच्या बरोबर संधी करू इच्छित होते. त्यांना भिमाचा वध करावयाचा आहे म्हणून ते दुर्योधनाला सांगतात. पुढे तो राक्षस रागावून बोलतो कीं, त्याची एक राक्षिशिण हिंडींबा भिम खराब करतो ते त्या राक्षसांना अजिबात आवडत नाही. कौरवांच्या साठी तो त्याकरता लढण्यास तयार आहे. हिडींबाचा मुलगा सुद्धा त्याच्या बापाच्या वळणावर गेला आहे म्हणून त्याचासुद्धा ते वध करणार असतात. त्यांना मारल्यानंतर तो व त्याचे साथीदार त्यांना खाणार असतात. त्या भिमाबरोबर इतर पांडव सुद्धा ते मारून खाणार आहेत त्यात वासुदेवसुद्धा ते खाणार होते. तो पुढे सांगतो कीं, कौरवांचे सगळे सैन्य मागे घ्या व राक्षसांना त्याच्या बाजूने लढण्याची परवानगी द्या. ते ऐकून दुर्योधनाला फार आनंद होतो. त्याची भावंडसुद्धा तो प्रस्ताव योग्य समजतात. ते सांगतात कीं, ते सगळे मिळून पांडवांशी लढणार आहेत. दुर्योधन त्यांना सांगतो कीं, त्याचे योद्धे केवळ बघ्याची भूमिका करणार नाहीत. तेसुद्धा त्यांना मदत करणार आहेत. कारण, पांडव हे दोघांचे समान वैरी आहेत. ते मोठ्या जोमांने भिमावर चाल करतात. राक्षस अलायुध त्याच्या सूर्यासारख्या चमकणार्या रथात असतो. अलायुधाची गाडी घटोत्कचाच्या गाडीसारखीच होती. त्याच्या चाकांचा खडखडाट सुद्धा तसांच होता. त्याचे घोडे सुद्धा घटोत्कचाच्या घोड्यासारखे होते व त्यांचे ओरडणे गाढवासारखे होते. फक्त रक्त व मांस खाणारे ते राक्षसांचे सैन्य शंभराने होते, ते भिमावर चालून जातात. त्याचे बाण व धनुष्य सुद्धा तसेंच होते. त्याच्या रथाच्या स्तंभावर गिधाडं बसलेली होती जशी घटोत्कचाच्या रथावर होती. अलयुध घटोत्कचापेक्षा बरा

दिसत होता माणसाच्या दृष्टीने. त्यांच्याकडे ती सगळी आयुध होती जी घटोत्कचाकडे होती. त्या राक्षस सैन्याच्या हातात असलेल्या आयुधांतून विजा चमकत होत्या. पांडवांचे राजे त्या राक्षसाबरोबर युद्ध करण्यास तयार होते.

घटोत्कच वध परिव भाग एकशे चौर्याहत्तरावा संपला.

## घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे पंच्याहत्तरावा

संजय पुढे सांगतो, अलयुधाला त्यांच्या साठी लढण्याची इच्छा आहे ते समजल्यावर कौरवांच्या गोटाला आनंद होतो. दुर्योधनाला त्यांचे नेतृत्व करण्याची संधी मिळणार म्हणून सगळा कौरव गण खूषीत असतो. कौरवांना वाटते कीं, हि एक नामी संधी आहे पांडवांचे पारिपत्य करण्यासाठी. ते सगळे अलयुधाचे स्वागत करतात.

घटोत्कच व कर्णाच्या त्या रात्री झालेल्या द्वंद्वामुळें आकाशातील प्रेक्षकांची चांगली करमणूक झाली होती. पांचाल व इतर योद्धे तो भ्रमदृष्यांचा खेळ मोठ्या मजेने पहात होते. दुसरीकडे तुमचे सैन्य जरी द्रोणांकडून व कृपांकडून सुरक्षित होते तरी मोठ्याने ओरडत होते. त्याना खात्री वाटत होती कीं, राक्षस कर्णाला मारणार. दुर्योधन पहातो कीं, कर्ण घटोत्कचाच्या क्लुप्त्यांमुळे जेरीस आला आहे व त्याच्यात थकल्याची लक्षणं दिसू लागतात. युद्धात थकल्याचे लक्षण हे हरण्याचे लक्षण मानले जात होते. दुर्योधन अलयुधाला कर्णाला मदत करण्याचे सांगतो. "तेथे कर्ण व घटोत्कच लढत आहेत त्यात तू कर्णाला मदत करण्यास जा", असें तो सांगतो. पुढे तो त्याला बोलतो, "ते पहा हिडींबाच्या मुलांने आमचे योद्धे कसे ठार मारले आहेत. आता तू जा व त्याला मारून दाखव. तो हिडींबाचा मुलगा त्याची मायावी सिद्धी वापरून हे करत आहे तेव्हां त्याला तू तुझ्या सिद्धीने जाब दे". तशी आज्ञा झाल्यावर अलयुध घटोत्कचावर चाल करतो. त्याबरोबर घटोत्कच कर्णाला सोडून, अलयुधावर जातो. त्यांच्यात द्वंद्व सुरू होते. त्यांच्यात बाणयुद्ध सुरू होते. कर्ण तेथून मोकळा झाल्याबरोबर भिमाकडे जातो. भिम मात्र आपल्या मुलाच्या मदतीला जाणे योग्य समजतो. तो कर्णाकडे पूर्ण दुर्लक्ष करतो व घटोत्कचाला मदत करण्यासाठी तेथे जातो. भिमाला अलयुध पहातो. तो घटोत्कचाला सोडतो व भिमाकडे जातो. त्यांच्यात बाणयुद्ध सुरू होते. अलयुधाचे राक्षसी सैनिक त्याच्या मदतीसाठी भिमावर चाल करतात. भिम त्या सगळ्यावर प्रत्येकी पांच बाण मारतो. ते फार जोरदार असतात. भिम मोठ्याने गर्जना करतो व त्यांचे आव्हान स्वीकारतो. ते बलवान राक्षस पहातात कीं, भिमाच्या गर्जनेने कांही राक्षस घाबरलेले आहेत. अलयुध मात्र लढत असतो.

भिम बाणयुद्ध थांबवून गदा त्याच्यावर फेकतो. ती गदा ज्योतीप्रमाणे त्या नरमांस भक्षक राक्षसाला लागणार तितक्यात अवयुध त्याच्या गदेने ती उलटवतो. ती भिमाची गदा आता त्याच्याच अंगावर जाऊ लागते. भिम पुन्हा बाण मारू लागतो. अलयुध ते सगळे बाण पाडतो. आता ते भिमाचे हत्ती मारण्यास सुरूवात करतो. त्यात पांचाल व श्रींजयांचे हत्ती होते. त्यामुळे भिमाला फार राग येतो.

दोनही कृष्ण ते पहात असतात, वासुदेव धनंजयाला बोलतो, "आपला भिम थकत असल्याचे दिसत आहे त्या अलयुधापुढे, म्हणून चटकन आपण त्याला मदत करण्यासाठी गेले पाहिजे. दुसरा कोठलाही विचार करू नकोस, धृष्टद्युम्न, शिखंडी, युधमन्यू, उत्तमौजस आणि द्रौपदीची मुलं कर्णाला अडवतील. नकूल व सहदेव आणि सत्यकी तुझ्या नेतृत्वाखाली इतर राक्षसांना मारतील. तू द्रोणांवर लक्ष ठेव. प्रसंग मोठा बाका आहे". कृष्णाचे ते बोलणे झाल्यावर त्याप्रमाणे ते पांडवांचे योद्धे कर्णावर चाल करतात. दुसरी फळी त्या इतर राक्षसांवर जाते. त्या सुमारास अलयुधाचा एक बाण भिमाच्या धनुष्याला तोडतो. त्यानंतर तो भिमाचे घोडे मारतो. अशारितीने भिम बेसहारा होतो. तो त्याच्या रथातून उतरतो व एक मोठी गर्जना करत गदा त्या राक्षसावर फेकतो. अलयुध त्याच्या गदेने ती परतवतो. आता तो राक्षस मोठ्याने गर्जना करतो. ते पाहून भिमाला ते आव्हान आवडते तो आणखीन एक गदा घेतो. आता त्यांच्यात गदायुद्ध सुरू होते. त्या गदाद्वंद्वाने सगळी पृथ्वी जणू हादरून निघते. ते गदा टाकून आता कुस्तीवर उतरतात. ते जे हातात येईल ते फेकून लढत असतात. एकमेकांच्या डोक्यात त्या वस्तु ते मारत असतात. दोघे त्यांच्या रक्ताने माखलेले असतात. दोन चिडलेले हत्ती झुंजावेत असे ते होत होते. ते होत असतांना कृष्ण जो नेहमी पांडवांचे भले पहाणारा आहे, घटोत्कचाला त्याच्या बापाला मदत करण्यासाठी सांगतो.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे पंच्याहत्तरावा संपला.

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे श्याहत्तरावा

संजय पुढे सांगतो, वासुदेव घटोत्कचाला बोलतो, "ते पहा, भिमावर त्या राक्षसाने जोराचा हल्ला केला आहे, सगळ्यांच्या समक्ष ते होत आहे, आता कर्णाशी लढण्यापेक्षा तुझ्या पित्याला मदत करणे जास्त श्रेयस्कर आहे. ताबडतोब जा आणि अलयुधाचा वध कर. त्यानंतर कर्णाचा परामर्श घे". वासुदेवाची ती आज्ञा प्रमाण मानून तो त्वरित भिमाच्या मदतीला जातो. अलयुध बकासुराचा भाऊ होता. त्यानंतर त्या काळोख्या रात्री त्या दोन राक्षसांत भयंकर द्वंद्व सुरू होते. त्याच वेळी युयुधन, नकूल, सहदेव अलयुधाच्या राक्षसांचा नाश करत होते. त्याचवेळी अर्जुन द्रोणांच्या क्षत्रियांचा नाश करत होता. कर्ण राक्षसाच्या तावडीतून सुटल्यानंतर पांचालांचे योद्धे मारू लागला होता. त्याला धृष्टद्युम्न, शिखंडी विरोध करत होते. नकूल, सहदेव आणि सत्यकी अलयुधाचे राक्षस मारून टाकतात. त्यानंतर ते तिघे कर्णाकडे निघतात. ते सगळे आता कर्णावर चाल करतात. त्याच वेळी पांचाल द्रोणांना घेरत होते. घटोत्कच भिमाला मदत करण्यासाठी आलेला पाहून अलयुध त्याच्यावर हल्ला करतो. अलयुध घटोत्कचाच्या डोक्यात एक मोठे परीघ हाणतो. त्या फटक्याने तो बेशुद्ध होतो तसांच पडून असतो. परंतु, लवकरच तो सावध होतो. घटोत्कच अलयुधावर एक मोठी गदा मारतो. त्या गदेच्या फटक्याने अलयुधाचे घोडे व सारथी मरतात. अलयुध आता त्याची भ्रमसिद्धी वापरण्यास सुरूवात करतो. आकाशात काळी ढग येतात व त्यांतून विजांचा चमचमाट होऊ लागतो. जसे वादळ सुरू होणार आहे, असे वाटावे. आकाशातून मोठे गडगडाटाचे आवाज येऊ लागतात. परंतु, घटोत्कच उंच आकाशात जातो व ते भ्रमदृष्य बंद करतो. त्यामुळे चिडलेला अलयुध आता घटोत्कचावर दगडांचा मारा करू लागतो. त्यानंतर विविध प्रकारची शस्त्रं तो त्याच्यावर फेकून मारू लागतो. सगळे खोटे होते पण खर्या सारखे भास होत होते. ते सुद्धा घटोत्कच त्याच्या सिद्धीने बाद करतो. त्यानंतर ते दोघे एकमेकांवर विविध प्रकारची आयुध फेकून मारू लागतात. त्यात आयुधांबरोबर कित्येक प्रकारची झाडं ते फेकत असतात. दोनही बाजूनी तसे होत असल्यामुळे त्याचा फार मोठा आवाज होत असतो. ते युद्ध त्या दोन राक्षसांतील

फारच भयंकर होते. जसे पूर्वीच्या काळी वानरकुळांतील वली आणि सुग्रीवात झाले होते. जे मिळेल ते मारून ती लढाई होत होती. त्यानंतर ते दोघे एकमेकाशी हातापाई करू लागतात. एकमेकांचे केस ओढू लागतात. ते त्या द्वंद्वांत एकमेकांच्या मारामुळें जखमी झालेले होते व त्याचे रक्त व घाम मातीत मिसळत होते. त्यांच्या कुस्तीमुळे त्यांचे रक्त व घाम यांचे शिंतोडे उडत होते चौफेर. ते मोठ्याने ओरडून आव्हान देत होते. अखेरीस अलयुध थकतो त्याबरोबर घटोत्कच त्याला उचलतो व जोरांने जमिनीवर आदळतो. त्याचे मुंडके कापून टाकतो. ते कानात कुंडलं असलेले मोठे डोके वर धरून तो मोठ्याने ओरडत आपली जीत जाहीर करतो. अलयुधाचा वध झाल्याचे समजल्यावर पांचाल व पांडवांचे सैनिक जोराजोराने ओरडून आनंद व्यक्त करतात. त्या रात्री ते दिवे वर करून त्या मंद प्रकाशात आपला विजय साजरा करत असतात. शंखू वाजवले जातात. पांडवांची जीत झाली हे सगळ्यांना समजते त्या रात्रीच्या लढाईत. अनेक वाद्ये वाजू लागतात. घटोत्कच अलयुधाचे डोके दुर्योधनाच्या पुढ्यात फेकून देतो. अलयुधाच्या मृत्यूमुळे पुन्हा कौरवांत दुःखाची छाया दिसू लागते. अलयुध व त्याचे सगळे राक्षस मारले गेले जातात त्या रात्रीत हे विशेष असते पांडवांसाठी. अलयुध स्वतः तेथे पांडवांशी लढण्यासाठी आला होता. त्याला भिमाला मारावयाचे होते पण त्या ऐवजी तोंच भिमाच्या मुलाच्या हातून मारला गेला होता. दुर्योधनाली खात्री वाटत होती कीं, ह्यावेळी पांडवांतील एक तरी मारला जाईल, पण ते होत नाही. त्याला वाटू लगते कीं, हे पांडव दिर्घायुषी असावेत. त्याला भिमाची प्रतिज्ञा आठवते ज्यात तो बोलतो कीं, तो सगळे कौरव मारणार आहे.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे श्याहत्तरावा संपला.

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे सत्याहत्तरावा

संजय पुढे सांगतो, अलयुधाचा वध झाला होता. त्यामुळें घटोत्कचाला फार संतोष झाला होता. लष्कराच्या मध्ये उभे राहून तो मोठ्याने गर्जना करत असतो. त्याच्या त्या गर्जना अशा होत्या कीं त्या ऐकून हत्ती घाबरल्या सारखे झाले होते. घटोत्कच अलयुधा बरोबर लढत आहे ते पाहिल्यावर कर्ण पाचालांवर चाल करतो. तो धृष्टद्युम्न व शिखंडीला बाणांने जेरीस आणतो. त्याशिवाय युधमन्यू व उत्तमौजसाला तो बाण मारतो, त्यानंतर तो सत्यकीला बाण मारतो. त्या काळोख्या रात्री त्यांच्या धनुष्याचे आवाज सगळ्यांना ऐकू येत होते. त्यामध्ये रथांच्या चाकांचा खडखडाट भर घालत होता. पांडवांच्या कडून वेगांने येणारे बाण कर्ण लिलया उलटवत होता. कर्ण ते तुझ्या मुलाच्या भल्यासाठी करत होता. पांडवांच्या योद्ध्यांचे सैनिक मरत होते, कित्येक रथ मोडले जात होते, त्यावरील झेंडे फाटून जात होते, सैनिकांचे मृतदेह सगळीकडे विखूरलेले दिसत होते. ते कोणासाठी कां मरत होते ते त्यांनासुद्धा माहित नसावे. पांडवांचे सैनिक युधिष्ठीराच्या संरक्षणाखाली जातात. आपल्या फौजांचे असे हाल होत आहेत ते पाहून घटोत्कच कर्णावर चाल करून जातो एक मोठी गर्जना करत. कर्ण त्याच्यावर बाणांचा वर्षाव करतो. दोघांचे काटेरी बाण आकाशापर्यंत उंच फेकले जात असतात. त्यात विविध प्रकारचे बाण होते. त्याशिवाय नलिका, अशनि, दंड अशी अस्त्रं ते एकमेकांवर फेकत होते. आकाशात ती अस्त्रं एकमेकांना लागून मोठा आवाज करत होता व नष्ट होत होती. कोणीही कोणापेक्षा वरचढ वाटत नव्हता. अशाप्रकारे तोडीस तोड युद्ध होत होते. जसें राहू व सूर्याचे द्वंद्व होत होते.

संजय पुढे सांगतो, घटोत्कचाला समजते कीं, तो कर्णाच्या बरोबर जास्त काळ लढू शकणार नाही तेव्हां तो ठरवतो, तो त्याचे ठेवणीतील एक अस्त्र कर्णावर वापरावयाचे ठरवतो. त्याच्या मदतीने तो प्रथम कर्णाचे घोडे मारतो. त्यानंतर त्याचा सारथी यमाकडे धाडतो. ते केल्यावर तो स्वतःला अदृष्य करतो.

धृतराष्ट्र विचारतात, हा पांडवांचा राक्षस अशा कपटी पद्धतीने कर्णाशी लढत असतांना माझे योद्धे त्याबद्दल काय समजत असतात ते मला सांग. राक्षस दिसेनासा झाल्यावर

कौरव समजतात कीं, तो राक्षस कर्णाचा निश्चितपणे नाश करणार आहे. कर्णाने मात्र स्वताच्या संरक्षणासाठी बाणाचे कवच तयार केले होते. आकाशातून कर्णावर बाणांचा मारा होऊ लागतो. त्याला उत्तर म्हणून कर्ण त्याचे बाण मारत असतो. त्याची चपळाई कमालीची होती. कधी बाण भात्यातून काढत असे व कधी धनुष्याला लावत असे ते समजत नव्हते. बाण फेकण्याचा त्याचा वेग विलक्षण होता. त्यावेळी एक विलक्षण भ्रमदृष्य समोर येते. आकाशातून एक लाल रंगाचे ढग दिसू लागते. जळत्या आगी सारखे ते वाटत होते. त्यातून एक भयंकर आवाज गुरगुराटाचा येऊ लागतो. त्यातून असंख्य सोन्याचा मुलामा असलेले बाण कर्णाच्या दिशेने येऊ लागतात. त्याशिवाय इतर अनेक प्रकारची शस्त्रं सुद्धा कर्णावर येत होती. त्यात तलवारी, भाले, गदा, सोटे, शलाक, कुर्हाडी असे कित्येक होते. त्याशिवाय मोठे फत्तर सुद्धा येत होते. तो मारा असा होता कीं, कर्ण त्यापुढे हतबल झालेला दिसत होता. आकाशातील तो ध्वनी वाढतच होता. ते थांबणार नाही असेंच सगळ्यांना वाटत होते. घटोत्कचाची ती किमया पाहून दुर्योधन चिंता करू लागला. त्याला कळेंना काय करावे. त्या मारा मुळें कौरवांचे असंख्य लोक मारले जात होते. सगळीकडून हाय हाय च्या किंकाळ्या ऐकू येत होत्या. ते असेंच होत राहिले तर आपण लवकरच नष्ट होऊ असें दुर्योधनाला वाटू लागते. ते समजत असले तरी ते योद्धे दुर्योधनाची बाजू उचलून धरतात त्या कठीण प्रसंगी. त्या आकाशातून होणार्या मारामुळे कौरवांचे सैन्य मोठ्या संख्येने ठार मारले जात होते. ते मेलेले लोक खाण्यासाठी त्या अंधार्या रात्री लांडगे, तरस, कोल्हे ह्यांच्या झुंडीच्या झुंडी रणभूमीत फिरू लागल्या होत्या. त्यांच्या आरोळ्यानी रणभूमी दणाणून निघत होती. त्याशिवाय नरमांस भक्षक राक्षस, पिशाच्च सुद्धा ती प्रेत खाण्यासाठी आली होती. सगळा प्रकार बिभत्स होता. आकाशातून येणार्या त्या हल्ल्यापुढे कर्णाचेसुद्धा कांहीं चालत नव्हते. सगळे कौरव हवालदिल झाले होते. कर्णाकडे असलेली मंत्रशक्ती ते थांबवू शकत नव्हती. त्यात आता पुन्हा तीव्र स्वरुपाचे शलाक आकाशातून कर्णावर व इतर कौरवांवर येऊ लागतात. कौरवांचे योद्धे रणांगणात कोसळू लागले होते. कारण त्यांच्यावर मोठे मोठे फत्तर येऊन आदळत होते. त्यावर कांहीं उपाय दिसत नव्हता त्यांना. घटोत्कचाने तयार केलेले यतीधन राक्षस कौरवांचा नाश करत होते, त्याला कांहीं उपाय नाही हे लक्षात आल्यावर ते सगळे

कौरवांचे मित्र राजे व त्यांचे सैनिक एका दमात ओरडत रणभूमी सोडण्याचे ठरवतात. मरण्यापेक्षा पळणे जास्त श्रेयस्कर ते समजतात. कारण ते युद्ध एकतर्फी झाले होते. दुसर्या बाजूला कांहीं करता येण्यासारखे नव्हते. ते ओरडत असतात, "आपण हरले, आपण हरलो". त्यावेळी त्यांना वाचवू शकेल असा कोणीही नव्हता. सगळीकडे पळापळ सुरू होते. कोणाचा पाय कोणाच्या पायपोसात ते समजत नव्हते. त्या रात्रीच्या काळोखात ते रणांगण रिकामे होत होते. कर्णाचा एकापरीने पराजय झाला होता असा सूर इतरांकडून निघत होता व ते त्या मानी क्षत्रियाला रुचत नव्हते. कर्णाची सगळी आयुध व्यर्थ ठरली होती. तरी तो त्याचे तारतम्य हरवून बसला नव्हता. कौरवांचे सैंध्य (सिंधचे सैनिक) आणि वल्हीक कर्णाकडे उत्तराच्या अपेक्षेने पहात होते. कर्ण त्या सगळ्या कौरवांच्या व प्रत्यक्ष दुर्योधनाच्या नजरेतून उतरत होता हे कर्णाला जाणवते. त्याने हार मानावी कां? तो प्रश्न आता त्याच्या पुढे होता. परंतु, हार कधीही न मानणारा मानी कर्ण द्विविधा मनस्थितीत होता. कांहींतरी त्याला करावयालाच पाहिजे, हे असे फार काळ चालू ठेवता येणार नाही ह्याची कल्पना त्याला येऊ लागली होती. तेवढ्यात आकाशातून आलेल्या एका चाकांने त्याचे चारही घोडे मारले जातात. घटोत्कच तर कोठेच दिसत नसतो. त्यामुळे नेम मारावा तर कोणावर हा प्रश्न होता. तो पहातो कीं, त्याच्या आज्ञेचे कोणी पालन करत नाही. त्याची दैवी आयुध व्यर्थ झाली होती. तो त्याच्या रथातून उतरतो. तो विचार करत असतो, प्राप्त परिस्थितीत काय करावयाचे. कौरवांचे सगळे मुख्य योद्धे कर्णाला सांगतात कीं, त्याने त्या राक्षसाला ताबडतोब मारले पाहिजे हा त्याच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे आणि त्यां इतरांच्या जीवितेचा सुद्धा. जास्त वेळ न घालवता त्याने कांहीं केले पाहिजे. त्यातील कांहींना माहित असते कीं, कर्णाकडे तो इंद्राने दिलेला शलाक आहे जो अभेद्य आहे. तो जर राक्षसावर फेकला तर तो निश्चितपणे मारला जाईल व हे गंडांतर टळेल. ते व दुर्योधनसुद्धा तसेंच दर्शवू लागतात. भिम आणि अर्जुनांपेक्षा हा जास्त भयंकर आहे. त्याचा नाश जर वेळीच नाही केला तर तो सगळे कौरव ठार मारून टाकील. युद्ध कांहीं उरणारच नाही. जर आम्ही जगलो तर लढणार पण आम्ही आताच मेलो ह्या राक्षसामुळें, तर कसली लढाई व कसला जय? ते त्यांचे बोलणे कर्णाला मान्य करावे लागणार असें दिसत होते. उद्याचे उद्या पाहू आताचे संकट प्रथम आवरले पाहिजे, असा त्यांचा एकंदर सूर होता. कर्णाला सुद्धा

समजते कीं, अर्जुनाला मारावयाला त्याच्याकडे आणखीन कितीतरी दैवी आयुध आहेत तेव्हां आता ह्याला संपवणे हेंच श्रेयस्कर होईल हे त्याला पटू लागते. अधून मधून तो राक्षस त्याला दिसत होता तेव्हां कर्ण मनाचे पक्के करतो कीं, जेव्हां ते दिसेल तेव्हां त्वरित त्याच्यावर तो इंद्राचा शलाक फेकावयाचा. पुढच्या वेळी तो दिसतांच त्याच्यावर तो अभेद्य शलाक फेकावयाचा असें कर्ण पक्के ठरवतो. अर्जुनासाठी म्हणून खास ठेवलेला ते इंद्राचा शलाक त्याला घटोत्कचावर टाकावा लागणार होता. पण त्याला कांहीं पर्याय सुद्धा त्याला दिसत नव्हता. तशा प्रकारे तो विचार करत असतांना त्याला घटोत्कच दिसू लागतो. त्याबरोबर तो शलाक काढतो पण तेवढ्यात पुन्हा राक्षस अदृष्य होतो. असे पुन्हा पुन्हा होत असते. कर्ण मोठ्या प्रचंड तणावा खाली असतो. तेवढ्यात पुन्हा तो राक्षस त्याला स्पष्टपणे दिसतो व त्याबरोबर कर्ण तो शलाक त्याच्यावर फेकतो. तो संहारक शलाक घटोत्कचाला जोराने लागतो, त्याच्या अंगात घुसतो. घटोत्कच त्यांमुळें जोरांने किंचाळतो. त्याचे ते ओरडणे सगळ्यांना भिववणारे होते. आकाशातून जोराचे वारे वाहू लागतात. आकाशातून मोठे आवाज येऊ लागतात जसे ढगांचे गडगडाट असावेत. सगळ्या दिशांतून वीजा चमकू लागतात. घटोत्कचाचा वध त्याने केल्यानंतर तो इंद्राचा शलाक त्याच्या छातीतून निघतो व स्वर्गाकडे इंद्राच्या जवळ जाऊ लागतो. घटोत्कच मेला होता. घटोत्कचाने त्याचे काम केले होते. मरत असतांना सुद्धा तो आणखीन नुकसान दुर्योधनाचे करणार असतो, त्याचे धड मोठे होत असते. आकाशातून ते खाली जमिनीवर येत होते. एकाद्या प्रचंड ढगासारखा तो वाटत होता, खाली येत असतांना तो मोठ्याने ओरडत गर्जना करत होता. त्या त्याच्या अखेरच्या गर्जना होत्या. खाली येतांना तो इतका मोठा होतो कीं, त्याच्या प्रचंड धुडाखाली आणखीन कित्येक तुमचे योद्धे चिरडून मरतात. घटोत्कचाचे धूड अखेरीस खाली कोसळते त्याचा मोठा आवाज होतो. त्याचा आकार इतका मोठा झाला होता कीं, त्याखाली एक अक्षौहिणी सैन्य चिरडून मारले गेले होते. घटोत्कचाने मरता मरतां ते एक मोठे काम पांडावांसाठी केले होते. तो मेला हे लक्षात आल्यावर कौरवांच्या गटातून मोठा जल्लोष ऐकू येतो. "राक्षस मेला, राक्षस मेला", अशा आरोळ्या सगळी कडे होत असतात. त्यातून ते कर्णाचे कौतुक करत असतात. कौरव त्याला त्यांचा इंद्र समजू लागतात जसे मरुतांसाठी इंद्रा होता. वृत्राचा नाश केल्यानंतर

मरुतानी व देवांनी जसें इंद्राला पुजले तसे कौरव कर्णाला मानू लागतात. कर्ण रथात चढतो व कुरु गटाकडे जाऊ लागतो.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे सत्याहत्तरावा संपला.

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे अठ्याहत्तरावा

संजय पुढे सांगतो, घटोत्कच मेला हे समजल्यावर पांडव त्याचे अंत्यदर्शन घेण्यासाठी तेथे जातात. त्यांना अतिशय वाईट वाटत असते. त्याना त्यांचे अश्रू आवरता येत नव्हते, कृष्ण मात्र मनातल्या मनात खूप खूष झालेला दिसत होता. अर्जुनाला वाचवण्यासाठी त्यांने घटोत्कचाचा बळी दिलेला होता. पण ते युद्धनितीत ग्राह्य समजले जाते. कारण, आता कर्णाकडे तो शलाक राहीला नव्हता ज्यांने तो अर्जुनाचा वध करणार होता. आता कर्णाकडे अर्जुनाला मारण्यासाठी असें आयुध राहिलेले नव्हते. त्यामुळें कृष्ण फार संतुष्ट झाला होता. त्याला त्याचा आनंद आवरता येत नव्हता. तो अर्जुनाला मिठी मारतो व नाचू लागतो. अर्जुन वाचला म्हणून अच्युत त्याचा आनंद व्यक्त करत असतो. त्यांच्या रथाच्या गच्चीवर नाचू लागतो. तो अर्जुनाला बोलतो तुझे काम झाले. हा आनंदाचा क्षण आहे. अर्जुन त्याला आश्चर्यचकित होऊन विचारतो, "अशा प्रसंगी तू असा कसा आनंद व्यक्त करू शकतोस"? तो पुढे मान्य करतो कीं, आपला एक मोठा योद्धा कामी आला आहे त्यामुळे पांडवांसाठी मोठा दुःखाचा प्रसंग आहे. त्याच्या मृत्यूने आपल्या फौजांचे मोठे नुकसान झाले आहे. घटोत्कचाचा मृत्यू झाल्यामुळें आपले सैन्य घाबरून गेले आहे हे मान्य. तरी दुसर्या कारणा करतां हा आनंदाचा सुद्धा क्षण आहे. असें कृष्ण सांगतो, "माझे जरा ऐक, मी जे आता सांगणार आहे ते ऐकल्यावर तुला समजेल कीं, मी कां आनंदीत झालो. अरे धनंजया, तो कर्ण ज्याच्याकडे तो इंद्राने दिलेला शलाक होता ज्याची भिती मला वाटत होती कारण, त्याच्यावर तुझ्याकडे उपाय नव्हता. आता तो एकच असा होता की, मी तुला त्या विरूद्ध मदत करू शकलो नसतो. तो शलाक कर्णाने घटोत्कचावर फेकला व म्हणून तो स्वर्गात यमाकडे गेला. तेसुद्धा एका अर्थी चांगलेच झाले आहे. कारण क्षत्रियाचा मृत्यू त्याला मिळाला आहे. मृत्यू नेहमीच दुःख करण्याचे कारण असत नाही. कांहीं मृत्यू आनंद करण्याचेसुद्धा असतात, असाध्य व्याधीमुळे आलेला मृत्यू, पापी माणसाचा मृत्यू, अतिवृद्धत्वामुळें आलेला मृत्यू, सत्कर्मासाठी आलेला मत्यू असे चांगले मृत्यू असतात, जसे तुझ्या अभिमन्यूचा. कर्णाकडे तो शलाक असल्यामुळें तो फार

शक्तीमान झाला होता. त्या शलाकाने तो कोणालाही नष्ट करू शकला असता. पहिल्या प्रथम त्याचे कवच आणि कर्ण कुंडलं इंद्राने यु्क्तीने काढून घेतली. तेव्हां त्याला त्याच्या बदल्यात हा शलाक दिला होता असा कीं, तो फक्त एकदाच वापरता येईल. त्यानंतर तो पुन्हा इंद्राकडे जाईल. त्याप्रमाणे घटोत्कचाचा वध केल्यावर तो परत इंद्राकडे गेला आहे. मला दिसते कीं, कर्ण आता बराच चिडलेला असेल. तो शलाक तुला मारण्यासाठी त्यांने जपून ठेवला होता पण परिस्थिती अशी झाली कीं, त्याला तो घटोत्कचावर वापरावा लांगला. आता तो शलाक नसल्यामुळें कर्णाची ताकद पुष्कळ कमी झाली आहे. कर्ण तत्त्वनिष्ट आहे, ब्राह्मणांना मानतो, दानशूर आहे, दयाळू आहे, वचनाचा पक्का आहे, तपस्या केलेला आहे. तो सूर्यपुजक आहे, सर्वात मोठी गोष्ट म्हणजे तो साक्षात सूर्याचा मुलगा आहे. त्याचे तेज सूर्यासारखे आहे. तो देवांनासुद्धा हरवता येणारा नाही. त्याचे धनुर्धैर्य अप्रतिम आहे. त्याचा बाणांचा वर्षाव पावसा सारखा असतो. परंतु, आता तो सामान्य माणसासारखा झाला आहे. त्याचे दैवीपण संपुष्टात आले आहे. त्यामुळें आता तुला तुझी प्रतिज्ञा, कर्णाचा वध करण्याची, तू पूर्ण करू शकशिल. तो आता थकू शकतो, अस्वस्थ होऊ शकतो, त्याचे धाडस व हिम्मत आता सामान्य माणसासारखी असणार आहे. त्याच्या बुद्धीला फाटे पडू शकतात. त्यामुळे त्याचा वध करणे आता सहज शक्य आहे. अरे अर्जुना, तुझ्या भल्यासाठी, विविध योजना करून मी अनेकांचे वध केले आहेत. त्यात छेड्डीचा राजा जरासंध, निशादराजा एकलव्य, तो महान राक्षस किरमिरा आणि बकासूर त्यानंतर आता अलयुध असे कितीतरी आपण मारले आहेत. त्यात घटोत्कचाचा व भिमाचा हातसुद्धा होता.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे अठ्याहत्तरावा संपला.

# घटोत्कच वध पर्व
## भाग एकशे एकोण ऐंशीवा

अर्जुन बोलतो, "मला समजत नाही तू असे कसे सागतोस की हे आमच्या भल्यासाठी होत आहे"?

वासुदेव सांगतो, "अरे पार्था, जर ते मारले गेले नसते तर फार मोठे प्रतिस्पर्धी तुझ्यासाठी व पांडवांसाठी झाले असते. ते दुर्योधनाला मिळाले असते. ते सगळे नेहमीच पांडवांसाठी काट्यासारखे होते. ते सगळे मोठे बलवान योद्धे होते. त्यांनी दुर्योधनाची तळी उचलून घरली असती. त्यांच्या मदतीने दुर्योधन पृथ्वीचा राजा झाला असता व पापाचे राज्य वाढले असते. आणखीन ऐक धनंजया, ते अशा पद्धतीने बरबाद झाले ते पहा, ते नेहमीच्या पद्धतीने शक्य नव्हते. मी त्यांना विलक्षण पद्धतीने बाद केले आहे तेसुद्धा महत्वाचे आहे. बलरामाने जरासंधाला मारले तेव्हां त्याने एक गदा त्याच्या जागेतून फेकली ती आकाशातून येत असतांना ती पाहून रोहीणीचा मुलगा त्यावर एक अस्त्र सोडतो, त्यामुळे ती गदा खाली पडते. त्यामुळें तेथील डोंगर हादरतात. ते तुला माहित आहे. एक भयंकर राक्षशीण होती तिचे नांव जरा होते, तिच्यात खूप ताकद होती. तिने पुढे एका दोन तुकड्यात जन्मलेल्या राजपुत्रासा जोडून एकत्र केले त्यामुळें त्या मुलाला जरासंध म्हणून ओळखत होते. तिचे मुलगे व ती स्वतः त्या गदेच्या प्रहाराने मारली गेली होती. पुढे जरासंध भिमाने मारला ते तुला माहित आहे. जर जरासंध त्याची गदा घेऊन इंद्राला आव्हान देतो तर इंद्रसुद्धा पळून गेला असता. एकलव्याचा आंगठा द्रोणांनी घेतला त्यांमुळे त्याची क्षमता संपुष्टात आली. त्यानंतर तो चामड्याचा मोजा घालून रामासारखा तिरंदाज झाला होता. त्याला हरवणे देवांना, दानवांना व राक्षसांना सुद्धा शक्य नव्हते. त्याला तू हरवू शकला नसतास म्हणून मी त्याला एका युद्धात ठार मारले आहे. छेड्डीच्या राजाला मी तुझ्यासमोर मारले आहे. तोसुद्धा अजिंक्य होता सगळ्यांना. माझा जन्म ह्या सगळ्यांचा नाश करण्यासाठीच झाला आहे. जगाच्या भल्यासाठी मला हे करावे लागते. त्या अलयुधाचा वध आपल्या घटोत्कचाने केला. जगात पुण्य प्रभाव वाढावा म्हणून असे वेळोवेळी करावे लागते ह्याला सृष्टीचा नियम समजले जाते. पाप शक्ती नियंत्रणात ठेवणे

माझे काम आहे. जगात पापशक्ती नियंत्रणात ठेवणे जगाच्या सुकर व्यवहारासाठी आवश्यक असते अरे धनजया. पुण्याशी संबंधीत जे गुण आहेत जसे, चांगुलपणा, नम्रता, संयम, सत्यवादीपणा, जीवनाची शुद्धता, क्षमाशिलता, माणूसकी, भूतदया, सुबुद्धी, मर्यादाशीलता ते माणसांत वाढावेत म्हणून धर्माची स्थापना झाली आहे. त्यासाठी मी असतो. त्या गुणांच्या विरोधात जे असते ते पाप समजले जाते कारण त्या पापांमुळे आत्म्याची अध्यात्मिक उर्जा कमी होत असते व पुण्यामुळें वाढत असते हे प्रमुख तत्त्व आहे. कर्णाचा वध तू आता सहजपणे करणार आहेस. कर्णाला तू कसे ठार मारावयाचे ते मी तुला सांगणार आहे. ते बोलत असतांना सैन्यातील गदोरोळ वाढला होता. कौरवांच्या फौजा रणभूमी सोडून जात होत्या. द्रोण मात्र पांडवांच्या फौजांचा समाचार घेत होत्या.

घटोत्कच वध पर्व भाग एकशे एकोणऐंशीवा संपला.

# घटोत्कच वध पर्व

## भाग एकशे ऐंशीवा

धृतराष्ट्र विचारतात, "अरे सुता मला सांग, जर कर्णाकडे तसा शलाक आधीपासून होता तर मग तो त्याने अर्जुनावर आधी कां नाही वापरला ते मला समजत नाही, तरी त्याबद्दल तुझे मत सांग. तसे केले असते तर हे युद्ध केव्हाच संपले असते. आपल्याला विजय मिळाला असता. अर्जुनाने एक प्रतिज्ञा केली होती कीं, जर त्याला कोणी आव्हान दिले तर तो ते स्वीकारणार. जर कर्णाने त्याला तसे आव्हान दिले असते तर त्या द्वंद्वांत कर्ण अर्जुनाला त्या शलाकाच्या मदतीने ताबडतोब मारू शकला असता. एवढे साधे माझ्या मुलाच्या व कर्णाच्या कां बरे लक्षात आले नाही? कां त्याना कोणी तसा सल्ला कां दिला नाही? माझा नालायक मुलगा नेहमी अशा चुका करत आला आहे. अशाने तो शत्रूचा नाश कसा करणार"? कृष्णाने घटोत्कचाच्या माध्यमाने व मोठ्या हुशारीने तो प्रभावी शलाक संपवला व अर्जुनाला अभयदान केले. खरोखरच कृष्ण किती हुशार आहे पहा. शिकारी कुत्रा व डुक्कर ह्यांच्या लढाईत अखरीस शिकारीच फायद्यात असतो. जर घटोत्कच कर्णाला मारता तर तेसुद्धा पांडवांच्या फायद्याचेच होते. कांहींही घडले असते तरी पांडवांचाच फायदा होणार होता. कृष्णाची चाल फारच सुंदर होती.

संजय पुढे सांगतो, कर्णाला जे करावयाचे होते त्याची कल्पना पूर्वीपासून कृष्णाला होती. त्यासाठी त्याने घटोत्कचाला कर्णावर धाडले कारण तोंच असा एक पांडव होतान जो कधी कर्णापुढे हरला नसता. हे सगळे आपल्या वाईट धोरणाचा परिणाम आहे. कर्णाने पार्थाचा व त्याच्या घोड्यांचा नाश केला असता.

धृतराष्ट्र पुढे विचारतात, "माझ्या मुलांना भांडण करावयाला आवडते. त्याचे सल्लागार मूर्ख आहेत. त्यांच्यात अतिशहाणपणा आहे. त्या त्यांच्या स्वभावामुळे अर्जुनाचा अंत टळला हेंच खरे. त्यांना तो शलाक अर्जुनावर आधी का नाही फेकला. कितीतरी वेळा ते समोरासमोर येत होते ते करणे सहज शक्य होते मग ते कां नाही त्यांना सुचले? अरे गवालगणा तुझ्या सुद्धा ते लक्षात कां आले नाही? तू कां नाही कर्णाला तसे सुचवलेस"?

संजय बोलतो, "मला आठवते कीं, त्या रात्री मी, दुर्योधन, शकूनी, कर्ण स्वतः, दुःशासन बोलत होतो कीं, कर्णाने इतर योद्ध्यांवर त्याचे लक्ष न घालता केवळ अर्जुनावर ठेवावे. त्याला प्रथम मारावे म्हणजे सगळे युद्धच संपेल व पांडव आपले गुलाम होतील. अर्जुना बरोबर कृष्णाला सुद्धा मारावे. कृष्ण पांडवांचे मूळ आहे. पार्थ त्या वृक्षाचा बुंधा आहे. इतर सगळे त्या वृक्षाच्या फांद्या व पानं आहेत. कृष्ण त्यांचा करता करविता आहे. म्हणून कर्णाने फांद्या पानांवर लक्ष न देता थेट मुळावर घाव घालावा. जर कर्ण कृष्णाला मारता तर सगळी पृथ्वी तुमच्या हातात येती. जरी असे सगळे आम्ही ठरवत होतो, जेव्हां लढावयाला जात तेव्हां त्या सगळ्या गोष्टींचा विसर पडत असें. कृष्ण सदैव अर्जुनाला संरक्षण देत असे. त्याने कधीच कर्णापुढे अर्जुनाला येऊ दिले नाही. तो नेहमी इतर योद्ध कर्णापुढे आणत असे. त्यामुळे लढाईच्या जोशात ते सगळे कौरव तो मुद्दा विसरत होते. आमच्या ह्या हलगर्जीपणामुळे तो शलाक फुकट गेला. जे समजतात कीं, त्या कृष्णाला कोणी हरवू शकत नाही तेंच खरे आहे". संजय पुढे सांगतो, "सत्यकी नेहमी कर्णाशी लढण्याचा प्रयत्न करत असें. त्यात सत्यकी कर्णाला बर्याच द्वद्वांत हरवत असे पण कर्णाने कधी तो त्याच्यावर फेकला नाही. कौरवांच्या बैठकीत त्या शलाकाच्या वापरा बद्दल बोलले जात असे. त्याचा उल्लेख होत असें. एका अर्जुनाच्या मृत्यूत सगळे होते तरी जेव्हां लढाई होत असे इतराच्या बरोबरच कर्ण जास्त लढत असे. कोणी त्याला आठवण करत नव्हते कीं, त्यांने अर्जुनाशी लढावे व त्यावेळी तो शलाक फेकावा. कर्णाला सत्यकीबद्दल विशेष कुतूहल होते कारण तो अर्जुनासारखाच होता. त्यामुळे जरी अर्जुन मारला गेला असता तरी  सत्यकी पांडवांचे संरक्षण करू शकला असता, म्हणून कर्णाला प्रथम त्याचा काटा काढावयाचा होता पण ते त्या शलाकाचा वापर न करता करावयाचे होते. म्हणून कर्ण सदैव युयुधनाच्या बरोबर जास्त द्वंद्व करत होता. परंतु, त्यात त्याला कधीच यश आले नाही त्यामुळे कर्णाचे मन द्विधा झाले होते. सत्यकी कां अर्जुन, असा सतत वाद त्याच्या मनात घोळ घालत होता. कृष्णाला ते सगळे समजत होते. म्हणून तो सतत सत्यकीला कर्णापुढे आणत असें. कृष्ण अर्जुनाला कधीच मरू देणार नाही कारण ते नेहमी एकत्र असतात युगायुगातून ते चालत आले आहे. म्हणून कृष्णाने कर्णाबरोबर लढण्यासाठी राक्षसाला धाडले होते". घटोत्कच वध पर्व भाग एकशे ऐंशीवा संपला.

# घटोत्कच वध पर्व
## भाग एकशे एक्याऐंशीवा

धृतराष्ट्र बोलतात, "माझ्या मुलाचे, शकूनीचे, कर्णाचे व दुःशासनाचे वागणे धोरणाच्या विरूद्ध होते असें मी समजतो. जर त्यांना माहीत होते कीं, तो शलाक एकदाच वापरता येणारा होता तर त्याचा वापर कर्णाने कृष्णावर कां नाही केला"?

संजय सांगतो, दररोज संध्याकाळी तळावर परत आल्यावर त्यावर ते बोलत होते व ते सांगत होते कीं, कर्ण ते शलाक दुसर्या दिवशी अर्जुनावर फेकून मोकळा होईल. परंतु दुसर्या दिवशी ते होत नसें कारण त्यात कर्णाचा अहंकार होता. त्याला कोणी हुकूम केलेला आवडत नसे. अगदी दुर्योधनानी सुद्धा केलेला आदेश तो कधी आचरत नसें, त्याला जेव्हां वाटेल तेव्हां तो त्या गोष्टी करत असें. दुसरे असे कीं, त्याला कुंतीबद्दल आस्था वाटू लागली होती. कारण एकदा त्याच्या राधाने त्याला दोष दिला होता जेव्हां तिला समजले कीं, कर्ण कुंतीशी उद्धटपणे बोलला . राधा त्याला समजावते कीं, मातेचा अशाप्रकारे मुलाने अपमान करावयाचा नसतो. बाईच्या जीवनातील अडचणी पुरूषांना कधीच समजत नाहीत त्यासाठी कुंती त्या प्रसंगी तशी कां वागली त्याबद्दल तिला दोष देणे कर्णाला शोभले नाही . असे बोलून राधा कुंतीचे समर्थन करत असें त्यामुळे त्याच्या मनात कुतीबद्दलचा राग कमी झाला होता. त्याशिवाय कर्ण स्वभावतः प्रेमळ होता. त्यामुळे पांडवांशी जरी तो लढत होता त्याच्या मनात त्यांच्या बद्दल प्रेम होते, अगदी अर्जुनालासुद्धा मारण्याची इच्छा त्याच्यामध्ये उरलेली नव्हती. जे तो कधी उघडपणे व्यक्त करत नसे. अहो हा सगळा दैवाचा खेळ आहे असे समजले पाहिजे. दैव सर्वात श्रेष्ठ आहे हेंच खरे. आता पहा, कर्णाकडे तो शलाक असूनही तो पार्थाला किंवा देवकीच्या मुलाला मारत नाही. कारण त्याची बुद्धी दैवाने तशी बनवली होती.

धृतराष्ट्र बोलतात, "आपण सगळे दैवाचे आधीन असतो. इंद्राने दिलेला शलाक फुकट गेला. कर्ण व माझा मुलगा तसेंच इतर राजे जे ह्या राजकारणाचा हिस्सा आहेत, ते सगळे आधीच यमाच्या घरी गेल्या सारखेच आहेत. आता मला सांग पुढे कौरव आणि पांडवांतील युद्ध घटोत्कचाच्या मृत्यू नंतर कसे होत होते. ते द्रोणावर कसे चाल करतात?

त्यांच्या भोवती कसा व्युह रचतात? श्रींजय आणि पांचाल द्रोणांना कसे तोंड देतात? भुरिश्वर व जयद्रथ मेल्यानंतर ते कोणता नवीन व्युह रचतात ते साग". "द्रोणांना संरक्षण देणारे कृप, कर्ण, दुर्योधन, दुःशासन, हे काय करतात? मला सांग संजया, माझे योद्धे धनंजय व कृष्णाला कसे तोंड देतात. त्यात भिम व धृष्टद्युम्न जे द्रोणांचा वध करणारे आहेत ते काय करतात ते मला सांग".

संजय बोलतो, त्या उत्तर रात्री घटोत्कचाचा वध कर्णाने केल्यामुळें तुमचे सगळे योद्धे खूप आनंदात दिसत होते. त्या काळोख्या रात्री झालेल्या युद्धात जे नुकसान दोनही बाजूंचे झाले ते त्या दोघाना रुचलेले नव्हते. कौरवांचे सैनिक पांडवांच्या सैनिकांवर जोराचा हल्ला करतात. त्यामुळें युधिष्ठीर नाराज झाले होते. तो भिमाला व त्याच्या इतर भावांना बोलतो कीं, घटोत्कचाच्या मृत्यूमुळें त्याला धक्का बसला आहे. म्हणून तो थोड्या काळासाठी युद्धातून बाहेर रहाणार आहे. त्यानंतर तो त्याच्या रथात बसून असतो व कर्णाच्या धाडसाबद्दल विचार करत असतो. त्याला असा बसलेला पाहून कृष्ण त्याला बोलतो, "अहे राजे, कुंती पुत्रा , अशारितीने दुःख करण्यात कांहीं अर्थ नाही. युद्धाला आला अहात तर मृत्यूचे दुःख करावयाचे नसते. हे धरूनच आपण सगळे क्षत्रिय रहात असतो. असे दुःख करणे सामान्य लोकांसाठी शोभते. उठ व कामाला लाग. जर असा रडत बसलास तर त्याचा आपल्या विजयावर परिणाम होऊ शकतो. ते ऐकल्यावर त्याचे अश्रू पुसून कृष्णाला बोलतो, "अहो बलवान, मला योग्य काय ते चांगले समजते, पण घटोत्कच आम्हाला आमच्या वनवासाच्या काळात किती मदत करत होता त्याची तुला कल्पना नाही. त्यावेळी तो एक लहान मुलगा होता. अरे जनार्दना, त्याला समजले कीं, पार्थ शस्त्रं घेण्यासाठी स्वर्गात गेला आहे तेव्हां हा भिमाचा मुलगा आम्हाला संरक्षण देण्यासाठी आला होता. जोवर अर्जुन स्वर्गात होता तोवर हा हिडींबाचा मुलगा आमच्यात रहात होता. सगळी मदत द्रौपदीला तो करत असें. त्याचे सवंगडीसुद्धा आम्हाला मोठे सहाय्य करत होते. त्या गोष्टी आठवत होतो मी. आम्ही जेव्हां अवघड भागातून जात होतो तेव्हां तो कृष्णाला त्याच्या पाठीवर घेऊन नेत असे. ह्या गोष्टी मला आठवत होत्या. त्याने आमच्या येथेच सगळी युद्ध विद्या संपादन केली होती. त्यांमुळे आम्हा सगळ्यांचा तो लाडका झाला होता. आमच्यासाठी त्याने काय काय केले ते मी तुला किती सांगू. असा तो पुन्हा आमच्यासाठी

गेला त्यामुळें दुःख होणे सहाजिकच आहे. माझ्या मुलांपेक्षा जास्त मी त्याच्यावर प्रेम करतो. तो मला फार प्रिय होता. आम्ही सगळे एकरुप झालो होतो त्या वनवासाच्या काळात. अशामुळे मी त्याच्या जाण्याने दुःखी झालो होतो". पुढे युधिष्ठीर कृष्णाला कामाबद्दल बोलतो, "पहा आमचे सैन्य कौरवांच्या हल्ल्याने अस्ताव्यस्त झाले आहे. ते द्रोण व तो कर्ण राक्षसाच्या मृत्यूनंतर जास्तच जोरात आले आहेत. कौरवांचे सैन्य अर्जुनाच्या शस्त्रांना सुद्धा महत्व देत नाहीत जेव्हा पासून कर्णाने आमचा घटोत्कच मारला. कौरवांचा उत्साह वाढलेला आहे. आतापर्यंत आपले दोन महत्वाचे योद्धे कौरवांनी मारले आहेत. कर्णाबरोबर घटोत्कच लढत असतांना अर्जुन तेथे त्याला संरक्षण देत असतां तर कदाचित ते झाले नसते. अश्वत्थामा दुर्योधनाची ताकद वाढवत आहे. द्रोणांनेच अभिमन्यूच्या खूनाचा कट रचला असें मला समजले आहे. द्रोणांनेच अभिमन्यूवर प्रथम हल्ला केला व त्याला निःशस्त्र केले असे सगळे समजल्यावर माझा माणूसकी वरील विश्वास उडण्यास कारण होत आहे. तो अडचणीत असतांना कृतवर्मनाने त्याचे घोडे मारले. जयद्रथाच्या क्षुल्लक अपराधासाठी त्याला माझ्या भावांने ठार मारले तेसुद्धा मला आवडलेले नाही. पांडवांना जर न्यायाची लढाई करावयाची असेल तर ते प्रथम कर्ण व द्रोण ह्यांचा वध करतीस परंतु अजून ते झालेले नाही. अरे कृष्णा, असे सगळे विचार माझ्या मनात येत आहेत. दुर्योधनाचे बळ त्या दोघात आहे हे माहीत असूनही त्यांचा काटा आमच्या वीराना अजून काढता आलेला नाही. ज्यांचा वध आवश्यक आहे ते तसेंच आहेत व ज्यांचे कांहीं खास महत्व नाही असे भुरीश्रव, जयद्रथ ह्यांच्या मारण्याच्या प्रतिज्ञा घेतल्या जात आहेत ह्याचा अर्थ मला समजत नाही. मला वाटते कर्णाचा वध करण्याचे काम मलाच करावे लागेल. भिमसेन द्रोणांवर चालून जात आहे. तेथे त्याला मदत करण्यासाठी घृष्टद्युम्न आहे". असें बोलल्यानंतर युधिष्ठीर त्याचे धनुष्य घेऊन कर्णावर चाल करण्याची तयारी करू लागतो. तो त्याचे शंखू आव्हानात्मक म्हणून जोरांने फुंकतो . त्याच्या बरोबर पांचालांचे व प्रभाद्रकाचे असें मिळून तीनशे हत्ती, पांच हजार घोडेस्वार, शिखंडीच्या नेतृत्वाखाली निघतात. ते त्यांची रणवाद्ये वाजवतात. ते एकंदर पाहून कृष्ण अर्जुनाला बोलतो, "तुझा ज्येष्ठ बंधू रागाच्या भरात कर्णावर चाल करून जात आहे. ते योग्य नाही. तो म्हणतो कीं, तो कर्णाचा वध करणार आहे. त्यासा त्या पासून परावृत्त केले

पाहिजे". तेवढे बोलून हृषिकेश त्यांच्या रथाचे घोडे पुढे हाकतो. ते त्यांचा रथ युधिष्ठीराच्या रथा पासून कांहीं अंतर राखून त्याचा मागोवा घेत असतात. भावनेच्या भरात धर्माचा मुलगा कर्णाच्या मागे जाऊ लागतो त्याला मारण्यासाठी. तेवढ्यात तेथे व्यास ऋषी अवतरतात. ते त्याला बोलतात, "सुदैवाने अर्जुन अजून हयात आहे, कर्णाकडून मारला गेला नाही. कर्णाचा शलाक तसांच वापरला गेला. सुदैवाने जिश्नु कर्णाबरोबर समोरासमोर लढला नाही. त्या दोघांनी दैवी अस्त्रं आणि शस्त्रं एकमेकांवर मारली असती. कर्णाची सगळी अर्जुन नष्ट करू शकतो. तसे झाले असते तर कर्ण तो शलाक अर्जुनावर फेकणार होता. कारण तसे दिले आहे कीं, जर सगळे मार्ग संपले तरच तो वापरावयाचा एरवी नाही. जर असे झाले असते तर ते पांडवांसाठी फार मोठे हानिकारक ठरले असते. तुमच्या सुदैवामुळें तो शलाक राक्षसावर वापरला गेला हे लक्षात घे. त्यात भावना विवश होणे शहाणपणाचे नाही. घटोत्कचाचा मृत्यू आला होता व तो शलाक केवळ कारणमात्र होता. तो स्वाभाविक मृत्यू होता, म्हणून त्याबद्दल एवढे भावूक होणे तुला शोभत नाही. तू त्यामुळे क्रोधाच्या आहारी जाणे योग्य नाही. स्वाभाविक मृत्यू बद्दल दुःख करावयाचे नसते. तुझ्या भावांबरोबर आणि तुमच्या गुणी राजांबरोबर तू आजपासून पांचव्या दिवशी पृथ्वीचा राजा होणार आहेस, त्याचा विचार कर. अरे राजा तू नेहमी पुण्याचा विचार करत रहा. सगळ्यां प्रती भूतदया असू दे तुझ्या मनात. दान, दया, क्षमा हे तुझे धोरण असू दे. तुझ्या पुण्यवंत जीवनामुळे तुला विजय मिळणार आहे".

असें बोलून व्यासमुनी अंतर्धान पावतात.

**- द्रोण पर्व भाग चौथा संपला -**

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७७ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद